श्री

सार्थ कपिलगीता.

हें पुस्तक

विष्णु वामन बापट शास्त्री

यांनीं तयार केलें तें

पुरंदरे आणि कंपनीनें

सर्व हक्कांसह विकत घेऊन,

मुंबईंत

' गणपत कृष्णाजी प्रेस कंपनी ' च्यां

छापखान्यांत छापिलें.

शके १८३१, सन १९१०.

किंमत ५ रुपाये.

प्रस्तावना.

ही पद्मपुराणांतील कपिल गीता मराठी भाषांतरासह आज आमच्या महाराष्ट्र-बांधवांस आह्मी सप्रेम समर्पण करीत आहों. दर मूळ श्लोक व त्याच्याच खालीं त्याचा सरळ अर्थ दिला आहे. क्वचित अर्थाचें अधिक स्पष्टीकरणही केलें आहे. ही गीता संभवत आनंदाश्रमांत छापलेल्या पद्मपुराणांत आढळत नाहीं. तथापि तिचा विषय योगमिश्रित अद्वैत—वेदांत आहे. यास्तव हिच्या वाचनानें सर्व धार्मिकांस मोठा लाभ होण्याचा पुष्कळ संभव आहे. यास्तव जिज्ञासूंनीं या सार्थ गीतेचा संग्रह करून आमच्या श्रमाचें चीज करावें.

पुरंदरे आणि कंपनी,

प्रकाशक.

॥ श्री ॥

कपिलगीताप्रारंभः ।

अध्याय १ ला.

नत्वा श्रीगुरुपादाब्जं स्मृत्वा मोक्षार्थसिद्धिदम् ।
तारकाभ्यन्तरे पंच ब्रह्मतत्त्वं तदुच्यते ॥ १ ॥

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुचरणारविंदाभ्यां नमः । श्रीगुरुपादकमलास वंदन करून व मोक्षसंज्ञक पुरुषार्थसिद्धि देणारा त्याचेंच स्मरण करून तारकांतर्गत पंचक जाणलें असतां ब्रह्मतत्त्व समजत असल्याकारणानें त्याचें प्रतिपादन करितों ॥ १ ॥

पंचब्रह्म पंचदेवं पंचस्थानेषु पंचधा ।
पंचमातृकाः पंचवाक्यं पंचशून्यं तथैव च ॥ २ ॥

पंचब्रह्म, पंच देव पंच स्थानांत पांच प्रकारें वांटलेली वस्तु ह्मणजे पांच स्थानें पांच मातृका, पांच वाक्यांचा समूह व पांच प्रकारचें शून्य या सर्वांस परमात्म्यानें आपल्या केवल सत्यसंकल्पानें निर्माण केलें ॥ २ ॥

पंचावस्थाः पंच देहाः पंच मात्राः सुसंस्थिताः ॥ पंच वेदाः पंच गुणाः पंचपद्मास्तथा परे ॥ ३ ॥ पंच भूताः पंच क्रियाः पंचदिक् पंच वेदिकाः ॥ पंच कोणाः पंच ऋचः पंच प्रमाणसंज्ञकाः ॥ ४ ॥ पंचांगं च पृथग्वर्णं पंच मुद्रादि गुप्तकम् ॥ पंच कलाः पंच मार्गाः पंचधाऽकाशधाम च ॥ ५ ॥ देहस्थपंचस्थानं च ब्रह्माण्डस्थानपंचकम् ॥ सर्वे ब्रह्माण्डनिलयाः पंच लोकनिवासिनः ॥ ६ ॥ देहाभिमानिनः पंच पंच वाद्यमतःपरं ॥ पंचपदी च गायत्री पंचायतनदेवताः ॥ ७ ॥ पंच शक्तिसमायुक्ता विचारः पंचनिर्णयः॥पंचाग्नि पंच आनंदाः पंच नामांतदीक्षकाः ८॥

पंचत्रिंशत् पंचकानि तारकाभ्यन्तरेष्वपि॥ शतं चापि तदर्धं च शुद्धं श्रुत्वा गुरोर्मुखात् ॥ ९ ॥

पांच अवस्था, पांच देह, उत्तमप्रकारें स्थित असलेल्या पांच मात्रा, पांच वेद, पांच गुण, पांच पद्में, पांच भूतें, पांच क्रिया, पांच दिशा, पांच वेदिका, पांच कोण, पांच ऋचा, पांच प्रमाणादि, पंच अंगें, पांच पृथक् वर्ण, पंच मुद्रा, पंच गुप्त, पंच कला, पंच मार्ग, पांच प्रकारचें आकाशधाम, देहांतील पांच स्थानें, ब्रह्मांडांतील पांच स्थानें, सर्व पंचलोकनिवासी ब्रह्मांडांत वास्तव्य करणारे आहेत, पांच देहाभिमानी, पांच वाद्यें, पंचपदी गायत्री, पंचायतन देवता, पंच शक्ती, पांच विचार, पांच निर्णय, पांच अग्नि, पांच आनंद व पांच नामें याप्रमाणें पसतीस पंचकें तारकामध्यें आहेत. या ग्रंथाचे शंभर किंवा पन्नास श्लोक गुरुमुखानें अर्थतः ऐकिले असतां व त्या विषयीं विचार केला असतां भवबंधन तुटतें ॥ ३ ॥ – ॥ ९ ॥

न तस्य पुनरावृत्तिर्जन्ममृत्युभयं हरेत् ॥
निजमोक्षार्थसंसिद्धिर्बंधमोक्षार्थदं शुभम् ॥ १० ॥

इति श्रीपद्मपुराणे तारकाष्टके कपिलगीतायां
प्रथमोध्यायः ॥ १ ॥

त्याला पुनरपि संसारांत पडावें लागत नाहीं. जन्म व मृत्यु यांचें भय रहात नाहीं. हें तत्त्वार्थदर्शन, आत्ममोक्षरूपी पुरुषार्थाची सिद्धि करणारें म्हणजेच बंध नाहींसा करणें हा पुरुषार्थ देणारें व त्यामुळेंच शुभ आहे. ॥ १० ॥

इति श्रीपद्मपुराणान्तर्गत कपिलगीतेचा प्रथम
अध्याय समाप्त झाला ॥ १ ॥

अध्याय २ रा.

तारकं दंडकं चैव कुंडल्यं चार्धचंद्रकम् ॥
पंचमं बिंदुसंकाशं पंचब्रह्म सनातनम् ॥ १ ॥

तारक, दंडक, कुंडल्य, अर्धचंद्रक व पांचवें बिंदुसंकाश असें सनातन पंच ब्रह्म आहे. म्हणजे तारकरूप, दंडकाकार, कुंडलाकृति, इत्यादि प्रकारचें ब्रह्मस्वरूप अभ्यासाच्या योगानें कळतें. ॥ १ ॥

ब्रह्मा विष्णुश्च रुद्रश्च ईश्वरश्च सदाशिवः ॥
पंच देवं तु विख्यातं पंचब्रह्मस्वरूपवत् ॥ २ ॥

ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईश्वर, सदाशिव, हें पंच दैवत पंच ब्रह्मस्वरूपाप्रमाणेंच विख्यात आहे. ॥ २ ॥

अकारश्च उकारश्च मकारश्च त्रिमातृकम् ॥
इकारश्चैव एकारः पंचकं मातृसंज्ञितम् ॥ ३ ॥

अकार, उकार, मकार, इकार व एकार हें मातृसंज्ञक पंचक आहे. अर्थात् या पांच प्रकारच्या मात्रा ॐकाराध्यें असतात. ॥ ३ ॥

त्रिकूटं श्रीहटं स्थानं गोल्हाटं चौटपीठकम् ॥
पुण्याद्रिर्भ्रामरी गुंफा ब्रह्मरंध्राण्यनुक्रमात् ॥ ४ ॥

त्रिकुट, श्रीहट, गोल्हाट, औटपीठ, पुण्याद्री भ्रामरी गुंफा हीं क्रमानें पांच ब्रह्मरंध्रें आहेत. ॥ ४ ॥

वैखरी मध्यमा वाचा पश्यंती च तथा परा ॥
परात्परा च विज्ञेया वाचा पंचकसंज्ञिता ॥ ५ ॥

वैखरी, मध्यमा, पश्यंती, परा व परात्परा अशा पांच वाणी आहेत. त्यांतील पांचव्या परात्परेचा महिमा वर्णवत नाहीं. ॥ ५ ॥

अधःशून्यं चोर्ध्वशून्यं हि मध्यं सर्वं शून्यं शून्यमिहांतशून्यम् ॥
चतुःशून्यागोचरं यन्निश्शून्यं निर्नामशून्यं हि निरामयं च ॥ ६ ॥

अधःशून्य, ऊर्ध्वशून्य, मध्यशून्य, सर्वशून्य, व पांचवें अंतःशून्य. पण यांतील चार जाणतां येतात. पांचवें जाणतां येत नाहीं. तें चारी शून्यांचा विषय न होणारें, निःशून्य, निर्नामशून्य, व निरुपद्रव आहे. आत्मसाक्षात्कार झाला असतां या सर्व शून्यांचा निर्णय होतो. वेद व शास्त्रें याविषयीं प्रमाण आहेत. ॥ ६ ॥

जाग्रत्स्वप्नः सुषुप्तिश्च तुर्यावस्था च उन्मनी ॥
सा चैव सहजावस्था पंचवस्थाः प्रकीर्तिताः ॥ ७ ॥

जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ति, तुर्यावस्था व उन्मनी अशा पांच अवस्था सांगितलेल्या आहेत. त्यांतील शेवटची पांचवी अवस्था स्वाभाविक आहे. ती इतर अवस्थांप्रमाणें सकारण नसते. त्यामुळें तिच्या प्रतिबंधांचें निवारण केलें ह्मणजे ती आपोआप व्यक्त होते. ॥ ७ ॥

स्थूलं सूक्ष्मं कारणं च महाकारणकं परम् ॥
कैवल्यज्ञानदेहश्च पंच देहाः प्रकीर्तिताः ॥ ८ ॥

स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण, व कैवल्यज्ञानदेह असे पांच देह सांगितलेले आहेत. त्यांतील शेवटचा ज्ञानदेह ह्मणजे निराकार, निरामय व ज्ञानस्वरूप आहे. तो अत्यंत शुद्ध आहे ॥ ८ ॥

न्हस्वमात्रा दीर्घमात्रा प्लुतमात्रा त्रिभेदतः ॥
अर्धमात्राऽप्यनुच्चार्या मात्राः पंचकसंज्ञिताः ॥ ९ ॥

न्हस्वमात्रा, दीर्घमात्रा, प्लुतमात्रा, अर्धमात्रा व अनुच्चार्यमात्रा अशा पांच प्रकारच्या मात्रा आहेत. ॥ ९ ॥

ऋग्वेदोऽथ यजुर्वेदः सामवेदोह्यथर्वणः ॥
सूक्ष्मवेदो हि चाध्यक्षः पंच वेदाः प्रतिष्ठिताः ॥ १० ॥

ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्वणवेद, व पांचवा सूक्ष्मवेद असे पांच वेद आहेत. पांचव्या वेदाचा ध्वनि आंतल्या आंत असतो. तो बाहेर व्यक्त होत नाहीं ॥ १० ॥

रजः सत्वं तमश्चैव शुद्धसत्वं चतुर्थकम् ॥
निर्गुणं सगुणातीतं पंचमं सुप्रतिष्ठितम् ॥ ११ ॥

सत्त्व, रज, तम, चवथा शुद्धसत्त्व व पांचवा अतिशय प्रतिष्ठित असलेला निर्गुण अथवा सगुणातीत असे पांच गुण आहेत पांचवा गुण साधकास अव्यक्तांत मिळवितो ॥ ११ ॥

रक्तं श्वेतं तथा श्यामं नीलं सुनीलपंकजम् ॥
पंचमं शुद्धपीतं च तस्यांते श्वेतमुज्वलम् ॥ १२ ॥

रक्त, श्वेत, श्याम, नील, कमळाप्रमाणें सुनीळ, व पांचवा शुद्धपीत असे पांच वर्ण आहेत. ॥ १२ ॥

पृथिव्यापस्तथा तेजो वायुराकाशमेव च ॥
पंच भूतानि कल्प्यंते पंच भूताः सुनिश्चिताः ॥ १३ ॥

पृथिवी, आप, तेज, वायु आकाश, या पांच भूतांची कल्पना केली आहे. परमात्म्यानें विश्वोत्पत्तीकरितां यांस निर्माण केलें आहे. ॥ १३ ॥

सर्जनं पालनं चैव प्रलयश्च तृतीयकः ॥
सूर्यक्रिया चंद्रक्रिया क्रियाः पंचकसंज्ञिताः ॥ १४ ॥

सर्जन, पालन, प्रलय, सूर्यक्रिया व चंद्रक्रिया या पांच क्रिया आहेत. ॥१४॥

पूर्वेंद्रः पश्चिमदिशा वरुणः प्रसिद्धो धर्मश्च दक्षिणदिशोत्तर दिक् कुबेरः ॥ उर्ध्वां हि पद्मजननो जगतो विधाता ॥ एवं दिशोध पतिदैवतपंचकं च ॥ १५ ॥

पूर्वेस इंद्र, पश्चिमेस वरुण, दक्षिण दिशेस यमधर्म, उत्तरेस कुबेर व ऊर्ध्व दिशेस जगाचा विधाता ब्रह्मा असे पांच दिशांचे पांच स्वामी आहेत. ॥ १५ ॥

नैर्ऋत्यकोणं निर्ऋतीश्वरमीशकोणमाग्नेयकोणमधिदैवतमग्निदेवः ॥
वायव्यकोणमधिदैवतवायुदेवश्चाधोदिशा अथ च दैवतमत्र विष्णुः १६

नैर्ऋत्यकोणांत निर्ऋति, ईशान्यकोणांत ईश्वर, आग्नेयकोणांत अग्निदेव, वायव्य कोणांत वायु व अधोदिशेंत विष्णुदैवत व स्वामी या रूपानें स्थित आहे ॥ १६ ॥

सद्योजातं वामदेवाय चेति ॥ तत्पुरुषायेति चेशानमंत्रः ॥ अघो-
रेभ्योऽथ घोरेभ्य इति ब्रह्म॥ यजुःष्वीशानः पंचवक्त्रं पुरस्तात्॥१७॥

सद्योजातं०, वामदेवाय०, तत्पुरुषाय०, ईशानः०, अघोरेभ्योऽथ घोरेभ्यः०, इत्यादि यजुर्वेदाच्या मंत्रांत सद्योजात, वामदेव, तत्पुरुष, ईशान व अघोर आणि घोर या नांवांचीं पंचमुख ईश्वराचीं पांच मुखें सांगितलीं आहेत. ॥ १७ ॥

सार्धत्रिहस्तो यदि स्थूलभोगो ॥ ह्यंगुष्ठमात्रप्रमितं हि लिङ्गम् ॥
पर्वार्धमात्रं मसुरप्रमाणम् ॥ प्रमाणहीनं हि भवेत्प्रमाणम् ॥ १८॥

हा साडेतीन हात लांब असलेला व नखशिखांत अनेक अवयवांनीं भरलेला रक्त मांसादिकांचा गोळा ह्मणजेच स्थूलदेह होय. लिंग अथवा सूक्ष्मदेह अंगुष्ठप्रमाण असतो. तिसरा कारणदेह अर्ध्या पेराएवढा असतो. चवथा महाकारणदेह मसुरे एवढा असतो. आणि पांचवा देह प्रमाणरहित आहे. त्याचें ज्ञान आत्मज्ञांसच होतें. इतरांस होत नाहीं. ॥ १८ ॥

पृथक् रक्तपीतं तथा शुभ्रवर्णम् ॥ तथा कर्बुरं श्यामवर्णादिभूतम् ॥
नीलं सुनीलं शुद्धपीतं सुशुभ्रम्॥ तथा पंचमं पीतवर्णं पुरस्तात्॥१९॥

लाल, पिंवळा, शुभ्र, चित्रविचित्र, व काळा हे पांच मुख्य वर्ण असून नीळा, अतिशय नीळा, शुद्ध पिंवळा, अति शुभ्र इत्यादि हे सर्व त्या पांचांचेच भेद आहेत.१९

खेचरी भूचरी चैव चाचरी च अगोचरी ॥
उन्मनी चेति विख्याताः पंच मुद्राः प्रकीर्तिताः ॥ २० ॥

खेचरी, भूचरी, चाचरी, अगोचरी व उन्मनी अशा पांच प्रसिद्ध मुद्रा सांगितल्या आहेत ॥ २० ॥

षण्मुखी चोन्मीलिनी च शांभवी चात्मभाषिणी ॥
पूर्वबोधप्रबोधी च पंच गोप्या हि मुद्रिकाः ॥ २१ ॥

षण्मुखी, उन्मीलिनी, शांभवी, आत्मभाषिणी व पुर्वबोधप्रबोधिनी या पांच अत्यंत गुप्त मुद्रा आहेत. ॥ २१ ॥

ऊर्मी चैवापि धूम्री च ज्योतिर्ज्वाला चतुष्कला ॥
कलातीता कलाः प्रोक्ताः पंच वै सुप्रतिष्ठिताः ॥ २२ ॥

ऊर्मी, धूम्री, ज्योतिर्ज्वाला, चतुष्कला, व कलातीता अशा पांच कळा सांगितलेल्या असून त्या अतिशय प्रतिष्ठित आहेत. ॥ २२ ॥

पिपीलिका विहङ्गश्च कपिमार्गो हि मीनकः ॥
शेषमार्गो हि संख्यायां पंच मार्गाः पुरातनाः ॥ २३ ॥

पिपीलिका-मार्ग, विहंग-मार्ग, कपि-मार्ग, मत्स्य-मार्ग व शेषमार्ग असे पांच पुरातनमार्ग सांगितले आहेत. ॥ २३ ॥

घटाकाशमठाकाशमहदाकाशसंज्ञितम् ॥
चिदाकाशं निराकाशमाकाशपंचकं विदुः ॥ २४ ॥

घटाकाश, मठाकाश, महदाकाश, चिदाकाश व निराकाश असे पांच प्रकारचें आकाश सांगितलें आहे. ॥ २४ ॥

नेत्रं कंठोऽथ हृदयं मूर्धा स्थानान्यनुक्रमात् ॥
शिखायां पंचमं स्थानं पंचस्थानं प्रकीर्तितम् ॥ २५ ॥

नेत्र, कंठ, हृदय, व मूर्धा हीं जाग्रती, स्वप्न, सुषुप्ति व समाधि या अवस्थांचीं क्रमानें स्थानें आहेत. पांचवें स्थान शिखेमध्यें सांगितलें आहे. सारांश याप्रमाणें पांच स्थानें उक्त आहेत. ॥ २५ ॥

सत्यवैकुंठकैलासमाश्रयो हि चतुर्थकः ॥
निराश्रयः पंचमश्च पंच लोकाः प्रतिष्ठिताः ॥ २६ ॥

सत्यलोक, वैकुंठलोक, कैलास, आश्रय व निराश्रय असे पांच लोक प्रतिष्ठित आहेत. ॥ २६ ॥

विश्वतैजसप्राज्ञाश्च प्रत्यगात्माभिमानिनः ॥
निरंजनस्तदातीतः सोऽभिमानी तु पंचमः ॥ २७ ॥

विश्व, तैजस, प्राज्ञ, प्रत्यगात्मा व निरंजन हे पांच पूर्वोक्त (श्लोक ८) पांच देहांवर अभिमान ठेवणारे आहेत. ॥ २७ ॥

तंतिवीणा वितन्तश्च मृदंगं घनकांस्यकम् ॥
सुस्वरो वंशिकानादोऽनाहतो वाद्यपंचकम् ॥ २८ ॥

तंतिवीणा, वितंत, मृदंग, घनकांस्य, व पांचवा सुस्वर आणि अनाहत वेणुनाद अशीं पांच वाद्यें व त्यांचे नाद आहेत. पण हे सर्व नाद योगाभ्यासानें कळतात. या नादांच्या योगानेंच योगाभ्यास करितां करितां मन लीन होतें. ॥ २८ ॥

गायत्र्याः प्रथमः पादो द्वितीयश्च तृतीयकः ॥
चतुर्थपाद ॐकारः पंचमः परमार्थकः ॥ २९ ॥

गायत्रीचा प्रथम पाद, द्वितीय पाद व तृतीय पाद प्रसिद्ध आहे. ॐ कार हा तिचा चवथा पाद असून परम तत्त्व हा तिचा परमार्थपर पांचवा पाय आहे.॥२९॥

गणेशो भास्करो विष्णू रुद्रशक्ती च शाश्वतम् ॥
वेदगर्भेषु पूज्यन्ते पंचायतनदेवताः ॥ ३० ॥

गणेश, भास्कर, विष्णु, रुद्र व शक्ति या वेदांमध्यें सांगितलेल्या पंचायतन देवता असून वैदिक गृहस्थ त्यांचें पूजन करितात. ॥ ३० ॥

क्रियाशक्तिर्ज्ञानशक्तिरिच्छाशक्तिस्तथैव च ॥
आदिशक्तिः परा शक्तिः शक्तिः पंचविधा स्मृता ॥ ३१ ॥

क्रियाशक्ति, ज्ञानशक्ति, इच्छाशक्ति, आदिशक्ति, पराशक्ति अशी पांच प्रकारची शक्ति सांगितलेली आहे ॥ ३१ ॥

क्षरं चैवाक्षरं चैव कूटस्थं चात्मनिर्णयः ॥
क्षेत्रज्ञं पंचमं प्रोक्तं विचारः पंच निर्णयः ॥ ३२ ॥

क्षर, अक्षर, कूटस्थ, आत्मनिर्णय व पांचवा क्षेत्रज्ञ हा विचार पंच निर्णय आहे. (विचार केल्यानें आत्म्याच्याच या पांच प्रकारांचा निर्णय होतो असा याचा भावार्थ.) ॥ ३२ ॥

वडवाग्निश्च मंदाग्निरुदराग्निस्तथैव च ॥
शोकाग्निश्चाथ कामाग्निर्ब्रह्माग्निः पंचकं स्मृतम् ॥ ३३ ॥

वडवाग्नि, मंदाग्नि, उदराग्नि शोकाग्नि व ब्रह्माग्नि असे पांच अग्नि आहेत. (त्यांतील उदराग्नीलाच ब्रह्माग्नि म्हणून कामाग्नि या नांवाचा आणखीं एक अग्नि कोणी मानीत असतात.) ॥ ३३ ॥

विषययोगानंदौद्वावद्वैतानन्द एव च ॥
विदेहानन्दो विख्यातो ब्रह्मानन्दश्च पंचमः ॥ ३४ ॥

विषयानंद, योगानंद, अद्वैतानंद, विदेहानंद व पांचवा प्रख्यात ब्रह्मानंद असे पांच आनंद प्रसिद्ध आहेत. ॥ ३४ ॥

नामांतदीक्षा परमार्थनिष्ठा अहं च सोहं च ततश्च कोहं ॥
शिवोऽहमस्मीत्यशिवं विचिंत्य अनामकोऽहं परिपूर्णगुह्यः ॥ ३५ ॥

इति श्रीपद्मपुराणे पंचत्रिंशद्वाक्ये कपिलगीतायां द्वितीयोध्यायः ॥२॥

नामांत दीक्षा जाणून परमार्थाविषयीं अपेक्षा धरावी त्यानंतर अहं (मी) व सोऽहं (तो परमात्माच मी) यांची परीक्षा करून मी कोण हें जाणावें. मी शिव आहें असें चिंतन करून जीव शिवरूप होतो हें वेदाचें सांगणें आहे. यास्तव त्यावर विश्वास ठेवून मी नामरूपशून्य परिपूर्ण व गुह्य आहें हें विसरूं नये. ॥ ३५ ॥

इति श्रीकपिलगीतेचा दुसरा अध्याय समाप्त झाला. ॥ २ ॥

अध्याय ३ रा.

पार्वत्युवाच ।

मृत्युकाले जगन्नाथ काशीपुर्यां हि प्राणिनाम् ॥
उपदेशः कथं तेषां तन्मे ब्रूहि महेश्वर ॥ १ ॥

पार्वती ह्मणाली:-

हे जगन्नाथा, काशीपुरीत प्राण्यांस मृत्युसमयीं तूं उपदेश करतोस. पण त्यामुळें ते मुक्त कसे होतात. ॥ १ ॥

ईश्वर उवाच ।

ॐकारं बिंदुसंयुक्तं नित्यं ध्यायन्ति योगिनः ॥
अस्मिन्मध्ये स्थितं तत्त्वं गुरवो दर्शयन्ति तत् ॥ २ ॥

ईश्वर ह्मणतो ।

योगी जन सतत बिंदुसंयुक्त ओंकाराचें ध्यान करितात. त्या ओंकारांत तें तत्त्व स्थित आहे. ब्रह्मनिष्ठ गुरू तें दाखवितात. ॥ २ ॥

ओमित्येव परं ब्रह्म सर्वं तत्त्वानुग्राहकम् ॥
आब्रह्मस्तम्बपर्यन्तं सर्वानुग्रहकारणम् ॥ ३ ॥

ओं हेंच पर ब्रह्म आहे. तेंच तत्त्वांवर अनुग्रह करणारें आहे. तें आब्रह्मस्तंबपर्यंत जितक्या वस्तु आहेत त्या सर्वांवर अनुग्रह करितें. (ह्मणजे त्या ब्रह्मामुळें त्यांची स्थिति होते.) ॥ ३ ॥

प्रथमं तारकं ब्रह्म द्वितीयं दण्डब्रह्मकम् ॥
तृतीयं कुण्डलं ब्रह्म चतुर्थं ब्रह्म चन्द्रकम् ॥ ४ ॥

पहिलें तारक ब्रह्म, दुसरें दंडब्रह्म, तिसरें कुंडलब्रह्म व चवथें चंद्रक ब्रह्म आहे ॥ ४ ॥

पंचमं बिंदुब्रह्माथ प्रणवे ब्रह्म पंचकम् ॥
वेदगर्भसमुद्भूतं तदेव यन्निरंजनम् ॥ ५ ॥

पांचवें बिंदु ब्रह्म होय. प्रणवांत हीं पांची ब्रह्में स्थित आहेत. जें निरंजन ब्रह्म

तेंच वेदगर्भापासून उत्पन्न झालें आहे (ह्मणजे शुद्धब्रह्म हें वेदोक्ततत्त्व गूढ आहे. माठ्या पुण्यसंचयानें व द्रोघप्रयासानें त्याचा साक्षात्कार होतो.) ॥ ५ ॥

तारकंच भवेद्ब्रह्मा दण्डकं विष्णुरुच्यते ॥
कुंडल्यं हि तथा रुद्रो अर्धचन्द्रः स ईश्वरः ॥ ६ ॥
बिंदुः सदाशिवः साक्षात् प्रणवे पंच देवताः ॥
निरञ्जनस्तदातीत उत्पत्तिस्थितिकारणम् ॥ ७ ॥

ब्रह्मा हें तारक ब्रह्म आहे. विष्णु दंडक ब्रह्म होय. रुद्र कुंडल ब्रह्म व ईश्वर अर्धचंद्र ब्रह्म होय. आणि प्रणवावरील बिंदु हा साक्षात् सदाशिव होय. याप्रमाणें प्रणवामध्यें पांच देवता आहेत. सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व लय करणारा निरंजन परमात्मा त्या पांच देवतांहून व स्थानांहून अगदीं निराळा व विलक्षण आहे॥६॥७॥

ब्रह्मा त्रिकूटस्थानस्थो ह्यकाराक्षरसंज्ञितः ॥
वाग्वैखरी ह्यवस्था तु जागृतिः स्थूलदेहकम् ॥ ८ ॥

ब्रह्मा त्रिकूटस्थानांत स्थित असतो. अकार अक्षर हें त्याचें प्रसिद्ध नांव आहे. वैखरी ही त्याची वाणी, अवस्था जागृति व देह स्थूल आहे. ॥ ८ ॥

ह्रस्वमात्रा हि ऋग्वेदो रजोगुणः प्रकीर्तितः ॥
एतत्तारकं विज्ञेयं रक्तपंकजमध्यगम् ॥ ९ ॥

त्या प्रणवाची ऱ्हस्वमात्रा हाच ऋग्वेद व रजोगुण ह्मणून वर्णन केलें आहे. तारकब्रह्म रक्तकमलाच्या मध्यभागीं असतें (व योगाभ्यासी पुरुष त्यास साक्षात् पहातात.) ॥ ९ ॥

विष्णोस्तु श्रीहटस्थानमुकाराक्षरसंज्ञितम् ॥
दीर्घमात्रा मध्यमा च लिंगदेहस्तथैव च ॥ १० ॥

विष्णूचें श्रीहट हें स्थान आहे. त्याची उकार अक्षर ही संज्ञा आहे. त्याची मात्रा दीर्घ आहे. वाणी मध्यमा व देह लिंगदेह आहे. ॥ १० ॥

स्वप्नावस्था यजुर्वेदो गुणः सत्त्वं प्रकीर्तितः ॥
एतद्दण्डकं विज्ञेयं श्वेतपंकजमध्यगम् ॥ ११ ॥

स्वप्न ही त्याची अवस्था, यजुर्वेद हा त्याचा वेद. व सत्त्व हा गुण आहे. हें दंडक ब्रह्म श्वेतकमळाच्या मध्यभागीं आहे, असें जाणावें व गुरुकृपा संपादन करून वेडन त्याचा साक्षात् अनुभव घ्यावा. ॥ ११ ॥

रुद्रस्य स्थानं गोल्हाटं मकाराक्षरसंज्ञितम् ॥
प्लुतमात्रा हि वक्तव्या तमोगुणः प्रकीर्तितः ॥ १२ ॥

रुद्राचें गोल्हाट हें स्थान आहे. मकार अक्षर असें त्याचें नांव आहे. त्याची मात्रा प्लुत आहे व तमोगुण सांगितलेला आहे. ॥ १२ ॥

कारणं देहकं प्रोक्तं पश्यंती वाक् प्रतिष्ठिता ॥
सुषुप्त्यवस्थया युक्तः सामवेदस्तथैव च ॥ १३ ॥
एतत्कुण्डल्यं विज्ञेयं श्यामपंकजमध्यगम् ॥
सोमेश्वरस्य स्थानं च औटपीठेति निश्चितं ॥ १४ ॥

त्याचा कारणदेह आहे. पश्यन्ती ही वाणी आहे. सुषुप्ती अवस्था व सामवेद आहे. हें कुण्डल्य ब्रह्म असून तें श्यामवर्ण कमळामध्यें स्थित आहे. तें औटपीठ या नांवाचें सोमेश्वराचें स्थान आहे ॥ १३ ॥ १४ ॥

पुण्यगिर्यर्धमात्रा च परा वाचा सदैव हि ॥
तुर्यावस्था तथा देहं महाकारणमुच्यते ॥ १५ ॥
अथर्वणवेदयुक्तं दैवतं चेश्वरो महत् ॥
अर्धचंद्रमिदं प्रोक्तं नीलं सुनीलपंकजम् ॥ १६ ॥

पुण्यगिरिस्थान अर्धमात्रा, परा वाणी, तुर्यावस्था, महाकारण देह, अथर्वणवेद व ईश्वर हें मोठें दैवत यानीं उपलक्षित असलेलें अर्धचन्द्रक नीलकमलांत नीलवर्णानें स्थित असतें ॥ १५ ॥ १६ ॥

सदाशिवस्य स्थानं तु भ्रमरीगुंफकाभिधम् ॥
परात्परः सूक्ष्मवेदः कैवल्यं ज्ञानदेहकम् ॥ १७ ॥

सदाशिवाचें स्थान भ्रमरीगुंफका नामक आहे. परात्पर सूक्ष्म वेद हा त्याचा वेद व कैवल्य हाच त्याचा ज्ञानदेह आहे ॥ १७ ॥

एतदिन्दुरिति प्रोक्तं पीतपंकजमध्यगम् ॥
तारकं च भवेद्ब्रह्मिर्दण्डकं जलमुच्यते ॥ १८ ॥

कुण्डल्यं च तथा तेजो ह्यर्धचन्द्रं च मारुतः ॥
बिन्दुश्चैव तथाऽऽकाशः प्रणवः पंचभूतभृत् ॥ १९ ॥

याला बिंदु असें म्हटलें आहे. तें पीतवर्ण कमलामध्यें असतें. असो; तारक ही भूमि आहे. दंडक हें जल आहे. कुंडल्य तेज आहे. अर्धचंद्र वायु आहे व बिंदु आकाश आहे. याप्रमाणें प्रणव पांच भूतांस धारण करणारा आहे ॥१८॥ १९ ॥

मृत्युस्थितिप्रसर्गित्वं सूर्यचन्द्रात्मतेजसा ॥
तारकं च भवेत्पूर्वे दंडकं पश्चिमे तथा ॥ २० ॥
कुण्डल्यं दक्षिणे भागे अर्धचन्द्रं तथोत्तरे ॥
बिन्दुरूर्ध्वदिशि प्रोक्तः प्रणवे पंच वै दिशः ॥ २१ ॥

सूर्य व चंद्ररूप तेजाच्या योगानें तें प्रणवसंज्ञक ब्रह्म उत्पत्ति, स्थिति व लय यांचें कारण होतें. तारक पूर्वेस असतें. पश्चिमेस दंडक असतें; दक्षिणभागीं कुंडल्य असतें. त्याचप्रमाणें उत्तर दिशेस अर्धचंद्रक असतें व बिंदु ऊर्ध्वदिशेंत असतो. सारांश प्रणवामध्यें पांच दिशा असतात ॥ २० ॥ २१ ॥

एवं देवं हि चात्मानं विज्ञाता स विचक्षणः ॥
नैर्ऋत्यं तारकाकारमीशान्यं दण्डकस्तथा ॥ २२ ॥
कुण्डल्यमग्निदिक्चैव वायव्यमर्धचन्द्रकम् ॥
बिन्दुश्चाधो दिशा प्रोक्ता प्रणवे पंच वै दिशः ॥ २३ ॥

याप्रमाणें देवाला व आत्म्याला जाणणारा पुरुष फार विचक्षण होय. वरील श्लोकांत पांच दिशा सांगितल्या. पण आणखीं पांच राहिल्या आहेत. त्यांचा विभाग प्रणवाचे ठायीं असा करावा. नैर्ऋत्य तारकाकार आहे. ईशान्य दंडक आहे. आग्नेय कुंडल्य आहे. वायव्य अर्धचंद्र आहे व बिंदु ही अधर दिशा आहे. सारांश याप्रमाणें प्रणवाचे ठायीं राहिलेल्या पांच दिशाही आहेत ॥ २२ ॥ २३॥

सर्वाकारमिहोच्येत सर्वगं सर्वतोमुखम् ॥
तारकं सद्योजाताय वामदेवाय दण्डकम् ॥ २४ ॥
कुण्डल्यं तत्पुरुषाय ईशानायार्धचन्द्रकम् ॥
अघोरेभ्यो बिन्दुरिति प्रणवे मुखपञ्चकम् ॥ २५ ॥

हा ओंकार सर्वाकार, सर्वगामी व सर्वतोमुख आहे. त्यामुळें ईश्वराच्या पंचमुखरूपही तो आहे. तारक हेंच त्याचें सद्योजात मुख. दंडक हें वामदेव, कुंडल्य तत्पुरुष, अर्धचंद्रक ईशान व बिंदु हें अघोरमुख होय. याप्रमाणें प्रणवाचे ठायीं पांच मुखें आहेत ॥ २४ ॥ २५ ॥

विश्वावस्थां समाहृत्य विश्वभोगपरायणः ॥ तारकं चैव ऋग्वेदो यजुर्वेदो हि दण्डकम् ॥ २६ ॥ कुण्डल्यं सामवेदोऽयमर्धचन्द्रो ह्यथर्वणः ॥ बिन्दुश्च सूक्ष्मवेदोऽयं प्रणवो वेदबीजकम् ॥ २७ ॥ क्षरं च अक्षरो देवः कूटस्थात्मा च क्षेत्रवित् ॥ अधः शून्यं तारकं च ऊर्ध्वशून्यं च दण्डकम् ॥ २८ ॥ कुण्डल्यं मध्यशून्यं च सर्वशून्यार्धचन्द्रकम् ॥ बिन्दुश्चैव महाशून्यं प्रणवो विश्वतोमुखः॥२९॥

विश्वावस्था व्यापून तो तारक सर्वत्र समभावानें असतो. तो स्वानंदघन सर्व भोग भोगून स्वेच्छेनें क्रीडा करीत रहातो. प्रणवरूपानें तो स्वतः वेदरूप होऊन आपल्या स्वरूपींच क्रीडा करितो. आतां तो वेदरूप कसा झाला आहे तें सांगतों. तारक हाच ऋग्वेद, दंडक हा यजुर्वेद, कुंडल्य सामवेद, अर्धचंद्र अथर्वण, बिंदु हा सूक्ष्मवेद, व प्रणव वेदबीज होय. तें सूक्ष्म वेदबीज क्षराक्षरास व्यापून कूटस्थांत अगदीं समभावानें असतें. तोच क्षेत्रज्ञ होय. आतां शून्यांचा विभाग ऐका. तारक अधःशून्य, दंडक ऊर्ध्वशून्य, कुंडल्य मध्यशून्य, अर्धचंद्रक सर्वशून्य व बिंदु महाशून्य आहे. याप्रमाणें प्रणव विश्वतोमुख आहे ॥ २६ ॥–॥ २९ ॥

शून्यातीतः परात्परो अक्षरं ब्रह्म उच्यते ॥ प्रणवः पररूपोऽयं कारणं ब्रह्मधारणम् ॥ ३० ॥ एवं ब्रह्मात्मसंकाशं वर्धयेज्जगदुद्भवम् ॥ प्रथमं तारकं ब्रह्म द्वितीयं दण्डरूपकम् ॥ ३१ ॥ तृतीयं कुण्डलाकारं चतुर्थमर्धचन्द्रकम् ॥ पंचमं बिन्दुसंकाशं प्रणवः शून्यरूपकम् ॥ ३२ ॥

शून्यातीत प्रणवास परात्पर परमात्मा व अक्षरब्रह्म म्हणतात. हा प्रणव पररूप आहे; ब्रह्माच्या साक्षात्काराचा हाच आधार आहे; हाच ब्रह्मरूपानें सर्वांचें कारण आहे. याप्रमाणें हें सनातन ब्रह्म सर्व जगास उत्पन्न करितें. आतां पंचब्रह्म ऐका. पहिलें तारकब्रह्म, दुसरें दंडकब्रह्म, तिसरें कुंडलाकार ब्रह्म, चवथें अर्धचंद्र

ब्रह्म व पांचवें बिंदुब्रह्म होय. दीर्घअभ्यासीच त्याला जाणतात. स्वतः प्रणव तर शून्य, निरंजन, अव्यक्त व अव्यय असतो ॥ ३० ॥ ३१ ॥ ३२ ॥

अव्ययं चाद्भुतं ब्रह्म सहजाव्यक्तरूपकम् ॥ अव्यक्तोद्भवमाकाश-माकाशान्मारुतस्तथा ॥ ३३ ॥ मारुताज्जायते तेजस्तेजसापस्त-थैव च ॥ अद्भ्यश्च जायते पृथ्वी पृथ्व्या विश्वं च जायते ॥३४॥ विश्वगं ब्रह्म ज्ञातव्यं क्षराक्षरमनामयं ॥ एवं ब्रह्म जगद्व्याप्तं न ज्ञातं पशुमानवैः ॥ ३५ ॥

असें जें अव्यय अद्भुत व स्वभावतःच अव्यक्तरूप ब्रह्म आहे त्यापासून आकाश उत्पन्न होतें. आकाशापासून वायु होतो. वायूपासून तेज उद्भवतें. तेजापासून जल निर्माण होतें. जलापासून पृथ्वी उत्पन्न होते. पृथ्वीपासून सर्व भूतांचा प्रादुर्भाव होतो. त्यांतील चर भूतांमध्यें आत्म्याची ज्ञानकला व्यक्त होते. त्या ज्ञानकलेच्या सामर्थ्यानें त्यांस पुण्यपापाप्रमाणें सुखदुःखानुभव घडतो. सारांश याप्रमाणें तें क्षराक्षररूप ब्रह्म विश्वव्यापी व अनामय (निरुपद्रव) आहे, असें जाणावें. पण हें ब्रह्म याप्रमाणें जगास व्यापून असलें तरी पशुतुल्य मानवांसही त्याचें ज्ञान होत नाहीं मग इतर तिर्यगादि जीवांस त्याचें ज्ञान कसें होणार ? आपल्या स्वाभाविक पशुवृत्तीस स्वप्रयत्नानें प्रतिबंध करून जे सात्विक झालेले असतात त्यांतीलही कांहीं श्रेष्ठांसच अनेकजन्म प्रयास केल्यावर त्याचें साक्षात् ज्ञान होतें ॥३३॥३४॥३५॥

सुज्ञातं सर्वमाचार्यैः सबाह्याभ्यन्तरोदितम् ॥
दृश्यनाशे परं ब्रह्म चाखण्डमव्ययं स्थितम् ॥ ३६ ॥

पण जे आचार्य होऊन गेले आहेत किंवा जे सांप्रतकालीं आचार्यपदारूढ होऊन आत्मनिष्ठ राहिले आहेत त्यांस सबाह्य—अभ्यंतर प्रकाशमय असलेलें तें तत्त्व पूर्णपणें सुज्ञात होतें. कारण या दृश्याचा नाश झाला असतां अखंड व अव्यय परब्रह्म अवशिष्ट रहातें, हें त्यांना पूर्णपणें कळलेलें असतें. व ते भाग्यवान् आचार्य शरीरतः कोणत्याही अवस्थेंत जरी असले तरी विवेकदृष्टीनें त्या सर्वाधार तत्त्वाचेंच अनुसंधान करीत असतात ॥ ३६ ॥

एवं ते दीक्षिता लोकाः सर्वसंदेहवर्जिताः ॥
दीक्षया ब्रह्मरूपाश्च तत्त्वज्ञास्ते व्यवस्थिताः ॥ ३७ ॥

अशा ब्रह्मनिष्ठ गुरूंस यथाशास्त्र शरण जाऊन त्यांच्यापासून दीक्षा घेतली पाहिजे. याप्रमाणें जे दीक्षा घेतात त्यांचे सर्वसंदेह त्या गुरुसमागमानें व त्यांच्या उपदेशामृतप्राशनानें नाहींसे होतात. दीक्षेच्या योगानें ते स्वतः ब्रह्मरूप व तत्त्वज्ञ होऊन राहतात ॥ ३७ ॥

पार्वत्युवाच ।

कथं मात्राः कथं देवः कथं वर्णा वद प्रभो ॥
पृथक्पृथङ्मातृकायां के के वर्णाः प्रतिष्ठिताः ॥ ३८ ॥

पार्वती ह्मणते ।

ईश्वरा! मात्रा कशा व कोठें असतात. देव व वर्ण कोठें असतात. भिन्न भिन्न मात्रांचे ठायीं कोणकोणते वर्ण प्रतिष्ठित आहेत ? ॥ ३८ ॥

ईश्वर उवाच ।

तारकं मूलभूतं स्यादकाराख्या च मातृका ॥
ब्रह्मा तु दैवतं प्रोक्तं रक्तवर्णविराजितम् ॥ ३९ ॥

ईश्वर ह्मणतो ।

पार्वति, तारक मूलभूत आहे. त्याची अकारनामक मात्रा आहे. ब्रह्मा देवता आहे व तें रक्तवर्णविराजित आहे ॥ ३९ ॥

पृथग्वर्णं तथा देवि रक्तपीतं सुशोभितम् ॥
त्रयं सार्धं स्वहस्तानां प्रमाणं देहलक्षणम् ॥ ४० ॥

हे देवि, रक्तपीत हा त्याचा पृथक् वर्ण आहे. तो अतिशय शोभायमान असतो. आपल्या हातानें साडेतीन हात हें ज्याच्या त्याच्या देहाचें प्रमाण आहे ॥ ४० ॥

द्वितीयं दण्डकं ज्ञेयमुकाराख्या च मातृका ॥
विष्णुर्दैवतमाख्यातं श्वेतवर्णविराजितम् ॥ ४१ ॥

दुसरें दंडकब्रह्म. उकारसंज्ञक त्याची मात्रा आहे. विष्णु हें त्याचें दैवत आहे. व तें शुभ्रवर्णानें विराजित असतें ॥ ४१ ॥

पृथग्वर्णं तथा देवि श्वेतकर्बुरराजितम् ॥
अंगुष्ठपर्वहस्तं च प्रमाणं देहलक्षणम् ॥ ४२ ॥

त्याचप्रमाणें हे देवी, त्याचा पृथक्वर्ण शुभ्र व चित्रविचित्र आहे. तें त्या वर्णानें विराजित असतें. त्याच्या सूक्ष्मदेहाचें हाताच्या आंगठ्याच्या पेराएवढें प्रमाण आहे. ॥ ४२ ॥

तृतीयं चैव कुण्डल्यं रुकाराख्या च मातृका ॥
रुद्रो दैवतमाख्यातं श्यामवर्णविराजितम् ॥ ४३ ॥

तिसरें कुंडल्यब्रह्म. मकार ही त्याची मात्रा. रुद्र दैवत. तें श्यामवर्णानें विराजित आहे ॥ ४३ ॥

पृथग्वर्णपंचकं च राजत्येषां च भौतिकम् ॥
ते वर्णाः श्यामगर्भस्था ज्ञातव्याश्च मनीषिभिः ॥ ४४ ॥

त्याचे भौतिक पांच पृथक् वर्ण आहेत. व ते सतत चमकत असतात. ते सर्व वर्ण श्यामवर्णामध्यें रहात असतात. विद्वानांस ज्ञानाच्या योगानें त्यांचा विवेक करितां येतो ॥ ४४ ॥

पर्वार्धं च स्वहस्तस्य प्रमाणं देहलक्षणम् ॥
चतुर्थमर्धचन्द्रं च ईकाराख्या च मातृका ॥ ४५ ॥

आपल्या हाताच्या बोटाचें अर्धें पेर हें त्याच्या देहाचें प्रमाण आहे. असो; चवथें ब्रह्म अर्धचंद्र. ईकार ही त्याची मात्रा ॥ ४५ ॥

ईश्वरो दैवतं प्रोक्तं नीलवर्णविराजितम् ॥
पृथग्वर्णद्वयं चैव नीलं सुनीलकं तथा ॥ ४६ ॥

ईश्वर हें दैवत सांगितलेलें आहे. तें नीलवर्णानें विराजित आहे. नील व सुनील हे त्याचे दोन पृथक् वर्ण आहेत ॥ ४६ ॥

पीतं तृतीयो वर्णस्तु शुद्धश्वेतश्चतुर्थकः ॥
नीलगर्भस्य मध्यस्थं वर्णत्रयमुदाहृतम् ॥ ४७ ॥

पीत हा त्यांतील तिसरा वर्ण असून शुद्ध श्वेत हाही एक चवथा वर्ण तेथें असतो. पण त्यांतील हे (सुनील, पीत व शुद्ध श्वेत) तीन वर्ण नीलवर्णाच्या मध्यभागीं असतात, असें सांगितलें आहे ॥ ४७ ॥

मसुरामात्रप्रमाणं शोभितं देहलक्षणम् ॥
पंचमं बिन्दुसंकाशमेकाराख्या च मातृका ॥ ४८ ॥

देवः सदाशिवो ज्ञेयः पीतवर्णो ह्यनुक्रमात् ॥
पृथग्वर्णस्तु नैवात्र शुद्धस्फटिकदीपवत् ॥ ४९ ॥

. त्याच्या देहाचें प्रमाण मसुरामात्र आहे. असो; पांचवें ब्रह्म बिंदुरूप आहे. एकार हो त्याची मात्रा आहे. सदाशिव हा त्याचा देव. पीत हा त्याचा स्वाभाविक वर्ण आहे. यामध्यें पृथक् वर्ण मुळींच नाहींच. तें शुद्ध स्फटिकदीपाप्रमाणें असतें ४८।४९

प्रमाणं न भवत्येव कैवल्यज्ञानदेहके ॥ ५० ॥

कैवल्यज्ञानदेहास प्रमाणच नाहीं. कारण तो देह साक्षी चैतन्यरूप आहे ॥५०॥

इदं सर्वशिरः पीतशिखं केवलराजितं ॥
पीतः शिखाबिंदुरत्र ब्रह्मसायुज्यकारकः ॥ ५१ ॥

हें ब्रह्म सर्वांत श्रेष्ठ आहे. शंभर कसांच्या सोन्याप्रमाणें त्याची शिखा पीतवर्ण असते. तें निर्विकार तेजानें विराजित असतें ब्रह्मसायुज्य देणारा पीतवर्ण शिखाबिंदु यांत चमकत असतो ॥ ५१ ॥

बिंदुगर्भस्य मध्यस्थं शुद्धश्वेतं सुलक्षणं ॥
सोऽहं मात्रा मुख्यबीजं सर्वांतर्गर्भचारि यत् ॥ ५२ ॥

त्या बिंदूच्या मध्यभागीं शुद्ध, श्वेतवर्ण, सुलक्षण व सर्वांतर्गर्भांत असणारें 'सोऽहं' हें मुख्य बीज असतें ॥ ५२ ॥

सोऽहंबीजस्य मध्यस्थः श्रीरामः परमो महान् ॥
सोऽहं राम इदं ज्ञात्वा अत ऊर्ध्वं न किंचन ॥ ५३ ॥

त्या 'सोहं' बीजाच्या मध्यभागीं श्रीराम असतो. तो परम व महान् आत्मा होय. तो रामच मी हें सर्व चराचर आहे असें जाणल्यावर मग कांहीं राहिलें नाहीं ॥ ५३ ॥

पार्वत्युवाच ।

सोऽहं तारकब्रह्मैव राममंत्रं वद प्रभो ॥
एतच्छ्रवणमात्रेण कृतकृत्याऽस्मि सर्वदा ॥ ५४ ॥

पार्वती ह्मणते ।

प्राणनाथा, सोहं तारक ब्रह्मच राममंत्र आहे. यास्तव तो आतां मला सांगा. ज्याच्या केवळ श्रवणानेंच मी सर्वदा कृतकृत्य होईन ॥ ५४ ॥

ईश्वर उवाच ।

न देयं यस्य कस्यापि प्राणाः कंठगता यदि ॥
देयं सद्भक्तियुक्ताय शांताय समचेतसे ॥ ५५ ॥

ईश्वर ह्मणतात ।

प्रिये, हा गुह्य मंत्र प्राण जाण्याचा प्रसंग जरी आला तरी सामान्य मानवास देऊं नये. तर जो सद्भक्तियुक्त, शांत व सर्व भूतांचे ठायीं समचित्त ठेवणारा असेल त्यालाच हा मंत्र द्यावा ॥ ५५ ॥

गुरुभक्तिरतो नित्यं विरक्तो यः समाहितः ॥
भक्तिर्ज्ञानं विरक्तिश्च हृदि तिष्ठेत्सनातनी ॥ ५६ ॥

जो सतत गुरुभक्तीमध्यें रत असतो आणि जो विरक्त व समाहितचित्त असतो त्याच्या हृदयामध्यें नित्य भक्ति ज्ञान व विरक्ति स्थिर होते, असा नियम आहे ॥ ५६ ॥

तस्मै देयं च देवेशि अन्यथा न प्रकाशयेत् ॥
प्रकाशितं च दुष्टेऽपि निष्फलं जायते ध्रुवं ॥ ५७ ॥

यास्तव हे देवी, तसल्या योग्य अधिकाऱ्यासच उपदेश करावा. इतरांस या मंत्राचा उपदेश कधींही करूं नये. कारण कोरड्या भूमीवर पेरलेलें बीं जसें निष्फळ होतें त्याप्रमाणें अनधिकाऱ्यांस उपदेशिलेला उत्तम उपायही निश्चयानें व्यर्थ जातो. हा बीजमंत्र अति गुह्य आहे. तो प्राणिमात्रास मोक्ष देण्यास समर्थ आहे. ज्याचें वर्णन करितांना वेद स्तब्ध झाले, चित्त थकलें व मन अमन झालें. ज्याच्या आज्ञेनें समुद्र आपल्या वेलेचें उल्लंघन करीत नाहीं, शेष या भूगोलास आपल्या मस्तकीं वागवितो, पृथ्वी चराचर भूतांस आपल्या पाठीवर वहाते, सूर्य सतत सर्व

लोकांस नियमितसमयीं अस्तोदय पावून प्रकाशित करितो, पर्वत स्थिर राहिले आहेत व मेघ योग्यसमयीं वृष्टि करितात त्या परमात्म्याचें तत्व या मंत्राच्या जपानें साक्षात् समजतें ॥ ५७ ॥

अथ मंत्रं प्रवक्ष्यामि मोक्षदं सर्वदेहिनां ॥
ॐहंसःसोहं तथा देवि इत्यादौपाठयेत्सुधीः ॥ ५८ ॥
पश्चाच्छ्रीरामरामाय नमश्चैवाभिनिश्चितं ॥
एवं च तारकं ब्रह्म राममंत्रमिति स्मृतं ॥ ५९ ॥

असो; आतां सर्व देह धारण करणारांस मोक्ष देणारा मंत्र सांगतों. देवी गुरूनें प्रथम ' ॐ हंसः सोहं ' असें मंत्रग्राहक योग्यसाधकाकडून ह्मणवावें. त्यानंतर ' श्रीरामरामाय नमः' असें उच्चारावयास सांगावें. ह्मणजे तो तारक ब्रह्म राममंत्र होतो. 'ॐ हंसः सोऽहं श्रीरामरामाय नमः' एवढा हा सर्व मंत्र आहे. पण ब्रह्मनिष्ठ गुरूपासूनच त्याचें ग्रहण करावें लागतें. त्या वांचून तो सफल होत नाहीं. औषधी, सेती सर्व पृथ्वीभर पसरल्या आहेत पण वैद्यावांचून त्यांचें ज्ञान व उपयोग कळत नाहीं. तोच वैद्याच्या साह्यानें त्यांचा उपयोग केल्यास सामान्य झाडपाल्यांनेंही मोठमोठे रोग नाहींसे होतात; हें प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें श्रीगुरु हा सद्वैद्य आहे. तो या मंत्ररूपी औषधाचा उपयोग करून भवरोगाचा संहार करितो आणि एका क्षणांत सद्भक्तांचा उद्धार करितो ॥ ५८ ॥ ५९ ॥

अथ मंत्राधिकारस्तु सर्वस्याऽत्र न संशयः ॥
ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रो वा ह्यंत्यजोऽपि वा ॥ ६० ॥

आतां या मंत्राच्या जपाचा अधिकार कोणा कोणाला आहे ह्मणून विचारशील तर सांगतों. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र किंवा अंत्यजही याचा अधिकारी आहे यांत कांहीं संशय नाहीं. मनुष्यमात्रानें याचा जप करून आपलें परम हित करून घ्यावें ॥ ६० ॥

षड्दर्शनादिमार्गेषु ब्राह्मदर्शि तथैवच ॥
वर्णेषु वर्णहीनेषु चांडालादिषु निश्चितं ॥ ६१ ॥

षड्दर्शनादि मार्गांमध्यें ब्राह्मदर्शन सर्वोत्तम होय. व त्याच्या तत्त्वाचें ज्ञान आ-

ह्मणादि वर्णी व चांडालादि वर्णहीनही करून घेतात. त्याचें ज्ञान करून घेण्यास कोणालाही प्रतिबंध नाहीं (वेदादिकांच्या अक्षराध्ययनाविषयीं मात्र विशेष नियम आहेत व ते ब्राह्मणादिकांस जसेच्या तसेच पाळले पाहिजेत) ॥ ६१ ॥

यस्य देहे वसेच्छ्रद्धा तस्य देयं शुभानने ॥
मंत्रो देयः प्रथमतः क्षेत्रशुद्ध्यै सुनिश्चितं ॥ ६२ ॥

हे शुभानने, ज्याच्या हृदयांत श्रद्धा असते त्याला तत्त्वज्ञान सांगणें उचित आहे. पण त्याच्या शरीररूपी क्षेत्राची शुद्धि होण्याकरितां प्रथम मंत्र द्यावा हें अगदी निश्चित झालें आहे ॥ ६२ ॥

सप्तकोटिर्महामंत्रा ह्यसंख्या ह्युपमंत्रकाः ॥
एतांश्च सकलान् मंत्रान् न तावच्चेह ब्रूमहे ॥ ६३ ॥

महामंत्र सातकोटी आहेत. आणि उपमंत्र तर असंख्य आहेत. पण त्या सर्व मंत्रांचा नुस्ता नामनिर्देशही आह्मी येथें करणार नाहीं. कारण तसें करूं लागल्यास शब्दब्रह्म अनंत असल्यामुळें फार मोठा विस्तार होईल. पण इतकें मात्र येथें सांगणें अवश्य आहे कीं, त्या सर्व मंत्रांमध्यें प्रणवमंत्र सर्वोत्तम आहे ॥६३॥

सर्वमंत्राधिकाः श्रेष्ठाः पंचायतनमंत्रकाः ॥ गजाननाधिकतरा सूर्यविद्या विशिष्यते ॥ ६४ ॥ सूर्यविद्याधिका देवि विष्णुविद्या विशिष्यते ॥ विष्णुविद्याधिका श्रेष्ठा शांभवी शिववल्लभा ॥ ॥ ६५ ॥ शांभव्या अधिका देवि शक्तिविद्या परा स्मृता ॥ एतच्छ्रेष्ठतरा विद्या एतच्छ्रेष्ठा न विद्यते ॥ ६६ ॥ सर्वविद्याशिरो ह्यस्माच्छ्रीविद्या हि न संशयः ॥ तस्मात् सा सर्वविद्यानां श्रीविद्या शिरसि प्रिये ॥ ६७ ॥

सर्व मंत्रांहून पंचायतन देवतांचे मंत्र श्रेष्ठ आहेत. त्यांची योग्यता सर्वांहून अधिक आहे. त्यांतही गजाननाच्या विद्येहून सूर्यविद्या विशेष आहे. सूर्यविद्येहून विष्णुविद्येची योग्यता अधिक आहे. विष्णुविद्येपेक्षां शिवास प्रिय असलेली शांभवी श्रेष्ठ आहे. हे देवी. शांभवी विद्येहून शक्तिविद्या श्रेष्ठ ह्मणून ह्मटलें आहे. या विद्येहून श्रेष्ठ विद्या नाहीं. ही सर्व विद्यांचें मस्तक आहे ह्मणूनच तिला श्रीविद्या

असें ह्मणतात. यांत संशय नाहीं. तस्मात् हे प्रिये, ती श्रीविद्या सर्व विद्यांच्या मस्तकावर आरूढ झाली आहे ॥ ६४ ॥ ६७ ॥

राजराजेश्वरी विद्या एतन्मुख्या न काचन ॥
सत्यं सत्यं पुनः सत्यं सत्यं सत्यं पुनः पुनः ॥ ६८ ॥

ती राजराजेश्वरी विद्या आहे हिच्याहून मुख्य विद्या दुसरी कोणतीहो नाहीं. हें मी अगदीं सत्य सत्य सांगत आहें ॥ ६८ ॥

सत्यं सत्यं पुनः सत्यं त्रिर्वाचा कथयाम्यहं ॥
अस्याधिका सर्वरिता एतस्मिन्न कथिता तव ॥ ६९ ॥

हें सत्य, सत्य, पुनः सत्य असें त्रिवाचेनें मीं सांगत आहें. हे देवि, हिचा महिमा अपार आहे. त्याला सीमाच नाहीं. तीच आदि शक्ति आहे. व तीच तूं उमा आहेस. या विद्येचें वर्णन करवत नाहीं, वाणी कुंठित होते ॥ ६९ ॥

एतदूर्ध्वं न कस्यापि निश्चितं कथितं शिवे ॥
भाष्यं मे हि पुनर्भाष्यं निश्चयेन ब्रवीम्यहं ॥ ७० ॥

हे शिवे, याहून अधिक निश्चिततत्व मी कोणालाही सांगितलेलें नाहीं. हें माझें प्रमाणभूत भाष्य आहे. मी तुला पुनःनिश्चयानें सांगतों कीं हें भाष्य आहे. मी उगीच कांहीं तरी सांगत नाहीं ॥ ७० ॥

अस्य मंत्रस्य देवेशि नैव न्यासः षडंगकः ॥ नैव ध्यानं भूतशुद्धिर्न च प्राणप्रतिष्ठितिः ॥ ७१ ॥ कवचं न न च स्तोत्रं न च दिग्बंधनादिकं ॥ सिद्धसाध्यसुसिद्धारिघटितार्थं न किंचन ॥ ॥ ७२ ॥ न यंत्रपूजनं चैव पद्धत्या पटलादिकं ॥ सहस्रनामजप्यादि स्तवराजादिकं न च ॥ ७३ ॥ न होमो न क्रिया यस्य धनर्णादि तथा न हि ॥ तस्माद्घटितार्थमेवमुक्तत्वं सर्वदा प्रिये ॥ ७४ ॥

हे देवेशि, या मंत्राचा जप करण्यापूर्वी षडंगन्यास करावयास नको. ध्यानाची गरज नाहीं. भूतशुद्धीची अवश्यकता नाहीं. प्राणप्रतिष्ठा करावयास नको, कवचं

नाहीं. स्तोत्र नाहीं. दिग्बंधनादिक नाहीं. सिद्ध, साध्य, सुसिद्ध, अरिघटितार्थ इत्यादिकांतील कांहीं नाहीं. पद्धतीप्रमाणें यंत्रपूजनादि करावयास नको. पटलादि नाहीं. सहस्रनामजप्यादि नाहीं. स्तवराजादि नकोत. होम नाहीं. क्रिया नाहीं. धन–ऋणादि नाहीं. कारण तारक ब्रह्म सर्वांवर अनुग्रह करणारें व मोक्षदायक आहे. तो सर्वांचें प्रिय करितो. तो पूर्ण असल्यामुळें त्याचें आवाहन करितां येत नाहीं. तो सर्वांचा आधार आहे. तेव्हां त्याला आसन कोणतें देणार ? तो नित्य तृप्त असल्यामुळें त्याला नैवेद्याचीही गरज नाहीं. तर त्याच्या प्राप्तीस शुद्ध भावाची अवश्यकता आहे. सद्भावावांचून ज्ञान होत नाहीं. पार्वती, माझ्या हृदयांत स्थित असलेला हा आत्माराम पवित्र व सुगम आहे. त्याचें हें मंत्ररूपी नाम सतत जपलें असतां सर्व मुक्त होतात ॥ ७१ ॥ ७४ ॥

अतःपरं निरूपणं नास्ति नास्ति कदाचन ॥
संपूर्णो हि प्रिये राम आत्मारामो हि मे हृदि ॥ ७५ ॥

हे प्रिये, यापुढें आतां निरूपण करण्यासारखें कांहीं राहिलें नाहीं. खचितच कांहीं राहिलें नाहीं. संपूर्ण आत्माराम माझ्या हृदयांत स्थित आहे ॥ ७५ ॥

पंचाक्षरं जपेत्पूर्वं मध्ये रामपदं स्मरेत् ॥
अंते पंचाक्षरं जप्त्वा शिवेन समतां व्रजेत् ॥ ७६ ॥

पूर्वी वर सांगितलेल्या ‘ ॐ हंसः सोऽहं ’ या पांच अक्षरांचा जप करावा. मध्यें रामपदाचें ‘ श्रीराम’ असें स्मरण करावें. आणि शेवटीं ‘ रामाय नमः ’ हीं पांच अक्षरें जपावीं. ह्मणजे तो जापक शिवाशीं समतेस प्राप्त होतो. ॥ ७६ ॥

तत्पदं शिवरूपाय त्वंपदं जीवरूपिणे ॥
असीत्येतत्तु रामाय त्रयस्यैक्यं न संशयः ॥ ७७ ॥

महावाक्यांतील तत्पद शिवरूप आहे. त्वंपद जीवरूप आहे. व असि हें पद रामसंज्ञक जीवपरैक्य सांगतें. सारांश, या तीन पदांचा ऐक्य हा अर्थ आहे. यांत कांहीं संशय नाहीं. ॥ ७७ ॥

एकेऽपि हेमकर्तारो जीर्णकायं पुनर्नवं ॥ ऋद्धिं सिद्धिं प्रदातारो ब्रह्मज्ञा न विशेषतः ॥ ७८ ॥ दिव्यौषधीरसरसायनधातुवादे ॥ होरावशीकरणगारुडधन्ववादे ॥ ताले च खड्गगुटिकाजलमंत्र-

वादे ॥ सिध्यंति ते हरिशिवौ च यदि प्रसन्नौ ॥ ७९ ॥ कला-
चतुष्टये युक्तं शिवं साक्षान्न संशयः ॥ ज्ञात्वा गुरुमुखाद्ब्रह्म ब्रह्मै-
वाऽहं न संशयः ॥ ८० ॥

इति श्रीमत्पद्मपुराणे तारकब्रह्म राममंत्रपंथे शिवपार्वतीसंवादे कपि-
लगीतायां हृदयस्थगुह्यनिरूपणं नाम तृतीयोध्यायः ॥ ३ ॥

साधकांतील कित्येक सुवर्णक्रिया (किमया) साधतात. कित्येक नूतन शरीर संपादन करितात. (ह्मणजे दिव्य रसायनानें जीर्ण शरीर सुदृढ करून घेतात.) कित्येक साधनबळानें ऋद्धि व सिद्धि संपादन करितात. पण प्रायः कोणी ब्रह्मज्ञ होत नाहींत. कोणी दिव्य औषधी मिळवितात. कित्येक रसायन धातुवाद शिकतात. वशीकरण व होरा जाणतात. गारुडविद्या धन्ववाद, ताल, खड्ग, इत्यादि सर्व विद्या व कला मंत्रांच्या द्वारा आणि हरीहरांच्या प्रसादानें प्राप्त करून घेतात. पण गुप्त आत्मतत्वाकडे कोणाची प्रवृत्ति होत नाहीं. व गुरुकृपेवांचून तें इतकें सुलभही नाहीं. राम-कृष्णादी अवतारांनींही गुरू केले आहेत. यास्तव गुरुमुखानें या मंत्राची दीक्षा घेऊन व तत्वोपदेश ऐकून ब्रह्मच मी आहें व मी ब्रह्म आहें यांत कांहीं संशय नाहीं, असा निश्चय करावा ॥ ७८ ॥ ७९ ॥ ८० ॥

इति श्रीकपिलगीतेचा तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३ ॥

अध्याय ४ था.

पार्वत्युवाच ।

विहंगो वाहनं यस्य त्रिकचा यस्य भूषणं ॥
सालपा वामभागस्था स देवः शरणं मम ॥ १ ॥

गरुडज्याचें वाहन आहे. कौस्तुभ ज्याचें भूषण आहे व लक्ष्मी ज्याच्या वामभागीं आहे तो देव रक्षक आहे. ॥ १ ॥

परीक्षिच्छ्रवणं चक्रे कीर्तनं नारदः शुकः ॥ स्मरणं शिवप्रऱ्हादौ लक्ष्मीश्च पादसेवनं ॥ २ ॥ अर्चनं पूजनं ध्यानं पृथुराजादिभिः कृतं ॥ वंदनं तूद्धवाक्रूरौ दास्यं तार्क्ष्यहनूमतौ ॥ ३ ॥ सख्यमर्जुनकर्तव्यं बलेश्चात्मनिवेदनं ॥ भक्तिं नवविधां कृत्वा कैवल्यं प्राप्यते परं ॥ ४ ॥

परीक्षित् राजानें जसें श्रवण केलें, नारद व शुक यांनीं कीर्तन केलें, शिव व प्रल्हाद यांनीं स्मरण केलें, लक्ष्मीनें पादसेवन केलें, पृथुराजादिकांनीं अर्चन पूजन व ध्यान केलें, उद्धव व अक्रूर यांनीं वंदन केलें, गरुड व हनूमान् यांनीं दास्य केलें, सख्य अर्जुनानें केलें, व बलीनें आत्मानिवेदन केलें, त्याप्रमाणें नवविधा भक्ति केल्यानें परम कैवल्य प्राप्त होतें. ॥ २ ॥ ३ ॥ ४ ॥

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं ॥
अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनं ॥ ५ ॥

आतां नवविधाभक्ति कोणती तें स्पष्ट सांगतें, विष्णूचें श्रवण, कीर्तन, स्मरण पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन अशी ती नऊ प्रकारची भक्ति आहे. ॥ ५ ॥

वेदांतन्यायमीमांसातर्कन्यायादिकं तथा ॥
चार्वाकादीनि शास्त्राणि षड्दर्शनमपि स्मृतं ॥ ६ ॥

वेदांत, कापिलन्याययोग मीमांसा, तर्क (वैशेषिक) न्याय (गौतम) हीं सहा अस्तिक दर्शनें व चार्वाक, आर्हत (जैन) माध्यमिक, सौत्रान्तिक, योगाचार

व वैभाषिक (हे चार बौद्धांचे भेद) यांचीं सहा नास्तिक दर्शनें अशीं एकंदर बारा दर्शनें मूळ असून इतर मतभेद हे यांचेच भेद आहेत. या बारा दर्शनांचें ज्ञान विचारोपयोगी आहे. ॥६॥

कापालिकश्च जैनश्च जंगमो ब्राह्मणस्तथा ॥
संन्यासी च तथा सोपिऽषड्दर्शनधराः स्मृताः ॥ ७ ॥

कापालिक, जैन, जंगम, ब्राह्मण, संन्यासी, चार्वाक इत्यादि त्या दर्शनांचे प्रवर्तक, संस्थापक, व रक्षक आहेत. ॥ ७ ॥

शैवाः शाक्तास्तथा सौरा गाणपत्यास्तथैव च ॥
जैनाश्च वैष्णवाः प्रोक्ताः षड्दर्शनमयाः स्मृताः ॥ ८ ॥
हस्तः पवित्रो यदि दानपुण्यं पादौ पवित्रौ यदि तीर्थयात्रा ॥
वाक्यं पवित्रं यदि रामनाम हृदं पवित्रं यदि ब्रह्मनिष्ठा ॥ ९ ॥

शैव, शाक्त, सौर, गाणपत्य, जैन, वैष्णव, इत्यादि सर्व संप्रदाय या दर्शनमय आहेत. त्यांस सोडून कोणताही संप्रदाय नाहीं. मन अनात्मपदार्थांपासून स्थिर झालें ह्मणजे या दर्शनाची कांहीं अवश्यकता रहात नाहीं. कारण चित्तैकाग्र्यांत सर्व प्रमेयाचा अंतर्भाव होतो. मन प्रकृतिरूप आहे. त्याला एकेजागीं बांधून ठेवण्याकरितां हीं दर्शनरूप बंधनें देवानेंच निर्मिलीं आहेत. मानवांचे स्वभाव सारखे नसतात. तर सत्त्वादि गुणांच्या योगानें त्यांत विलक्षणता आलेली असते. त्या विलक्षणतेला अनुसरून हीं दर्शनेंही विलक्षणरूपाचीं झालीं आहेत. खरोखर त्या मायेची विचित्र करणी आहे. ती स्वतः दृश्यरूप झालेली असून त्या दृश्यांत आत्मज्योति गुप्त होऊन राहिला आहे. त्यामुळें दृष्टीनें दृश्याचें परिमार्जन केल्यावांचून आत्मज्ञान होणें शक्य नाहीं. आत्मज्ञानावांचून दुसऱ्या कोणत्याही युक्तीनें स्वरूपप्राप्ति होण्याचा संभव नाहीं पण तें ज्ञान फार दुर्लभ आहे. नाना तीर्थें, व्रतें यांच्या योगानेंही तें सुलभ होत नाहीं पण असें असलें तरी दानपुण्य केल्यानेंच हात पवित्र होतो. तीर्थयात्रा केली तर पाय पवित्र होतात. रामनाम उच्चारल्यास वाणी पवित्र होते. आणि ब्रह्मनिष्ठा असल्यासच हृदय पवित्र होतें ॥ ८ ॥ ॥ ९ ॥

ज्ञानं विरागो नियमो यमश्च स्वाध्यायवर्णाश्रमधर्मकर्म ॥
भक्तिः परेशस्य सतां प्रसंगो मोक्षस्य मार्गं प्रवदंति संतः ॥ १० ॥

शास्त्रांचें यथार्थ ज्ञान, विरक्ति, चित्तवृत्तीचा नियम, इंद्रियांचा यम, नियमानें वेदाध्ययन, वर्ण व आश्रम यांस उचित असलेले धर्म व कर्म, परमेश्वराची अनन्य भक्ति, व संतसमागम यांस संत मोक्षमार्ग ह्मणतात ॥ १० ॥

शैवाः पाशुपता महाव्रतधराः कालीमुखा जंगमाः ॥
शाक्ताः कौलकुलार्चनादिनिरताः कापालिकाः शांभवाः ॥
येऽज्ञाः कृत्रिममंत्रतंत्रनिरतास्ते तत्त्वतो वंचिताः ॥
तेषामल्पमिहैकमेव हि फलं सत्यं न मोक्षः परः ॥ ११ ॥

शैव, महाव्रतें धारण करणारे पाशुपत कालीमुख, जंगम, शाक्त, कुलार्चनादिकांत निरत असलेले कौल, कापालिक, शांभव, व असेच दुसरेही कृत्रिम मंत्र तंत्र इत्यादिकांत आसक्त असणारे अज्ञ खरोखर नागवले आहेत. त्यांच्या अज्ञानानें त्यांस ठकविलें आहे. त्यांना केवळ ऐहिक फळच मिळतें. परम मोक्ष कधींही मिळत नाहीं ॥ ११ ॥

चार्वाकाश्चतुराः स्वधर्मनिपुणा देहात्मवादे रताः ॥
नानातर्ककुतर्कभावसहिता निष्ठापरास्तार्किकाः ॥
वेदार्थप्रतिपादकाः सकुशलाः कर्तेति नैय्यायिकास्तेषां
स्वल्पफलं भवेत्तु सततं सत्यं न मोक्षः परः ॥ १२ ॥

चार्वाक मोठे चतुर आहेत. ते देह हाच आत्मा आहे या वादांत निमग्न असतात. तार्किक नाना तर्क व कुतर्क करण्यांत तल्लीन असतात. आपल्या दर्शनावर त्यांची मोठी निष्ठा असते. ते वेदार्थप्रतिपादक असतात ऊहापोह करण्यांत मोठे कुशल असतात. पण ते नैयायिक आत्मा कर्ता आहे असें समजतात. त्यामुळें त्यांना त्यांच्या शास्त्रपरिश्रमाचें अगदीं अल्प फळ मिळतें. त्यांस परम मोक्ष मिळणें शक्य नसतें ॥ १२ ॥

कर्माकर्मविकर्मबोधजनकाः कामार्थमीमांसकाः
सांख्यास्त्यागपराः सदा विविदिषासंन्यासिनः स्नातकाः ॥

योगांगाष्टकबोधकप्रतिभटाः पातंजला न्यायका
योगज्ञानमिदं प्रबोधजनकं सत्यं न मोक्षः परः ॥ १३ ॥

विहित कर्म प्रतिषिद्ध कर्म व कर्मत्याग यांचा बोध कर्ममीमांसक करितात. सांख्य त्यागपरायण असतात. ते सदा ब्रह्मचर्य पाळून विविदिषासंन्यास करितात. पातंजल न्यायांत प्रवीण असलेले योगी अष्टांगयोगाचें प्रतिपादन करण्यांत मोठे शूर असतात. हें योगजन्य ज्ञान आत्मसाक्षात्कारास कारण होतें हें खरें, पण त्या-त्यायोगानें परमोक्ष मिळत नाहीं ॥ १३ ॥

वेदांती बहुतर्ककर्कशमतिश्चाद्वैतसंबोधको ॥
नानावादविवादिनो न निपुणा विज्ञानबोधात्मकाः ॥
कर्तारं प्रवदंति चैव यवनः पापे रता निर्दया ॥
विप्रा वेदरताः समत्वनिरताः सत्यं न मोक्षः परः ॥ १४ ॥

केवळ विवादी वेदान्ती जे असतात ते अनेक तर्क करीत सुटतात व त्यामुळें त्यांची मती कर्कश झालेली असते. ते अद्वैताचें प्रतिपादन करितात. अनेक वाद व विवाद करण्यांतच त्यांना मोठा पुरुषार्थ वाटतो. आह्मी विज्ञानबोधस्वरूप आहों, असें ते वारंवार झपतात खरें, पण जितकें ते बोलतात तितके निपुण नसतात. पापांत रत असलेले निर्दय यवन आत्म्यास कर्ता समजतात. कांहीं ब्राह्मण वेदांमध्यें रत व समत्वामध्यें निमग्न असतात. पण त्यांनाही परमोक्ष मिळत नाहीं ॥ १४ ॥

शून्यार्थप्रतिपादका लघुगुरोर्बोधाज्जिना श्रावका ।
नानातीर्थनिषेवकाः श्रुतिपराः स्मृत्यर्थसंबोधकाः ।
चंडाश्चंडविचंडजल्पकमहाभेदाः सदा वैष्णवाः ॥
सर्वे वै प्रपतंति दुःसहतरे सत्यं न मोक्षः परः ॥ १५ ॥

सामान्य गुरूच्या बोधानें श्रावक जिन शून्यार्थप्रतिपादक बनतात. श्रुति व स्मृति यांस प्रमाण मानणारे दुसरे कित्येक ब्राह्मण नाना तीर्थांचें सेवन करितात. वैष्णव सदा स्वभावतः उग्र आणि उग्र व तीक्ष्ण भाषण करणारे असतात. पण हे सर्व अति दुःसह भवसागरांत पडतात. खरोखर त्यांस मोक्ष मिळत नाहीं ॥ १५ ॥

प्राणापाननिरोधनार्थनिरताः संस्थाप्यते शेषका
वायुं पूरककुंभकं प्रतिदिनं तं रेचकं वा हठात् ॥
जिव्हादोहनकर्मिकाः सुरसिका लंबायना लंबिका
योगांगैश्च विभूषिताश्च सततं सत्यं न मोक्षः परः ॥ १६ ॥

शेषाचा अवतार जो पतंजली त्याच्या पातंजल दर्शनाचा अभ्यास करून प्राण व अपान वायूंचा निरोध करण्यांत निमग्न झालेले योगी वायूची स्थापना करून हठानें (बलात्कारानें) प्रत्यहीं पूरक, रेचक व कुंभक करितात. ते जिव्हेला तालू मध्यें शिरकवुन तिला हालविण्याचा प्रयत्न करीत असतात. ते अतिशय रसिक असतात. ते लंबिकायोगही साधतात. यमनियमादि योगांगांनीं सतत भूषित असतात पण इतकी सर्व खटपट करूनही त्यांस मोक्षाचा लाभ होत नाहीं ॥ १६ ॥

यं शैवाः समुपासते शिव इति ब्रह्मेति वेदांतिनो ।
बौद्धा बुद्ध इति प्रमाणपटवः कर्तेति नैय्यायिकाः ॥
अर्हन्नित्यथ जैनशासनरताः कर्मेति मीमांसकाः ।
सोऽयं वो विदधातु वांच्छितफलं सत्यं न मोक्षात् परं ॥ १७ ॥

शैव ज्याची शिव या नांवानें उपासना करितात, वेदान्ती ज्यास ब्रह्म असें म्हणतात व त्याचेंच अनुसंधान करितात, बौद्ध ज्याला बुद्ध या नांवानें ओळखितात, प्रमाणांत कुशल असलेले नैयायिक ज्यास कर्ता असें म्हणतात, जैनाच्या शासनांत रत असणारे ज्यास अर्हम् असें म्हणतात, मीमांसक ज्यास कर्म या नांवानेंच आळवितात, तो हा परमात्मा तुम्हां सर्व भक्तांस वांच्छित फल देवो. खरोखर मोक्षाच्या पलीकडे सत्य म्हणून कांहीं नाहीं ॥ १७ ॥

सौराः सूर्यमुपासते च सततं शाक्ताश्च शक्तिं तथा ।
गाणेशेषु परं गणेशभजनं विष्णुं भजेद्वैष्णवः ॥
शैवानां शिवपूजनं परमकं विप्रे च सर्वात्मकं ।
नानादैवतवांच्छितार्थवरदं सत्यं न मोक्षात् परं ॥ १८ ॥

सौर सूर्याची सतत उपासना करितात. शाक्त शक्तीची उपासना करितात. गाणपत्य गणेशभजन श्रेष्ठ मानितात. वैष्णव विष्णूस भजतो. शैवांस शिवपूजन अ-

धिक मान्य आहे व सामान्य ब्राह्मण सर्वात्मक ईश्वराची पूजा करितो. कारण तो देव देवतांस इष्ट असलेले वरही देत असतो पण मोक्षाहून श्रेष्ठ दुसरें कांहीं नाहीं व तो ज्ञानावांचून मिळत नाहीं ॥ १८ ॥

नानाचित्रविचित्रवेषशरणा नानामते भ्रामका ॥
नानातीर्थनिषेवका जपपरा मौनस्थिता नित्यशः ॥
सर्वे चोदरसेवकास्त्वभिमता वादे विवादे रता ॥
ज्ञानान्मुक्तिरिदं वदंति मुनयस्त्वप्राप्य सा दुर्लभा ॥ १९ ॥

कांहीं लोक अनेक चित्रविचित्र वेष धारण करितात. नाना मतांमध्यें भ्रमण करितात. अनेक मतांची स्थापना करितात. विविध तीर्थांचें सेवन करितात. जपपरायण होऊन रहातात. सतत मौन धारण करून बसतात. पण ते सर्व उदराचे सेवक आहेत, असें मानलेलें आहे. ते वाद व विवाद यांत निमग्न असतात. मुनिजन ज्ञानाच्या योगानें मुक्ति मिळते असें ह्मणत असतात. वास्तव ज्ञानाच्या अभावीं ती दुर्लभ होय ॥ १९ ॥

ज्ञानमात्रेण मुच्यंते नानासाधनवर्जिताः ॥
साक्षात्कारपरं ज्ञानं प्राप्यते गुरुराजतः ॥ २० ॥

यावर सांगितलेल्या प्रकारच्या अनेक साधनांनीं असलेले पुरुषही केवळ ज्ञानानें मुक्त होतात. साक्षात्कारपर ज्ञान गुरुराजापासून प्राप्त होतें ॥ २० ॥

शाश्वतानन्दशान्तत्वं पूर्णरूपस्वरूपकं ॥
तुष्टत्वं चाचलत्वं च षडैश्वर्यादि प्राप्यते ॥ २१ ॥

शाश्वत आनंद, शांति, व अखंड सत्ता हें पूर्ण आत्मस्वरूप आहे. साधकास ज्ञानाच्या योगानें त्याचीच प्राप्ति होते. तो षडैश्वर्यसंपन्न होतो. समुद्रांत पडलेला जलबिंदु जसा त्या समुद्रजलाहून निराळा राहूं शकत नाहीं, त्याप्रमाणें ज्याला आत्मज्ञान झालें आहे असा साधक अखंड आनंदरूप आत्म्याहून निराळा रहात नाहीं. बिंबप्रतिबिंब न्यायानें मन आत्मरूप होऊन गेल्यावर द्वैतभाव विरून जाणें अगदीं साहजिक आहे. ज्याला आठवण, विस्मरण, निद्रा, स्वप्न, जागर, यांतील कशाचीही उपमा देतां येत नाहीं असा शुद्ध विचार ह्मणजेच तें तत्व होय. षडै-

ऐश्वर्य म्हणून म्हटलें कीं तेथें मूळ माया आली. यास्तव त्याच्याही नादीं न लागतां आत्मरूप होऊन रहावें. घट, गृह, वृक्षाची ढोल, पात्र इत्यादिकांतील आकाशाकडे पाहून आकाशाचा भेद झाला आहे, असें वाटतें; पण वस्तुतः तें अखंड असतें. त्याप्रमाणें प्रति जीवामध्यें आत्म्याचा भेद झाला आहे असें जरी सकृद्दर्शनीं वाटलें तरी विचारानें तो अखंड आहे. कोणत्याही शरीराच्या योगानें त्याचा भेद होत नाहीं, असें जाणावें. ह्या गोष्टी नुस्त्या बोलण्यानें कळत नसतात; तर मौन धारण करून त्यांचा अनुभव घ्यावा लागतो ॥ २१ ॥

आतां ऋषिसिद्ध व कपिल यांचा एकदां संवाद कसा झाला तें सांगतां.

ऋषिसिद्ध उवाच ।

जलस्नानाद्वहिःशुद्धिरंतःशुद्धिः कथं भवेत् ॥
योगिनां च कुतः स्नानं कृपालो कपिलोच्यतां ॥ २२ ॥

ऋषिसिद्ध म्हणतात ।

हे कृपालो कपिल मुने, जलानें स्नान केलें असतां बाह्य शरीराची शुद्धि होते. पण अंतःशुद्धि कशी होईल ? योग्यास स्नान कसें घडतें तें सांगा ॥ २२ ॥

कपिल उवाच ।

वामनासापुटे हीडा पुटे दक्षे च पिंगला ॥
गांधारी वामकर्णे च हस्तिनी दक्षिणे तथा ॥ २३ ॥
सुषुम्ना चांगदा प्रोक्ता जिव्हाग्रे च सरस्वती ॥
वामनेत्रे चक्षुषा तु दक्षिणेऽलंबुषा मता ॥ २४ ॥

कपिल म्हणतो ।

डाव्या नाकपुडींत इडा, उजव्या नाकपुडींत पिंगला, डाव्या कानांत गांधारी, उजव्या कर्णांत हस्तिनी, सुषुम्नेलाच अंगदा म्हणतात. जिव्हाग्रावर सरस्वती, डाव्या नेत्रांत चक्षुषा व उजव्या नेत्रांत अलंबुषा नाडी असते ॥ २३ ॥ २४ ॥

कुहूर्गुदस्था संप्रोक्ता शंखिनी लिंगसंस्थिता ॥
मूत्रद्वारे वारुणी स्यात् सर्वांगे च पयस्विनी ॥ २५ ॥

गुदेमध्यें कुहू, लिंगाचे ठायीं शंखिनी, मूत्रद्वारीं वारुणी व सर्वांगांत पयास्विनी नाडी आहे ॥ २५ ॥

नाड्यो द्वादश संप्रोक्ताः शरीरे सुव्यवस्थिताः ॥
व्याप्नुवंति दशद्वारं चराचरनियामकाः ॥ २६ ॥

याप्रमाणें बारा नाड्या सांगितलेल्या आहेत. त्या शरीरामध्यें अतिशय व्यवस्थित असतात. त्या दहा द्वारांत फिरत असतात. हा नाड्यांचा विलास चराचर भूतांमध्यें एकसारखाच होत असतो. (ह्म० त्याच त्यांचें नियमन करितात) ॥ २६ ॥

इडा भागीरथी गंगा पिंगला यमुना नदी ॥
सुषम्ना गंडकी प्रोक्ता कृष्णावेण्यौ सरस्वती ॥ २७ ॥

इडा ही भागीरथी गंगा आहे. पिंगला यमुनानदी आहे. सुषुम्नेला गंडकी ह्मणून ह्मटलें आहे. सरस्वती नाडीला कृष्णावेणी ह्मणतात ॥ २७ ॥

कुहूश्च नर्मदा ज्ञेया तापी स्याच्छंखिनी तथा ॥
गांधारी चापि कावेरी वारुणी गौतमी तथा ॥ २८ ॥
ताम्रपर्णी सुषानाडी सिंधुर्ज्ञेया च हस्तिनी ॥
गोमत्यलंबुषा चैव पूर्णा पूर्णपयस्विनी ॥ २९ ॥

कुहु हीच नर्मदा आहे. शंखिनी ह्मणजे तापी. गांधारी हीच कावेरी नदी आहे. वारुणी नाडीच गौतमी नदी आहे. चक्षुषानाडी हीच ताम्रपर्णी होय. सिंधुनद ही हस्तिनी नाडी आहे. पूर्णपयस्विनी नाडीच अलंबुषा गौतमी नदी जाणावी ॥ २८ ॥ २९ ॥

इति नाडी नदी प्रोक्ता शरीरे वर्तते सदा ॥
पवनं च तुरीयं च सर्वतः स्नानमुच्यते ॥ ३० ॥

याप्रमाणें नाड्यांचे ठायीं नद्यांची कल्पना करावी. व त्या सर्व नद्या स्वशरीरांत आहेत असें जाणावें. योगमार्गानें जाऊं लागलें ह्मणजे यांची योग्यता कळते. अनुभवावांचून ही सूक्ष्म व्यवस्था ध्यानांत येत नाहीं. मन व प्राणवायु यांचा हा सर्व खेळ आहे. त्या दोघांचा निरोध केला असतां परम सुख होतें. त्या सुखाचा

अनुभव आत्म्याचें तुर्य–साक्षिस्वरूप घेतें. ही अवस्था ज्यास भाग्यवशात् प्राप्त झाली, त्याला सर्व तीर्थांचें स्नान घडतें व त्यानें सर्व व्रतें केल्यासारखीं होतात ॥ ३० ॥

गंगायमुनयोर्मध्ये बालरंडां तपस्विनीं ॥
बलात्कारेण गृण्हीयात्तद्विष्णोः परमं पदं ॥ ३१ ॥

आतां त्या तुर्येच्या भोगाचें लक्षण सांगतों. गंगा व यमुना यांच्या मध्यें एक तपस्विनी बालविधवा आहे. तिचा बलात्कारानें जो भोग घेतो तो विष्णूच्या परम पदास पोंचतो. येथें सांगितलेला उपाय ही योगाची खूण आहे ती अभ्यासावांचून कळणार नाहीं. निरंजन ग्रामामध्यें रहाणारे अनुभवी व आत्मनिष्ठ राजयोगीच त्या बालविधवेवर निर्भयपणें बलात्कार करूं शकतात ॥ ३१ ॥

जलस्नानं मलत्यागि भस्मस्नानाद्बहिः शुचिः॥
मंत्रस्नाच्छुचिश्रान्तर्ज्ञानस्नानात्परं पदं ॥ ३२ ॥

आतां स्नानाचें लक्षण सांगतों. जलस्नानाच्या योगानें अंगावरील मळ जातो. भस्मस्नानाच्या योगानें त्वचेची शुद्धि होते. मंत्रस्नानाच्या योगानें अंतःशुद्धि होते आणि ज्ञानामध्यें यथेच्छ डुंबणें हें परम पदप्राप्तीचें साधन आहे. ज्ञानतीर्थापुढें सर्व तीर्थें तुच्छ आहेत त्यांत जे न्हातात त्यांस पुनः जन्म घ्यावा लागत नाहीं. खरोखर तेच धन्य होत. स्वरूपजळांत मन बुडून जातें. या ज्ञानस्नानाच्या योगानें जन्ममरणरूपी मळ धुवून निघतो. प्रत्येक जीव अनेक योनींतून फिरत शेवटीं या मानवकोटींत फार दिवसांनीं येतो. यास्तव कपिलाषष्ठीसारखाच हा महा-योग व महापर्वकाळ आहे असें जाणून प्रत्येक नरानें नारायण होण्याकरितां या ज्ञाननदींत प्रत्यहीं अनेकदां स्नान करावें. यांत कितीही डुंबत राहिलों तरी सर्दी होण्याची किंवा ताप येण्याची भीति नाहीं. उलट त्यांचा नाशच होईल ॥ ३२ ॥

अंतःस्नानविहीनस्य बहिःस्नानेन किं फलं ॥
मलयाचलसंभूतो न वेणुश्चन्दनायते ॥ ३३ ॥

अहो ! ज्यानें अंतःस्नान केलें नाहीं त्याच्या बहिःस्नानाचा काय उपयोग ? दग-डाला वरून कितीही धुतलें म्हणून त्याच्या अंतर्भागास काय होणार ? तो कोर-डाच. त्याप्रमाणें या अस्थि–मांसाच्या पिंडास कितीही सुवासिक तेलें, उटणें

इत्यादि लावून घांसून व पुसून जरी स्वच्छ केलें तरी त्याच्या अंतर्भागावर कोणता परिणाम होणार ! मलय पर्वतावर उगवलेला वेळु चंदन होत नसतो ॥ ३३ ॥

मंत्रस्नानाच्छुद्धचित्तः स चांतःशुद्धिमाप्नुयात् ॥
अंतर्बहिश्च शुद्ध्यर्थं ज्ञानस्नानं च मोक्षदं ॥ ३४ ॥

मंत्रस्नानाच्या योगानें चित्त शुद्ध (ह्मणजे रागद्वेषादि मलरहित) होतें हें खरें, पण त्यामुळें बाह्यशुद्धीचा लाभ होत नाहीं. केवळ अंतःशुद्धीच मात्र होते. यास्तव अंतर्बहिःशुद्ध्यर्थ ज्ञानस्नान करावें. तें मोक्ष देणारें आहे हें वर सुचविलेंच आहे. अग्नि स्वतःलाच जाळूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें ज्ञान्याला पापपुण्याचा स्पर्श होत नाहीं ॥ ३४ ॥

वटबीजेऽपि सूक्ष्मेऽपि मायया गुणयुक्तया ॥
यदस्ति सर्वतो वृक्षः कुत आयाति तद्वद् ॥ ३५ ॥

सत्वादि गुणयुक्त मायेचें हें जगद्रूपी विचित्र कार्य आहे. वटबीज किती सूक्ष्म असतें ! पण त्यामध्यें पुढें होणारा अवाढव्य वटवृक्ष रहातो कीं नाहीं ? तो जर त्यांत नसता तर त्यापासून उत्पन्नलाही नसता. त्याच न्यायानें हें विस्तृत जग त्या मायायुक्त सूक्ष्म चैतन्यात्म्यामध्यें असतें. आणि समुद्रामध्यें त्याच्याचपासून जशा लाटा उठतात त्याप्रमाणें त्या शबलब्रह्मामध्यें त्याच्याचपासून हें सर्व उत्पन्न होतें ॥ ३५ ॥

तथैवाभ्यंतरे शुद्धे बहिः शुद्ध्यंति तत्क्षणात् ॥
बीजवृक्षादिन्यायेन सर्वत्रैक्याच्छुचिर्भवेत् ॥ ३६ ॥

बाह्य शुद्धीपेक्षां अंतःशुद्धीची योग्यता अधिक आहे. कारण आभ्यंतर शुद्ध झालें असतां. तत्काल बहिःशुद्धि होते. कारण बीजवृक्षन्यायानें आभ्यंतर व बाह्य यांचें ऐक्य आहे. त्यामुळें बीजाला केलेले संस्कार वृक्षामध्यें जसे अनुवृत्त होतात पण वृक्षाला केलेले संस्कार बीजांत अनुवृत्त होत नाहींत त्याप्रमाणें आभ्यंतरशुद्धि बाह्यशरीरावर परिणत होते. पण बाह्यशुद्धि अंतःकरणावर फारसा परिणाम करीत नाहीं ॥ ३६ ॥

नैकतत्त्वस्वरूपं चेदुत्पन्नं ज्ञानमश्नुति ॥
अहं ममेति चाज्ञानभ्रमतो ह भ्रमेद्वृथा ॥ ३७ ॥

एक तत्त्वस्वरूप जर कळलें नाहीं तर उत्पन्न झालेलें शाब्दिक ज्ञान व्यर्थ होतें. मी व माझें या अज्ञानजन्य भ्रमामुळें प्राणी व्यर्थ भ्रमांत पडतो ॥ ३७ ॥

दुर्लभो विषयत्यागी दुर्लभं तत्त्वदर्शनं ॥
दुर्लभा सहजावस्था सद्गुरोः करुणां विना ॥ ३८ ॥

विषयांचा त्याग करणारा पुरुष दुर्लभ आहे. तत्त्वदर्शन त्याहूनही दुर्लभ आहे व सद्गुरूच्या करुणेवांचून सहज अवस्था तर फारच दुर्लभ आहे ॥ ३८ ॥

ऋषिसिद्ध उवाच ।

कथं भगवतो ज्ञानं शुद्धमत्यन्तमुद्भवेत् ॥
तत्रोपायं मुने ब्रूहि मयि तेऽनुग्रहो यदि ॥ ३९ ॥

ऋषिसिद्ध ह्मणतो ।

हा मुने, मजवर जर तुझा अनुग्रह असेल तर भगवानाचें अत्यंत शुद्ध ज्ञान कसें उद्भवेल तें सांग. त्या ज्ञानाचा उपाय मला सांगा ॥ ३९ ॥

कपिल उवाच ।

जाग्रत्स्वप्नसुषुप्त्यादिप्रपंचो यत्प्रकाशितः ॥
तद्ब्रह्माहमिति ज्ञात्वा सर्वबंधात्प्रमुच्यते ॥ ४० ॥

कपिल ह्मणतो ।

जाग्रत्, स्वप्न व सुषुप्ति या तीन अवस्थामय प्रपंच ज्याच्या कडून प्रकाशित होतो व ज्याच्या सत्तेनें त्यांचा अनुभव येतो तें ब्रह्म होय, असें जाणल्यानें प्राणी सर्व बंधांतून मुक्त होतो ॥ ४० ॥

त्रिषु धामसु यो भोगी भोक्ता भोग्यं च यद्भवेत् ॥
तेभ्यो विलक्षणः साक्षी चिन्मात्रोऽहं सदाशिवः ॥ ४१ ॥

या जाग्रदादि तीन धामांमध्यें जो भोक्ता, भोग व भोग्य आहे. त्याहून विलक्षण असलेला चिन्मात्र साक्षीच मी सदाशिव आहें, असें ज्ञानी जाणतो॥ ४१॥

एको देवः सर्वभूतेषु गूढः सर्वव्यापी सर्वभूतांतरात्मा ॥
सर्वाध्यक्षः सर्वभूताधिवासः साक्षी चेता केवलो निर्गुणश्च॥४२॥

हा एकच स्वयंप्रकाश देव सर्वभूतांमध्यें गूढ आहे. तो सर्वव्यापी आहे. सर्व भूतांचा अंतरात्मा आहे. सर्वांचा अध्यक्ष आहे. सर्व भूतांचा आधार आहे. बुद्ध्यादिकांचा साक्षी आहे. चैतन्यरूप आहे. केवल आहे व निर्गुण आहे. तो उपाधिशून्य असल्यामुळें त्याला केवल ह्मणतात ॥ ४२ ॥

पिंगला द्वादशादित्या इडेंदुः षोडशांशभाक् ॥ पंचान्तःकरणानि स्युः प्राणानां पंचकं तथा ॥ ४३ ॥ ज्ञानेंद्रियाणि पंचैव पंच कर्मेंद्रियाणि वै ॥ विषयाः पंच वै प्रोक्ता विकल्पानां च पंचकं ॥ ४४ ॥ विकाराः षण्मतास्तेन देहस्यात्मप्रवर्तनं ॥ एवं गुणास्तु सर्वत्र कलाकाष्ठाचतुर्थकं ॥ ४५ ॥

पिंगला नाडी हेच १२ आदित्य आहेत. इडा हा सोळा अंशांचा चंद्र होय. अंतःकरणें पांच (अन्यमतानें चार) आहेत. प्राणाचेही पांच भाग आहेत. ज्ञानेंद्रियें पांच आहेत. कर्मेंद्रियें पांच आहेत. विषय पांच आहेत. विकल्प पांच आहेत व विकार सहा आहेत. यांच्या योगानें आत्मा देहास प्रवृत्त करितो. हे गुणपरिणाम सर्व चराचर पदार्थांत असतात. स्थावर वस्तूंमध्येंही आत्मसत्तेबरोबर हे सर्व रहातात. पण त्यांस व्यक्त होण्यास तेथें योग्य स्थान नसल्यामुळें त्यांचा अनुभव येत नाहीं ॥ ४३-४५ ॥

इक्षुदंडे शर्करा च श्रीखंडे च सुवासितं ॥
क्षीरे यथाऽऽज्यं प्राप्तव्यं तिले तैलं तथाऽऽत्मनां ॥ ४६ ॥

उसांत साखर असते, पण तिला मोठ्या प्रयत्नानें बाहेर काढावी लागते. चंदनांत सुवास असतो, पण चंदनास घासल्यावांचून तो व्यक्त होत नाहीं. दुधांत घृत असतें पण त्यास तापवून, विरजून, घुसळून व कढवून व्यक्त करावें लागतें. तिळांत तेल असतें, पण त्यांस घाण्यांत घालून रगडल्यावांचून तें हातीं लागत नाहीं. त्याप्रमाणें आत्मा वस्तुमात्रांत आहे. पण त्याचा साक्षात्कार आळस सोडून दीर्घ काळ सतत व मोठ्या आदरानें अभ्यास केल्यावांचून होत नाहीं ॥ ४६ ॥

अभ्यासेन विनाऽप्राप्यो गुरुवाक्येन निश्चितः ॥
स्वात्मा च हृदि पद्मे हि विज्ञेयो ज्योतिरात्मकः ॥ ४७ ॥

गुरुवचनीं निश्चय ठेवून अभ्यास करावा. विचार करावा. त्यावांचून आत्मा अप्राप्य आहे. अभ्यास, वैराग्य व विचार यांच्या योगानें आपल्या हृदयकमलांत असलेला ज्योतिःस्वरूप स्वात्मासाक्षात होतो ॥ ४७ ॥

प्रथमं तु शिरःपद्मं नेत्रपद्मं द्वितीयकं ॥
तृतीयं कर्णपद्मं च मुखपद्मं चतुर्थकं ॥ ४८ ॥
पंचमं करपद्मं वै षष्ठं चरणपद्मकं ॥
सप्तमं नाभिपद्मं च हृत्पद्मं चाष्टमं स्मृतं ॥ ४९ ॥

पहिलें शिरःकमल, दुसरें नेत्रकमल, तिसरें कर्णकमल, चवथें मुखकमल, पांचवें हस्तकमल, सहावें चरणकमल, सातवें नाभिकमल, व आठवें हृदयकमल सांगितलेलें आहे ॥ ४८ ॥ ४९ ॥

अष्टपद्मात्परं ब्रह्म सूक्ष्मं हृदयपंकजं ॥
चक्रातीतं परस्थानं सूक्ष्ममोंकारसंज्ञितं ॥ ५० ॥

या आठही कमलांहून श्रेष्ठ, ओंकार संज्ञक, सूक्ष्म हृदयकमलाचें आधारस्थान चक्रातीत व अति सूक्ष्म ब्रह्म आहे ॥ ५० ॥

हृत्पद्मकर्णिकामध्ये शुद्धविज्ञानतत्परं ॥
अंगुष्ठमात्रममलं पश्यंत्येकांतमीश्वरं ॥ ५१ ॥

हृदयकमलाच्या कर्णिकेमध्यें शुद्ध विज्ञानपर, अंगुष्ठमात्र, निर्मल व सर्वांत असणारा ईश्वर असतो. त्यास चित्तवृत्तिनिरोध करून पहावें ॥ ५१ ॥

रात्रौ स्थूलं च विश्रांतं मध्ये दीपस्य स्थापनं ॥
सार्धहस्तत्रिकच्छेद्यं तत्र तिष्ठेच्च लोकयन् ॥ ५२ ॥

रात्रौ या साडेतीन हात स्थूलदेहांत अगदीं पुरोभागीं स्थापिलेल्या मोठ्या व शांत आत्मज्योतिर्मय दीपास पहात रहावें ॥ ५२ ॥

लोक्यमानस्य दीपस्य मध्ये नीलं च दृश्यते ॥
नीलमध्ये तथा पश्येद्यो वै द्रष्टा स उत्तमः ॥ ५३ ॥

त्या दीपाकडे पाहत राहिलें म्हणजे त्यांत नील बिंदु दिसूं लागतो. तसा तो दिसूं लागणें हेंच सिद्धीचें पूर्व शुभ चिन्ह होय. कारण तो नील बिंदु हेंच निजस्थान होय. त्याच्याकडेच पहात रहावें. असें जो करितो तोच उत्तम द्रष्टा होय ॥ ५३ ॥

तत्रैव पश्यतो यस्य निमेषोन्मेषवर्जितं ॥
यदा दृष्टिः स्थिरा भूयात् सोंऽतर्लक्षी तदोच्यते ॥ ५४ ॥

त्याच्याच ठायीं चित्त स्थिर करावें. त्याला नेत्रांचें निमिषोन्मेषही करूं देऊं नये. अशा रीतीनें त्याचे ठायीं दृष्टि स्थिर झाली म्हणजे तो साधक अंतर्लक्षी या संज्ञेस प्राप्त होतो ॥ ५४ ॥

अंतर्लक्ष्यविहीनस्य बहिर्लक्ष्यं निरर्थकं ॥
लक्ष्यालक्ष्यस्य वै लक्ष्यलक्षितं स्वयमात्मनि ॥ ५५ ॥

अंतर्लक्ष्य शून्य असलेल्या पुरुषाचें बहिर्लक्ष्य निरर्थक आहे. लक्ष्याचा विषय न होणारें ब्रह्म एकाग्र चित्तामध्यें आपोआप लक्ष्यलक्षित होतें ॥ ५५ ॥

यथा वारि मरुध्दूतं नानाकारं विलोक्यते ॥
तथैव कल्पना यस्य चिद्ब्रह्मणि स मुह्यति ॥ ५६ ॥

जल वायूच्या योगानें हालूं लागलें कीं, तें अनेक आकाराचें होतें. त्याप्रमाणें मनाच्या चंचलतेमुळें ज्याच्या चिद्ब्रह्मामध्यें अनेक कल्पना उठतात तो मोहित होतो. त्याचा आत्मविवेक पार नाहींसा होतो ॥ ५६ ॥

दृष्टिद्वयसमत्वेन गुरुलब्धेन यो युतः ॥
ज्ञातव्यस्तेन वै सूर्यश्चित्तं स्थिरमिदं यतः ॥ ५७ ॥

गुरूपासून प्राप्त झालेल्या दोन दृष्टींनीं जो युक्त असतो त्यालाच हा स्वयंप्रकाश सूर्य जाणण्यास योग्य होतो. कारण योग्यदृष्टीनें हें चंचल चित्त स्थिर होतें. चित्ताच्या ऐकाग्र्यातांचून इतर सर्व उपाय व्यर्थ आहेत, हें वर सांगितलेंच आहे ॥ ५७ ॥

मीनः स्नानरतः फणी पवनभुङ्मेषस्तु पर्णाशनो ॥
नैराश्यं ह्यपि चातकः प्रतिदिनं शेते बिले मूषकः ॥
भस्मोद्धूलितविग्रहः खलु खरो ध्यानानुरक्तो बकः ॥
सर्वेषां फलमेव नास्ति सकलं ज्ञानप्रधानं तपः ॥ ५८ ॥

केवळ स्नानानें मोक्षच होणें जर शक्य असतें तर सदा पाण्यांत राहून स्नान करणारे मासे मुक्त झाले असते. वायुभक्षण करून अनेक वर्षें घालविणें हें सुद्धां मोक्षाचें साधन नव्हे. कारण तसें असतें; तर सदा वायु भक्षण करून रहाणारे सर्प मनुष्यांच्या अगोदर मुक्त झाले असते. बकरे पानें खाऊन रहातात. पण ते मुक्त झाल्याचें ऐकिवांत नाहीं. तेव्हां पर्णाशन हाही मोक्षोपाय नव्हे. चातक जलाविषयीं अतिशय विरक्त असतो. पण त्यास मोक्ष प्राप्त होत नाहीं. त्यावरून नुस्ती विरक्तीही कांहीं कामाची नाहीं असें ठरतें. उंदीर प्रत्यहीं बिळांत रहातो. पण तो मरेपर्यंत बद्धच असतो. तस्मात् गुहेमध्यें रहाणें हाही मोक्षोपाय नव्हे. गाढव राखेमध्यें लोळत असतो पण तो आपला गर्दभभाव सोडित नाहीं यास्तव नुस्त्या भस्माच्या लेपाचाही कांहीं उपयोग नाहीं. बक ध्यानांत अगदीं निमग्न असतो. पण त्याचा दुष्ट भाव जात नाहीं. यास्तव लोकांस दाखविण्याकरितां केलेलें ध्यान व्यर्थ ठरतें. सारांश या व असल्याच दुसऱ्याही क्रियांचा तत्त्वतः कांहीं उपयोग नाहीं. कारण कोणतेंही तप ज्ञानप्रधान असलें तरच तें स्वफल देण्यास समर्थ होतें असा नियम आहे ॥ ५८ ॥

मार्गं मानुष्यमीनं च त्रिषु लोकेषु दुर्लभं ॥
यः पठेत्सततं भक्त्या स मुक्तो भवसागरात् ॥ ५९ ॥

मानुषमार्ग, मीनमार्ग, कपिमार्ग, पिपीलिकामार्ग, विहंगममार्ग इत्यादि मंद, मध्यम व तीव्र असे अनेक मार्ग, आहेत. त्यांतील पहिले दोन मार्ग अतिदुर्लभ आहेत. त्यांच्या ज्ञानाकरितां जो हा ग्रंथ भक्तीनें सतत पढतो तो भवसागरांतून मुक्त होतो ॥ ५९ ॥

अष्टांगं च चतुष्पादं त्रिस्थानं पंच देवताः ॥
ॐकारं यो न जानाति ब्रह्मविष्णुशिवात्मकं ॥ ६० ॥

आठ अंगें, चार पाद, तीन स्थानें व पांच देवता यांनीं युक्त असलेल्या ब्रह्मविष्णु शिवात्मक ओंकारास जो जाणत नाहीं, तो अधम होय ॥ ६० ॥

ॐकारं पितृरूपेण गायत्रीं मातरं तथा ॥
पितरौ यो न जानाति स विप्रश्चान्यवीर्यजः ॥ ६१ ॥

ओंकार पितृरूप आहे. व गायत्री मातृरूप आहे. पण या मातापितरांस जो जाणत नाहीं तो ब्राह्मण सामान्य मनुष्यरूपी पित्याच्या वीर्यापासून झालेला सामान्य पुरुष होय ॥ ६१ ॥

इदं तीर्थमिदं तीर्थं भ्रमंति तामसा जनाः ॥
आत्मतीर्थं न जानंति कथं मोक्षः शृणु प्रभो ॥ ६२ ॥

तामस जन; हें तीर्थ, हें तीर्थ, असें ह्मणून जन्मभर इतस्ततः अनेक क्लेश सोशीत फिरत असतात. पण ते आत्मतीर्थास जाणत नाहींत. तेव्हां त्यांस मोक्ष कसा मिळणार ? ॥ ६२ ॥

ज्ञानं भागीरथी गंगा तत्र विश्राम्यतां मनः ॥
प्रातःप्रभृति संध्यांतं संध्यातः प्रातरंतरं ॥ ६३ ॥

ज्ञान हीच भागीरथी गंगा आहे. त्या गंगेमध्येंच प्रातःकालापासून संध्याकालपर्यंत व संध्याकालपासून प्रातःकालपर्यंत हें मन स्थिर होवो अशी प्रत्येक साधकानें प्रार्थना करावी ॥ ६३ ॥

यत्करोमि जगन्नाथ तदस्तु मम पूजनं ॥ ६४ ॥

हे जगन्नाथा, मी जें कांहीं शरीरादिकांनीं करतों तें आत्मरूप माझेंच पूजन असो, अशी त्यानें जीवपरैक्यता मनांत आणून सतत प्रार्थना करावी ॥ ६४ ॥

मनश्चित्ततुरंगाभ्यां शरीरं स्यंदनायते ॥
कालचक्रेण वै याति पूर्वकर्म च सारथिः ॥ ६५ ॥

मन व चित्त या दोन घोड्यांनीं युक्त असलेलें शरीर स्वतः रथरूप होतें. तें कालरूपी चक्राच्या योगानें चालतें. पूर्व कर्म त्यास चालविणारा सारथि आहे ॥ ६५ ॥

यद्दिने पतितो बिंदुर्मातृगर्भे सुनिश्चितं ॥
तद्दिने लिखितं सर्वं हानिमृत्युसुखोत्तरं ॥ ६६ ॥

इति श्रीपद्मपुराणे सिद्धांतसारे कपिलऋषिसंवादे राज-
राजेश्वरयोगकथनं नाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

ज्या दिवशीं मातृगर्भामध्यें वीर्यबिंदु पडतो त्याच दिवशीं त्या पासून होणाऱ्या प्राण्याच्या, हानी, मृत्यु, सुख-इत्यादिकांची गणना होते व त्यांचा निश्चय होतो ॥ ६६ ॥

इति श्री कपिलगीतेचा चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥

अध्याय ५ वा.

सूत उवाच ।

प्रणम्य दंडवद्भूमौ स्तुत्वा चारुचरित्रकं ॥
अर्चित्वा पादपद्मं च पुनः प्रश्नं करोति च ॥ १ ॥

सूत ह्मणतात ।

शिष्यगुरूंस भूमीवर दंडवत् प्रणाम करून, सुंदर चरित्राची स्तुति करून व पादकमलाची पूजा करून पुनरपि प्रश्न करितो ॥ १ ॥

चतुर्योगस्य व्याख्यानात्कष्टात्कष्टं भवेन्महत् ॥
कदाचित्प्राप्यते मृत्युः पुनर्जन्म भवेद्ध्रुवं ॥ २ ॥

गुरुराज, चतुर्योगाची ख्याति करीत बसल्यास पुष्कळ कष्ट होतील, व त्याचें अनुष्ठान करितां करितां मृत्यूही येण्याचा संभव आहे आणि तो आल्यास निश्चयानें पुनर्जन्म घ्यावा लागेल ॥ २ ॥

नानायोनिगतः पश्चात्प्राप्यते नरजन्म हि ॥
नरो नारायणः साक्षात् कैवल्यं ब्रह्म शाश्वतं ॥ ३ ॥

प्राणी अनेक योनींमध्यें फिरतां फिरतां पुष्कळ दिवसांनीं नरजन्म घेतात. (ते फार कष्ट सोसून, अनेक योनींत जन्म घेऊन आणि प्रत्येक योनींतील शरीर वारंवार सोडून मनुष्ययोनींत येतात व त्या योग्य जन्मांत जर त्यांनीं पुरुषार्थ केला तर त्यांतील प्रत्येक नर नारायण होतो. नारायण होणें हेंच साक्षात कैवल्य व ब्रह्म आहे ॥ ३ ॥

राजराजेश्वरो योगः शिवेन महता पुरा ॥
लोकोपकारहेतोर्वै पार्वतीं प्रति बोधितः ॥ ४ ॥
भगवद्बोधितः पार्थस्तथा चोद्धव आत्मना ॥
एवं त्वं शाधि मां दीनं नित्यानित्यविवेकतः ॥ ५ ॥

हा राजराजेश्वर योग पूर्वी महादेवानें लोकोपकारार्थ पार्वतीस सांगितला होता त्याचप्रमाणें भगवान् कृष्णानें पार्थास त्याचा उपदेश केला. त्या ईश्वरानेंच उद्ध-

वासही त्याचा बोध केला. तसाच हे गुरुवर्य कपिल मुने, नित्य व अनि[illegible] यांच्या विवेकपूर्वक तूंही मजदीनाला उपदेश कर ॥ ४।५ ॥

तत्पदं त्वंपदमसीत्येतच्चोक्तं तृतीयकं ॥
विस्तरेण प्रबोद्धव्यं यथार्थं दृष्टिगोचरं ॥ ६ ॥

तत्पद, त्वंपद, व असिपद अशीं महावाक्याचीं तीन पदें आहेत त्यांचा यथा[illegible] ज्ञानगोचर अर्थ विस्तारपूर्वक जाणण्यास उचित आहे. कारण, ज्याला तो अ[illegible] कळतो त्यास जीवपरैक्य तळहातच्या आरशाप्रमाणें स्पष्ट दिसूं लागतें ॥ ६ ॥

तदा नश्यति संतापो जन्मकोटिसहस्रजः ॥
निमेषोन्मेषयोर्मध्ये जीवन्मुक्तो भविष्यति ॥ ७ ॥

आणि त्यामुळें असंख्य जन्मांमध्यें झालेला संताप नष्ट होतो. व तो साधक डो[illegible] झांकून उघडण्यास जितका काल लागतो तेवढ्या काळांत जीवन्मुक्त होतो ॥ ७[illegible]

कपिल उवाच ।

अयं प्रश्नो महाश्रेष्ठः श्रेष्ठस्यास्योत्तरं महत् ॥
नाधिकारविहीनस्य शिष्यस्योपदिशेत्कदा ॥ ८ ॥

कपिल ह्मणतात ।

बा शिष्या, हा प्रश्न फार श्रेष्ठ आहे. या श्रेष्ठ प्रश्नाचें उत्तरही मोठें आ[illegible] पण अधिकाररहित शिष्याला याचा उपदेश कधींही करूं नये. ॥ ८ ॥

ऋषिसिद्ध उवाच ।

सर्वेषामपि लोकानां के वा ज्ञानाधिकारिणः ॥
वद तल्लक्षणं सर्वं यथा संशयनाशनं ॥ ९ ॥

ऋषिसिद्ध ह्मणतात ।

सर्व लोकांमध्यें ज्ञानाधिकारी कोण? माझ्या संशयाचा नाश करील अ[illegible] त्यांचें सर्व लक्षण मला सांग ॥ ९ ॥

कपिल उवाच ।

गुरुभक्तिरतो नित्यं सत्यवादी जितेंद्रियः ॥
विप्रश्च वेदवक्ता च शास्त्रषट्कस्य पारगः ॥ १० ॥

कपिल ह्मणतात ।

सतत गुरुभक्ती मध्यें रत, सत्यवादी, जितेंद्रिय, विप्र, वेदवक्ता, षट्शास्त्रांत पारंगत ॥ १० ॥

नित्यानित्यविवेकी च इहामुत्र विवर्जितः ॥
तितिक्षोपरतिः शांतिर्मुमुक्षोस्तस्य लक्षणम् ॥ ११ ॥

आत्माच नित्य असून त्याहून इतर सर्व अनित्य आहे अशा विवेकानें संपन्न असलेला नित्यानित्यविवेकी ऐहिक व पारलौकिक फळाची इच्छा न करणारा तितिक्षा (सहनशीलता) उपरति (संन्यास) व शांति यांनीं युक्त असलेला मुमुक्षु या उपदेशाचा खरा अधिकारी आहे. अर्थात् हींच त्याचीं लक्षणें आहेत. पण विरक्ति, भक्ति व श्रद्धा हे तीन गुण असून इतर गुण जरी नसले तरी तो अधिकारी आहे असें समजावें ॥ ११ ॥

कुर्वंतः सर्वकर्माणि अर्चंतः सर्वदेवताः ॥
अटंतः सर्वतीर्थानि फलं नेच्छंति सर्वथा ॥ १२ ॥

जे सर्व कर्में करीत असतात, सर्व देवतांचें पूजन करितात, सर्व तीर्थांची यात्रा करितात पण त्याच्या फळाची इच्छा करीत नाहींत ते या उपदेशाचे अधिकारी होत ॥ १२ ॥

कामः क्रोधस्तथा लोभो मोहो मात्सर्यमेव च ॥
दंभोऽहंकार इत्येतैर्जाग्रत्स्वप्नैश्च वर्जितः ॥ १३ ॥

काम, क्रोध, लोभ, मोह, मात्सर्य, दंभ, अहंकार व विपरीत दर्शनरूप जाग्रत् व स्वप्न यांनीं जो रहित असतो तो अधिकारी होय ॥ १३ ॥

निंदको वंचको धूर्तः खलो दुष्कृतितामसौ ॥
एते नारकिणः प्रोक्तास्तानेतान् परिवर्जयेत् ॥ १४ ॥

आतां अनधिकाऱ्याचींही मुख्य मुख्य लक्षणें सांगतों. दुसऱ्यांची निंदा करणारा, दुसऱ्यांस फसविणारा, धूर्त (लबाड) दुष्ट, दुष्कृत्यें करणारा व तामस स्वभावाचा पुरुष हे इतके लोक नरकांत पडणारे आहेत. यास्तव उपदेश प्रसंगीं त्यास वर्ज करावें ॥ १४ ॥

अभक्ते वंचके धूर्ते पाषंडे नास्तिके नरे ॥
मनसाऽपि न वक्तव्यं गुरुगुह्यं कदाचन ॥ १५ ॥

अभक्त, वंचक, धूर्त, पाखंडी व नास्तिक पुरुषास मनानेंही कधीं गुरुगु[illegible] सांगूं नये. (त्यांस गुरूचें गुह्य वचन सांगण्याचें मनांतही आणूं नये) ॥ १५ ॥

शांतो दांतः क्षमी शूरः सर्वेंद्रियसमन्वितः ॥
असक्तो ब्रह्मज्ञानेच्छुः सदा साधुसमागमः ॥ १६ ॥

शांत, दमनशील, क्षमावान्, शूर, सर्व इंद्रियसंपन्न असूनही जितेंद्रिय, विषयामध्यें आसक्त न होणारा, ब्रह्मज्ञानाची इच्छा करणारा सदा साधूंचा समागम करणारा ॥ १६ ॥

साधुबुद्धिः सदाचारी योऽभेदः सर्वदैवते ॥
आशापाशविनिर्मुक्तस्त्वेते मोक्षाधिकारिणः ॥ १७ ॥

साधूप्रमाणें शुद्ध बुद्धि ठेवणारा, सदाचारसंपन्न, सर्व देवांमध्यें भेद न पहाणारा आणि आशारूपी पाशांतून मुक्त असलेला (आशारूपी पाश ज्यास इतस्ततः ओढीत नाहींत असा) इतके साधक मोक्षाचे अधिकारी आहेत ॥ १७॥

अनेकजन्मसंस्काराच्छ्रीगुरोश्च कृपावशात् ॥
प्रत्यक्षश्च परोक्षश्च विवेकः प्राप्यते बुधैः ॥ १८ ॥

अनेक जन्मांतील संस्कारामुळें व श्रीगुरूंच्या कृपेमुळें सुज्ञांस प्रत्यक्ष व परोक्ष विवेक होतो ॥ १८ ॥

भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यंते सर्वसंशयाः ॥
क्षीयंते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ॥ १९ ॥

त्या सर्वोत्तम परमेश्वराचा साक्षात्कार झाला असतां हृदयगत चित् व जड यांची ग्रंथी तुटते. सर्व संशय नाहींसे होतात. प्रारब्धावांचून इतर सर्व संचित व क्रियमाण कर्में क्षीण होतात ॥ १९ ॥

दृष्टात्परं प्रवक्ष्यामि सर्वसिद्धांतविस्तरं ॥
वेदांते च प्रकाशं यत्तत्त्वं श्रेष्ठमनुत्तमं ॥ २० ॥

मी आतां या दृष्ट प्रपंचाहून अगदीं विलक्षण असलेलें, सर्व सिद्धांतविस्तररूप व वेदान्तांत प्रसिद्ध असलेलें श्रेष्ठ व अनुत्तम तत्त्व सांगतों ॥ २० ॥

गोपितः सर्वशास्त्राणां विस्तरः कथ्यते मया ॥
सर्वेषामधिकं तत्त्वं दृष्टांतरं च दृश्यते ॥ २१ ॥

सर्व शास्त्रांतील गुप्त अर्थ मी सांगतों त्यामुळें सर्वांहून अधिक तत्त्व व या प्रसिद्ध दृष्टाहून भिन्न दृष्टतत्व दिसेल ॥ २१ ॥

ज्ञातव्यमंतरंगस्थं बहिरंगं च पश्यति ॥
प्रत्यक्षं चैव पश्यंति दृष्टांतरं च दृश्यते ॥ २२ ॥

अंतरंगस्थ तत्त्व जाणण्यास उचित असतांना प्राकृत जन बहिरंग तत्त्व पहातात. प्रत्यक्ष दिसेल तेवढेंच त्यांस मान्य होतें. पण आमच्या या उपदेशानें दुसरें दृष्ट अनुभवास येतें ॥ २२ ॥

प्रथमं नादलुब्धश्च बिंदुश्चैव तदुच्यते ॥
तृतीयं च कला प्रोक्तं ज्योतिरूपं च पश्यति ॥ २३ ॥

प्रथम नादलुब्ध, दुसरा बिंदु, तिसरी कला व शेवटीं साधक ज्योतिरूप पहातो ॥ २३ ॥

अकारं नादरूपं च उकारं बिंदुरूपकं ॥
मकारं तु कला प्रोक्ता ओंकारं ज्योतिरेव हि ॥ २४ ॥

अकार नादरूप आहे. उकार बिंदुरूप आहे. मकारास कला ह्मणतात. आणि स्वतः ओंकारच ज्योति आहे ॥ २४ ॥

लुब्धो नागस्वरैः सर्पो घंटानादैः कुरंगकः ॥
पतंगो लुभ्यते दीपैर्मनो नादेन लुभ्यते ॥ २५ ॥

पुंगीच्या स्वरावर सर्प लुब्ध होतो. घंटानादांनीं हरिण लुब्ध होतात. पतंग दीपावर आसक्त होतो व त्याप्रमाणेंच मन नादावर लुब्ध होतें. ॥ २५ ॥

पतंगमीनहरिणगजालयोप्यतिक्रमाः ॥
इंद्रियाणि मनुष्यस्य भज्यंते किमु चिंतया ॥ २६ ॥

पतंग, मीन, हरिण, गज, व भ्रमर हे पांच प्राणी क्रमानें रूप, रस, शब्द, स्पर्श व गंध या पांच विषयांकरितां आपले प्राण देतात. पण एका मनुष्यास त्या पांची

विषयांचा भोग घेण्याचीं साधनें अर्थात् इंद्रियें प्राप्त आहेत. तेव्हां त्यांचें नियमन न केल्यास त्यांचें काय होईल या विषयीं फार विचार करण्याचें काय प्रयोजन आहे?॥२६॥

यथा चुंबकपाषाणः सूचिका च पृथक् तथा ॥
उभयोर्दर्शने योगो मोहितं तत्र लिप्यते॥ २७॥

लोहचुंबक व सुई हे अगदीं स्वतंत्र पदार्थ आहेत. पण सांनिध्यामुळें लोहचुंबका बरोबर सुई फिरूं लागते. अथवा धांवत जाऊन त्याला चिकटते ॥ २७ ॥

तथैव च मनुष्याणामात्मा च हि पृथक् तथा ॥
मानसं तत्र लीयेत इंद्रियैः किं विचेष्टयते ॥ २८ ॥

त्याचप्रमाणें मनुष्याचा आत्मा व मन हीं दोन्ही स्वतंत्र व विलक्षण तत्त्वें आहेत. पण अनुसंधान, विचार इत्यादिकांच्या योगानें मन आत्म्यामध्यें लीन होतें. मग इंद्रियें काय चेष्टा करणार? ॥ २८ ॥

तद्देह आत्मभावेन मानसं लक्ष्यते सदा ॥
इंद्रियादि स्थिरं यस्य तन्मनो ह्युन्मनो भवेत् ॥ २९ ॥

ज्याचें मन आत्म्यामध्यें लीन झालें आहे त्याच्या देहामध्यें मन आत्मभावानेंच सदा रहातें. ज्याचीं इंद्रियादि स्थिर असतात त्याचें मन उन्मन होतें ॥ २९ ॥

घृते कृता च प्रतिमा चोष्णेनैव विलीयते ॥
लवणं जलविक्षिप्तं लवणत्वाद्विलीयते ॥ ३० ॥

थिजलेल्या तुपानें केलेली प्रतिमा (मूर्ती) उष्ण वस्तूच्या संपर्कानें वितळून जाते. जलामध्यें टाकलेलें लवण (मीठ) आपलें लवणत्व सोडून विरघळतें ॥ ३० ॥

तथैव स्वात्मभावेन ह्युन्मनस्त्वं मनो व्रजेत् ॥
दृश्यते त्वग्रयया दृष्ट्या चित्तं तत्र लयं गतं ॥ ३१ ॥

त्याचप्रमाणें स्वात्मभावानें मन उन्मनस्त्वास प्राप्त होतें. आत्म्यामध्यें लय पावलेलें चित्त सूक्ष्म दृष्टीनें अनुभवास येतें ॥ ३१ ॥

शर्करा जलसंयुक्ता शर्करात्वं हि गच्छति ॥
सगुणं ध्यायतो नित्यं निर्गुणत्वं तथोच्यते ॥ ३२ ॥

शर्करा जलांत टाकिली असतां ती आपलें शर्करात्व सोडते व जलरूप होते त्याप्रमाणें सगुण परमेश्वराचें ध्यान करितां करितां निर्गुणत्व सिद्ध होतें ॥ ३२ ॥

फलस्य कारणं पुष्पं फलात्पुष्पं विनश्यति ॥
ज्ञानस्य कारणं कर्म ज्ञानात्कर्म विनश्यति ॥ ३३ ॥

फलाचें कारण पुष्प आहे. पण फल आलें कीं पुष्प नष्ट होतें त्याप्रमाणें ज्ञानाचें कारण कर्म आहे. पण ज्ञान झालें कीं तें नष्ट होतें ॥ ३३ ॥

पानीयचोरन्यायोऽयं भांडं यज्जलपूरितं ॥
यस्याधश्छिद्रदशकमूर्ध्वमेकं तु च्छिद्रकं ॥ ३४ ॥

पाणी व चोर यांचा हा येथें न्याय आहे. पाण्यानें भरलेलें एक भांडें आहे. त्याच्या खालीं दहा छिद्रें असून वर एक छिद्र आहे ॥ ३४ ॥

छिद्रमूर्ध्वमिदं सूक्ष्मं तथापि जलरोधकं ॥
मुक्तेऽस्मिन् भाण्डभेदश्च जलस्यापि च निष्क्रमः ॥ ३५ ॥

पण तें ऊर्ध्वभागीं असलेलें छिद्र अति सूक्ष्म असून सर्व छिद्रांतून गळणाऱ्या पाण्यास प्रतिबंध करणारें आहे तें वरचें सूक्ष्म छिद्र जर मोकळें सोडलें तर भांडेंही फुटतें व जलही बाहेर वाहूं लागतें त्याप्रमाणें एका मनाला प्रतिबंध करून धरावें म्हणजे दहाही इंद्रियें प्रतिबद्ध होऊन रहातात व त्याला मोकळें सोडलें म्हणजे देहाचाच क्षय होतो ॥ ३५ ॥

प्राप्तकाले च विघ्नेषे मानसं भयमाप्नुयात् ॥
तत्सर्वं कथयिष्यामि सावधानं शृणुष्व च ॥ ३६ ॥

चित्त एकाग्र करण्याचा प्रसंग आला कीं मनाला मोठें भय वाटतें. पण तें स्थिर कसें होतें तें मी दृष्टांत पूर्वक तुला सांगतों. सावधान मनानें ऐक ॥ ३६ ॥

स्त्रीणामादौ यथा भीतिः पुरुषस्यादिसंगमे ॥
तथाऽसौ चित्तविक्षेपः प्राप्तानां स्वामिमंदिरं ॥ ३७ ॥

पतीच्या गृहीं आलेल्या स्त्रियांस पुरुषाशीं प्रथम समागम करावयाचा प्रसंग आला असतां मोठी भीति वाटते. पण एकदां त्या समागमाचें सुख कळलें म्हणजे ती भीति पार नाहींशी होऊन उलट त्याविषयीं प्रेम वाटतें. त्याप्रमाणें चित्त एकाग्र करीपर्यंत

भीति. तें एकदां एकाग्र झालें कीं मग भीति नाहीं. तर उलट त्याविषयीं प्रेम वाटूं लागतें ॥ ३७ ॥

पुरुषस्याऽल्पसंगेन गतायाता तु सोच्यते ॥
लज्जाभीती यदा नष्टे तस्याः संश्लिष्टता च सा ॥ ३८ ॥

पुरुषाशीं स्त्रीचा अल्प संपर्क झाला असतां तिला थोडी भीति व लज्जाही वाटते पण तोच तिचा परिचय वाढला म्हणजे भीतीचें नांवही रहात नाहीं. त्याचप्रमाणें मन स्वरूपामध्यें स्थिर झालें असतां भीति लज्जा इत्यादिकांतील कांहीं उरत नाहीं ॥ ३८ ॥

पुरुषं तु वशीकृत्य गृहिणी गृहमुच्यते ॥
तदा सुलीनता प्रोक्ता सर्वसिद्धिविधायिनी ॥ ३९ ॥

स्त्रीनें पुरुषास वश करून घेतलें म्हणजे त्या गृहिणीस गृह म्हणूं लागतात. त्याप्रमाणें मनाची आत्म्यामध्यें अति लीनता होणें हेंच सर्व सिद्धीचें कारण आहे ॥ ३९ ॥

शरीरं भुवनं यस्य हृदयं रतिमंदिरं ॥
आत्मा च पुरुषः प्रोक्तो मानसं प्रकृतिस्तथा ॥ ४० ॥

शरीर हेंच गृह आहे, हृदय रतिमंदिर आहे, आत्मा पुरुष आहे, व मन प्रकृति आहे ॥ ४० ॥

विक्षेपता गतायाता संश्लिष्टता सुलीनता ॥
एवं हि प्रोच्यते सद्भिर्भूमिकानां चतुष्टयं ॥ ४१ ॥

विक्षेपता, गतायाता, संश्लिष्टता व सुलीनता या नांवाच्या चार भूमिका आहेत असें संत सांगतात ॥ ४१ ॥

आरंभे श्रवणं कृत्वा मनसा च विचारणं ॥
निदिध्यासनमभ्यासः साक्षात्कारस्तदा भवेत् ॥ ४२ ॥

आरंभीं श्रवण करून, मनानें विचार करून निदिध्यासनाचा अभ्यास केला म्हणजे साक्षात्कार होतो ॥ ४२ ॥

एवं क्रमेण बोद्धव्यं विचार्यं च पुनःपुनः ॥
अकस्माद्गुरुसंतोषात् साक्षात्कारश्च तत्क्षणात् ॥ ४३ ॥

या क्रमानें ज्ञान करून घ्यावें. पुनः पुनः विचार करावा. अकस्मात् गुरूचा प्रसाद झाल्यास तत्क्षणीं साक्षात्कार होतो ॥ ४३ ॥

मृदा नूनं भवेद्भाण्डं पुनस्तत्र मृदेव च ॥
एवं ब्रह्मरतो लोकः संसारेण न लिप्यते ॥ ४४ ॥

मृत्तिकेचा घट केला व आव्यांत घालून भाजून काढला ह्मणजे तो जलादि विरोधी पदार्थांसही आपल्यामध्यें धारण करूं शकतो. ह्मणजे मृत्तिकेहून त्याचें स्वरूप अगदीं निराळें होतें. पण त्यास फोडल्यावर पुनः मृत्तिका होते. त्याप्रमाणें अहंकारादिकांमुळें आत्मा जीवरूपानें जरी ब्रह्माहून विलक्षण झाला असला तरी ब्रह्मामध्यें रत असलेला पुरुष ब्रह्मरूप होतो. संसारानें लिप्त होत नाहीं ॥ ४४ ॥

पठित्वा वेदशास्त्राणि ब्रह्मज्ञानविवर्जितः ॥
न नष्टविषयासंगः पठित्वा किं प्रयोजनं ॥ ४५ ॥

वेद व शास्त्रें यांचें पुष्कळ पठण केलें पण ब्रह्मज्ञानाचा गंधही नाहीं आणि विषयासक्तिही नष्ट झाली नाहीं तर त्या पठणाचा काय उपयोग ? ॥ ४५ ॥

पुस्तकानि पठेद्यस्तु वाक्यार्थं च करोत्यपि ॥
अमेध्यं भक्षितं तेन पठित्वा किं प्रयोजनं ॥ ४६ ॥

एकादा पुष्कळ पुस्तकें वाचीत असला व वाक्यार्थही करीत असला पण त्यानें अभक्ष्य भक्षण सोडलें नाहीं तर त्याच्या त्या वाचनाचा व अर्थाचा काय उपयोग ? ॥ ४६ ॥

उदकेन भवेत्पंकः स च तेनैव शुद्ध्यति ॥
मनः करोति वै कर्म मुच्यते मनसैव तत् ॥ ४७ ॥

उदकाच्या योगानेंच चिखल होतो व तो उदकानेंच धुतला असतां जातो. त्याप्रमाणें प्राणी मनानेंच कर्म करितो व मनानेंच त्यांतून सुटतो ॥ ४७ ॥

मनः करोति कर्माणि पातकैर्लिप्यते मनः ॥
मनश्चेदात्मयुग्भूयान्न लिप्येद्धर्मपातकैः ॥ ४८ ॥

मन कर्म करितें व पापांनीं लिप्त होतें. पण तें जर आत्मनिष्ठ झालें तर धर्म व पातक यांनीं लिप्त होत नाहीं ॥ ४८ ॥

कामनासहितं कर्म कुर्याद्यः कामसिद्धये ॥
तदाऽसौ लिप्यते भोगैर्निष्कामो नैव लिप्यते ॥ ४९ ॥

मनोरथसिद्धीकरितां कामनासहित जो कर्म करितो तो त्याच्या फलभोगांनीं लिप्त होतो. पण निष्काम कर्मे करणारा लिप्त होत नाहीं ॥ ४९ ॥

कार्पासेन भवेद्वस्त्रं कार्पासत्वं न मुंचते ॥
आत्मा त्वसौ भवेज्जीवो जीवे ब्रह्मत्वमुच्यते ॥ ५० ॥

वस्त्र कापसापासून होतें, पण तें कार्पासत्व सोडीत नाहीं. त्याप्रमाणें आत्मा जीव होतो हें खरें. पण त्यांतही ब्रह्मत्व असतेंच ॥ ५० ॥

सत्त्वेन जायते धर्मः प्रपंचो रजसा तथा ॥
तमोगुणाद्भवेत्क्रोधो गुणत्रयमिदं भवेत् ॥ ५१ ॥

सत्त्वगुणाच्या योगानें धर्म होतो. रजोगुणानें प्रपंच होतो व तमोगुणानें क्रोध होतो याप्रमाणें तीन गुणांचे परिणाम होतात ॥ ५१ ॥

एका च मृद् भांडमनेकरूपं गोक्षीरमेकं बहुवर्णधेनुः ॥
सुवर्णमेकं बहुभूषणानि शरीरभेदः परमार्थ एकः ॥ ५२ ॥

मृत्तिका एकरूप असते पण तिचीं भांडीं अनेक प्रकारचीं होतात. गायीचें क्षीर एकरूप ह्मणजे शुभ्र असतें पण गायींचे वर्ण अनेक असतात. सुवर्ण एकच असतें पण त्याचीं भूषणें अनेक होतात. त्याप्रमाणें परमात्मा एकच आहे, पण शरीरें मात्र अनेक ॥ ५२ ॥

पाषाणैरालयं बद्धं देवः पाषाण एव च ॥
ब्रूहि पंडित देवस्तु कस्मिन्स्थाने स तिष्ठति ॥ ५३ ॥

पाषाणांच्या योगानें देवमंदिर बांधलें आणि देवही पाषाणच. तेव्हां हे पंडिता, देव कोणत्या स्थानीं रहातो तें सांग पाहूं ? कारण सर्व पाषाणमयच ॥ ५३ ॥

आत्मलिंगं विष्णुरस्ति संदेहमत्रनाऽऽप्नुयात् ॥
सर्वभूतस्वरूपं च पश्येदेकं विचक्षणः ॥ ५४ ॥

आपल्या शरीरांत व्यक्त होणारें आत्म्याचें लिंग [चिन्ह] च विष्णु आहे, असें जाणावें. त्याविषयीं संशय ठेवूं नये. आणि विद्वानानें सर्व भूतांचें एक स्वरूप पहावें ॥ ५४ ॥

स्वगृहे पायसं त्यक्त्वा भिक्षामिच्छति दुर्मतिः ॥
शिलामृद्दारुचित्रेषु देवता बुद्धिकल्पिता ॥ ५५ ॥

दुर्बुद्धि पुरुष आपल्या गृहांतील पायस टाकून भिक्षा मागण्याची इच्छा करितो, त्याप्रमाणें हृदयस्थ देवास सोडून सामान्य जन स्वबुद्धीनें शिला, मृत्तिका, काष्ठें व चित्रें यांमध्यें देवतांची कल्पना करीत असतात ॥ ५५ ॥

हृत्पद्मे परमं तत्त्वमादिमध्यांतवर्जितं ॥
आधारः सर्वलोकानामनाधारमविक्रियं ॥ ५६ ॥

आदि, मध्य व अंत यांनीं रहित, सर्व लोकांचा आधार, स्वतः आधारशून्य व निर्विकार परमतत्व हृदयकमळांत असतें ॥ ५६ ॥

कंटकाग्रं कृतं केन सिंहशार्दूलविक्रमे ॥
मयूरे नर्तनं केन तेषां च सहजोद्भवं ॥ ५७ ॥

सिंह व व्याघ्र यांस कांट्याच्या अग्रानेंही स्फुरण येतें. पण हा त्याचा स्वभाव कोणी केला ? त्याचप्रमाणें मेघांचें दर्शन होतांच मयूरांनीं नाचूं लागावें हें काय आहे ? त्यांचा तो स्वभाव आहे ॥ ५७ ॥

भ्रमरः कीटकं न्यस्य नीडे स्वे चांतरं गतः ॥
तत्रायं भ्रमरध्यानाद् भ्रमरत्वं प्रपद्यते ॥ ५८ ॥

भ्रमर आपल्या घरांत एका जिवंत किड्यास ठेवून जातो. पण त्याच्या ध्यानानें तो कीटकही कांहीं कालानें भ्रमरत्वास प्राप्त होतो. त्याप्रमाणें आत्मध्यानानें जीव ब्रह्मरूप आत्मा होतो ॥ ५८ ॥

चक्षुरग्रे स्थितं नित्यं विस्फुरंतं मणिं यथा ॥
तं दृष्ट्वा व्यापकं देवं भवबंधात्प्रमुच्यते ॥ ५९ ॥

नेत्रांच्या पुढें रत्नाप्रमाणें नित्य स्फुरण पावणाऱ्या त्या व्यापक देवास ध्यानयोगानें पाहून पुरुष भवबंधांतून मुक्त होतो ॥ ५९ ॥

चक्षुरग्रे स्थिता छाया सा माया मूलरूपिणी ॥
दृश्यादृश्यस्वरूपेण शिवसायुज्यकारिणी ॥ ६० ॥

नेत्रापुढें स्थित असलेली जी छाया ती मूलरूपिणी माया होय. ती दृश्यादृश्य स्वरूपानें शिवसायुज्य करीत असते ॥ ६० ॥

चक्षुर्मध्ये स्थितं गुह्यमंगुष्ठपर्वमात्रकं ॥
तदूर्ध्वं चापि पर्वार्धं तस्यांतः सूक्ष्मकं ध्रुवं ॥ ६१ ॥

नेत्रामध्यें अंगुष्ठपर्व मात्र गुह्य तत्त्व स्थित आहे. त्याच्यावर पर्वार्धप्रमाण तत्त्व आहे. आणि त्याच्या आंत सूक्ष्म व ध्रुव तत्त्व आहे ॥ ६१ ॥

चक्षुर्दृष्टेः साक्षिभागोऽप्यवलोकनतत्परं ॥
प्रकाशते स्वयं ज्योतिर्नरस्तत्तत्र पश्यतु ॥ ६२ ॥

नेत्रदृष्टीचा साक्षिभागही अवलोकनतत्पर स्वयंज्योतीस प्रकाशित करितो. यास्तव साधक पुरुषानें त्यास त्यामध्यें पहावें ॥ ६२ ॥

अचलं निर्मलं शांतं कूटस्थं तेज उच्यते ॥
अमलं निर्मलं चैव शून्यं चापि निरंजनं ॥ ६३ ॥

तें तेज अचल, निर्मल, शांत, कूटस्थ, अमल, अलेप, शून्य व निरंजन आहे. असें सांगतात. ॥ ६३ ॥

शुद्धस्फटिकसंकाशं शुभ्रवर्णो मणिः खलु ॥
तेजोराशिमयं ब्रह्म धार्यते आत्मलिंगकं ॥ ६४ ॥

शुद्धस्फटिकतुल्य, जणु काय शुभ्रवर्ण मणिच, अशा तऱ्हेचें तें तेजोराशिमय ब्रह्म आत्मलिंग धारण करितें ॥ ६४ ॥

सर्वांगसच्चिदात्मानं ज्ञानदृष्ट्या निरूपयेत् ॥
अज्ञानचक्षुषः क्षेपाद्भांतं भानुमिवोषसि ॥ ६५ ॥

सर्वांगांत सच्चिदानंदरूपानें भरून राहिलेल्या त्यास ज्ञानदृष्ट्या पहावें. पण अज्ञान चक्षूस नाहींसें करून टाकिल्यावर उषःकाळीं प्रकाशमान होणाऱ्या सूर्याप्रमाणें तें दिसतें ॥ ६५ ॥

सुवर्णवद्दीप्तिमति ज्ञानाग्नौ परिदीपिते ॥
जीवः सर्वमलान्मुक्तः स्वर्णवद्दीप्यते स्वयं ॥ ६६ ॥

सुवर्णाप्रमाणें ज्याची दीप्ति आहे. असा ज्ञानाग्नि सर्वतः देदीप्यमान झाला असतां त्यांत घालून तापविलेला जीव सर्व मलापासून मुक्त होऊन सुवर्णाप्रमाणें स्वयं देदीप्यमान होतो ॥ ६६ ॥

बहिरंतः स्फुरज्ज्योती रत्नकुंभप्रदीपवत् ॥
स्वप्रकाशं सदाज्ञानमेकरूपमनामयं ॥ ६७ ॥

रत्नमय घटांतील प्रदीपाप्रमाणें बाहेर व आंतही ज्याची ज्योति स्फुरत आहे. असें तें जीवतत्त्व स्वप्रकाश, सद्ज्ञान एकरूप व अनामय आहे ॥ ६७ ॥

गुह्याद्गुह्यं परं सूक्ष्मं चक्षुः स्थानेषु तिष्ठति ॥
तन्मूर्तिर्लक्ष्यतामंगे आपादतलमस्तकं ॥ ६८ ॥

तें गुह्याहून गुह्य परम सूक्ष्म, चक्षुःस्थानांमध्यें असतें. त्याचा आकार (स्वरूप) पादतलापासून मस्तकापर्यंत अंगामध्यें उसांतील रसाप्रमाणें भरलेला असतो. त्यास सूक्ष्म दृष्टीनें पहावें ॥ ६८ ॥

मनसा भावयन्मूर्तिं तिष्ठेचां पूर्णतेजसं ॥
सा मूर्तिश्चक्षुरग्रेषु तिष्ठत्येव न संशयः ॥ ६९ ॥

पूर्ण तेजोमय असलेल्या त्या मूर्तीची मनानें भावना करीत रहावें. म्हणजे ती मूर्ति नेत्रांच्या अग्रभागीं स्थित होते, यांत कांहीं संशय नाहीं ॥ ६९ ॥

ऋषिसिद्ध उवाच ।

सिद्धानां चैव सर्वेषां प्रणम्य कपिलं गुरुं ॥
योगसिद्धं महच्छ्रेष्ठं ज्ञानं ज्ञेयं च ब्रूहि मे ॥ ७० ॥

सर्व सिद्धांच्या कपिलसंज्ञक गुरूंस प्रणाम करून ऋषिसिद्ध म्हणतो– योगसिद्ध व महच्छ्रेष्ठ ज्ञान आणि ज्ञेय मला सांगा ॥ ७० ॥

कपिल उवाच ।

शृणुष्व ऋषिसिद्ध त्वं यदर्थमिह आगतः ॥
ततः सर्वं प्रवक्ष्यामि निःशेषमचलं तव ॥ ७१ ॥

कपिल म्हणतो ।

हे ऋषिसिद्धा, ज्या अर्थी तूं येथें या तत्त्वज्ञानाकरितांच आला आहेस त्या अर्थी तुला निःशेष व अचल सर्व अर्थ सांगतों ॥ ७१ ॥

प्रणम्य शंकरं देवं परात्परमहेश्वरं ॥
आत्मज्ञानप्रकाशेन प्रत्यक्षं तत्त्वमुच्यते ॥ ७२ ॥

परात्पर महेश्वर शंकर देवास प्रणाम करून आत्मज्ञान प्रकाशित करून प्रत्यक्षतत्त्व सांगतों ॥ ७२ ॥

बहिर्गतः कोऽपि शिष्यो निवृत्तः शीघ्रमालयं ॥
प्रतिवेशांधभुवनं द्रष्टुं किंचिच्छशाक न ॥ ७३ ॥

कोणीही एकादा शिष्य बाहेर प्रकाशमय प्रदेशांत जाऊन सत्त्वर अंधकारानें भरलेल्या गृहांत प्रविष्ट झाल्यास त्याला तेथें कांहीं वेळ कांहींएक दिसत नाहीं॥७३॥

तत्रैवास्मिन् स्थिरीभूते अंधकारः प्रभा भवेत् ॥
तदैव दृश्यते वस्तु स्वयं चक्षुश्च पश्यति ॥ ७४ ॥

पण कांहीं वेळ तो तेथेंच स्थिर झाला म्हणजे तो अंधकारच प्रभारूप होतो व त्यामुळें त्याला तेथील वस्तु दिसूं लागतात. त्यास तेथें साक्षात् चाक्षुषज्ञान होतें ॥७४॥

अज्ञानपूर्णे हृदये तमःपूर्णे च मानसे ॥
सततं वर्तमानं हि दृश्यते न च वस्तु वै ॥ ७५ ॥

त्याप्रमाणें केवळ बाह्यवृत्तिपुरुषास हृदय अज्ञानपूर्ण व मन तमःपूर्ण असल्यामुळें त्यांत असलेलें तत्त्वही दिसत नाहीं. ॥ ७५ ॥

पश्यता सुस्थिरीभूय वस्तुतत्सर्वमेव हि ॥
त्हृदये त्वंधभुवने दृश्यते च निरंतरं ॥ ७६ ॥

पण अंधकारमय हृदयप्रदेशींच मनाला स्थिर करून पाहूं लागलें असतां ती सर्व वस्तु तेथेंच निरंतर दिसूं लागते ॥ ७६ ॥

अकल्पितोद्भवं ज्योतिः स्वयंज्योतिः प्रकाशितं ॥
अकस्माद्दृश्यते ज्योतिस्तज्ज्योतिः परमात्मनि ॥ ७७ ॥

ज्याचा अकल्पित उद्भव झाला आहे. अशी स्वयंप्रकाश ज्योति व्यक्त होऊन अकस्मात् दिसते. ती ज्योति, परमात्म्यामध्यें आहे. म्हणजे परमात्मरूपच आहे॥७७॥

आनंदकंदसंभूतं ज्ञाननालं सुशोभनं ॥
त्राहि मां नरकाद् घोराद्दिव्यज्योतिर्नमोऽस्तु ते ॥ ७८ ॥

आनंदकंदापासून उद्भवलेली व ज्ञान हें जिचें अति सुंदर नाल आहे अशाप्रकारचे हे दिव्य ज्योति, माझें घोरनरकांतून रक्षण कर तुला नमस्कार असो ॥७८॥

विचाराष्टदलोपेतं वैराग्यं कुंकुमं तथा ॥
विरक्तकर्णिकं शुद्धं चंद्रकांतिसमप्रभं ॥ ७९ ॥

त्या ज्योतीला विचाररूपी आठ दलें होतीं. वैराग्य हें तिचें पुष्प होय. विरक्ति ही तिची कर्णिका आहे. व त्याची प्रभा चंद्रकांतीसारखी होती ॥ ७९ ॥

सच्चित्तदृश्यते रूपं परं ब्रह्मैव भावितं ॥
हृत्पुण्डरीकमध्ये तु सोमसूर्याग्निमण्डले ॥ ८० ॥

सोम, सूर्य व अग्नि यांच्या मंडलाप्रमाणें असलेल्या हृदयकमलामध्यें ज्याची भावना केली होती त्या परब्रह्माचेंच तें सत्-चित्-रूप दिसतें ॥ ८० ॥

कल्पना तु तडित्प्राया ज्वालानां वह्निरूपता ॥
शिवदृष्टया ततो नित्यं क्षणं पश्येद्यथाविधि ॥ ८१ ॥

कल्पना विद्युल्लतेप्रमाणें असते. विजेच्या ज्वाला जशा अग्निरूप दिसतात, व क्षणांत नाहींशा होतात तसाच कल्पनेचा प्रकार आहे. यास्तव सतत प्रत्येकक्षण शिव दृष्टीनें पहावा ॥ ८१ ॥

चूते पूर्वं यथा सन्ति कट्वम्लानि फलानि वै ॥
पश्चात्तानि यथा यान्ति माधुर्यं च रसात्मताम् ॥ ८२ ॥

आंब्यावर पूर्वी जशीं कडू व आंबट फळें असतात व तींच पुढें गोड व रसाळ होतात तसाच हा प्रकार आहे ॥ ८२ ॥

चूतोऽन्तःकरणं ह्यत्र मानसं च तथा फलं ॥
फलं कोमलमेतत्तु कट्वम्लं हि भवेत्तथा ॥ ८३ ॥

अंतःकरण हा आम्रवृक्ष आहे. मन हें त्याचें फळ आहे. पण तें कोवळें असेपर्यंत कडु व आंबट असतें ॥ ८३ ॥

मनः स्थिरं फलमिदं यदा पक्वं भवेत्तदा ॥
माधुर्यं ब्रह्मरसतां प्राप्तं हंसैः सुसेव्यते ॥ ८४ ॥

पण हेंच मनोरूपी फळ स्थिर झालें असतां पक्व होतें. ब्रह्मरसतारूपी माधुर्य त्यास प्राप्त होतें व हंस (संन्यासी) त्याचें उत्तम रीतीनें सेवन करितात ॥ ८४ ॥

मनो वासनया बद्धं मुच्येन्निर्वासनं यदि ॥
तदैव ब्रह्मरसतां याति तत्पीयते बुधैः ॥ ८५ ॥

मन वासनेनें बद्ध होतें व तें वासनारहित झालें असतां मुक्त होतें. तें वासनाशून्य होतांच ब्रह्मरसतेस प्राप्त होतें व ज्ञानी त्याचें प्राशन करितात ॥ ८५ ॥

ब्रह्मरसः स्वादुतमो हृत्पद्मे पूर्ण आत्मनि ॥
इंद्रैश्वर्यमतः क्षुद्रं का कथेतरभूपतेः ॥ ८६ ॥

ब्रह्मरस अतिशय मधुर आहे तो हृदयकमलांत पूर्ण आत्म्यामध्यें असतो. त्या ब्रह्मरसापुढें इंद्राचें ऐश्वर्यही तुच्छ आहे मग इतर राजांच्या ऐश्वर्याची काय कथा८६

विचारदर्पणे यो वै यत्नात्सूक्ष्मं विलोकयेत् ॥
दृश्यते तत्र यद्रूपं नूनं तन्न स्वकात्पृथक् ॥ ८७ ॥

विचारदर्पणामध्यें मोठ्या यत्नानें सूक्ष्म तत्व पहावें तेथें जें रूप दिसतें तें स्वात्म्याहून पृथक् नाहीं ॥ ८७ ॥

हृदये दर्पणे पश्येन्मनस्तत्रावलोकयेत् ॥
दृश्यते प्रतिबिंबेन स्वात्मरूपं न संशयः ॥ ८८ ॥

हृदयरूपी दर्पणांत पहावें. त्यांत मनाचें अवलोकन करावें. त्यांत प्रतिबिंबरूपानें आत्मरूप दिसतें, यांत संशय नाहीं ॥ ८८ ॥

आत्मत्वं दृश्यते तत्र ज्योतीरूपं निरंतरं ॥
चित्तशुद्धिस्थिरत्वेन हृदि भानुः प्रकाशते ॥ ८९ ॥

त्यांत निरंतर ज्योतीरूप आत्मत्व दिसतें. चित्तशुद्धीमुळें मनःस्थैर्य होऊन हृदयांत आत्म—सूर्य चमकूं लागतो ॥ ८९ ॥

आत्मा विशुद्धचैतन्यस्वरूपः शाश्वतो विभुः ॥
निर्विकारः स्वयंज्योतिः स्वभावार्कः प्रकाशते ॥ ९० ॥

आत्मा विशुद्ध चैतन्य स्वरूप, शाश्वत व विभु (व्यापी) आहे. तो निर्विकार स्वयंज्योति स्वाभाविक सूर्य प्रकाशमान होतो ॥ ९० ॥

आकाशे काशते सूर्यो गगने चंद्रमास्तथा ॥
खमध्ये रोचते तारा ज्योतिश्चिद्व्योमसंस्थितं ॥ ९१ ॥

आकाशांत जसा सूर्य प्रकाशतो, गगनांत जसा चंद्र चमकतो, अंतरिक्षांत जशा तारा चमकतात त्याप्रमाणें चिदाकाशांत स्थित असलेली आत्मज्योति देदीप्यमान होते ॥ ९१ ॥

दृश्यते सूर्यरूपं हि तदाकारं विचिंतयेत् ॥
आत्ममध्ये प्रभारूपं नान्यत्किंचिद्विचारयेत् ॥ ९२ ॥

आपल्याला हें सूर्यरूप जसें दिसतें त्याच आकारानें चित्तांत प्रभारूप आत्म्याचें चिंतन करावें. त्या वांचून इतर कोणत्याही विषयाचें चिंतन करूं नये ॥ ९२ ॥

तज्ज्योतिर्हृदयस्थाने प्रत्यक्षं ब्राह्ममक्षरं ॥
पद्मगर्भे च यः पश्येत्स मुक्तो नात्र संशयः ॥ ९३ ॥

हृदयस्थ पद्मामध्यें प्रत्यक्ष दिसणारी व ब्रह्म संबंधी अक्षर (अव्यय, अविनाशी) ज्योति जो पहातो तो मुक्त आहे, यांत कांहीं संशय नाहीं ॥ ९३ ॥

ऋषिसिद्ध उवाच ।

त्वमेव भगवन् वेत्सि ज्योतीरूपं यथास्थितं ॥
यज्ज्योतिर्हृदि पद्मेऽस्ति शाश्वतं ब्रह्म केवलं ॥ ९४ ॥

ऋषिसिद्ध म्हणतात ।

भगवन् ज्योतीरूप कसें स्थित आहे तें तूंच जाणतोस. हृदयकमलामध्यें जें ज्योतीरूप आहे तेंच शाश्वत केवल ब्रह्म होय ॥ ९४ ॥

त्वद्दि पद्मे स्थितं ब्रह्म तत्कथं दृष्टिगोचरं ॥
कुत्रास्ति हृत्पद्ममिदं कथं ज्योतिश्च दृश्यते ॥ ९५ ॥

हृत्कमलांत ब्रह्म स्थित आहे. तें दृष्टिगोचर कसें होणार ? हृदयकमल कोठें आहे व त्यांत ज्योति कशी दिसते ॥ ९५ ॥

त्वं तत्सर्वं वदाऽस्माकं यत्तद्धृदयपंकजं ॥
तन्मध्ये यज्ज्योतिरास्ति दिश ब्रह्म महामुने ॥ ९६ ॥

तात्पर्य — हे महामुने, तें हृदयकमल, त्यांत असलेली ज्योति इत्यादि सर्व आम्हांस सांग. ब्रह्माचा उपदेश कर ॥ ९६ ॥

कपिल उवाच ।

पादादि जानुपर्यंतं पृथ्वीस्थानं प्रतिष्ठितं ॥
तत्रास्ति पद्ममेकं च सर्वदेहेषु संस्थितम् ॥ ९७ ॥

कपिल ह्मणतात ।

तळपायांपासून गुडघ्यांपर्यंत पृथ्वीस्थान प्रतिष्ठित आहे. त्यांत एक पद्म असून तें सर्व देहामध्यें व्यापून राहिलें आहे ॥ ९७ ॥

जान्वादिनाभिपर्यंतमपां स्थानं हि कथ्यते ॥
आधारलिंगं नाभौ च वेदशास्त्रादिसंज्ञितं ॥ ९८ ॥

गुडघ्यांपासून नाभीपर्यंत जलाचें स्थान आहे असें ह्मणतात. नाभीमध्यें वेदशास्त्रादि संज्ञित आधारलिंग आहे ॥ ९८ ॥

त्रिस्थानेषु चतुर्दलाब्जमथ षट्पर्णैर्युतं पंकजम् ॥
आस्तेऽन्यद्दशपर्णमब्जमथ वै पर्णेषु तेषां क्रमात् ॥
आद्ये वर्णचतुष्टयं व, श, ष सेत्यन्यत्र षड्वर्णकम् ॥
वाद्यं लान्तमथापि वर्णदशकं डाद्यं च फान्तं स्मृतम् ॥ ९९ ॥

त्यांत तीन स्थानीं तीन कमळें आहेत. त्यांतील एक चारदळांचें, दुसरें सहा दळांचें व तिसरें दहा दळांचें आहे. त्यांतील पहिल्या कमळाच्या दळांवर व, श, ष व स हीं चार अक्षरें असतात. दुसऱ्याच्या दळांवर ब, भ, म, य, र, व ल हीं सहा अक्षरें असतात व दहादळांच्या तिसऱ्या कमळाच्या प्रत्येक दळावर ड, ढ, ण, त, थ, द, ध, न, प व फ अशीं दहा अक्षरें असतात ॥ ९९ ॥

नाभ्यादि कंठपर्यंतमग्निस्थानं सुशोभितम् ॥
तन्मध्ये पद्ममेकं हि हृदि स्थूलं च संज्ञितम् ॥ १०० ॥

नाभीपासून कंठापर्यंत सुशोभित अग्निस्थान असतें. त्यांत स्थूल या नांवाचें एकच पद्म हृदयप्रदेशीं असतें ॥ १०० ॥

दलैर्द्वादशभिर्वर्णैर्युक्तमक्षरमव्ययम् ॥
ककारादिठकारान्तैर्वर्तते सर्वदेहिषु ॥ १ ॥

त्याला क पासून ठ पर्यंत जीं बारा अक्षरें आहेत त्यांनीं युक्त असलेल्या बारा पाकळ्या असतात. तें कमल अक्षर व अव्यय आहे व तें सर्व देह धारण करणारांमध्यें असतें ॥ १०१ ॥

कंठादिभ्रुकुटिप्रान्ते वायुस्थानं तु तत्स्मृतम् ॥
तालुमूले स्थितं पद्मं दलैः षोडशकैर्युतम् ॥ १०२ ॥

कंठापासून भ्रुकुटीप्रांतापर्यंत वायुस्थान स्मृत आहे. त्यांत मुखांतील तालूच्या मुळाशीं सोळा दळांचें पद्म आहे ॥ १०२ ॥

स्वराः षोडशकास्तत्र तदूर्ध्वं हृदि पंकजम् ॥
एकं सूक्ष्मात्सूक्ष्मतरं चक्षुरग्रेषु शोभितम् ॥ १०३ ॥

त्याच्या दळांवर सोळा स्वर आहेत. त्याच्यावर एक हृत्कमल आहे. तें अति सूक्ष्म असून नेत्रांच्या अग्रभागीं अतिशय शोभत असतें ॥ १०३ ॥

तदेव हृदयं नाम सर्वशास्त्रसुसंमतम् ॥
अन्यथा हृदि किंचास्ति प्रोक्तं यत्स्थूलबुद्धिभिः ॥ १०४ ॥

सर्व शास्त्रांस अतिशय संमत असलेलें तेंच हृदय होय. उरःस्थळीं हृदय आहे असें कित्येक समजत असतात. पण स्थूलबुद्धि पुरुषांचें तें ह्मणणें अग्राह्य आहे. (अनुभवावांचून हीं स्थानें कळत नसतात) ॥ १०४ ॥

रक्तं श्वेतं तथा कृष्णं नीलपीतादिशोभितम् ॥
तन्मध्ये व्यापितं येन तज्ज्योतिर्ब्रह्म केवलम् ॥ १०५ ॥

तें रक्तवर्ण श्वेतवर्ण, तसेंच कृष्णवर्ण असून नील पीतादि वर्णांनीं सुशोभित झालेलें असतें. त्याच्या मध्यभागास ज्यानें व्यापलें आहे तें ज्योतिःस्वरूपच केवल ब्रह्म आहे ॥ १०५ ॥

स ब्रह्मा स शिवो विष्णुः सोऽक्षरः परमः स्वराट् ॥
सर्वे क्रीडंति तत्रैते तत्सर्वेंद्रियसंभवम् ॥ १०६ ॥

तोच ब्रह्मा, तोच शिव, तोच विष्णु व अक्षर परम स्वराट् होय. हे सर्व देव त्याच्याच स्वरूपांत क्रीडा करीत असतात. तेंच तत्त्व सर्व इंद्रियांचें उत्पत्तिस्थान आहे ॥ १०६ ॥

आभ्रुवो ब्रह्मरंध्रान्तं स्थानमाकाशसंज्ञितम् ॥
सहस्रदलसंयुक्तं पद्मं तत्र विराजते ॥ १०७ ॥

भ्रूप्रदेशापासून ब्रह्मरंध्रापर्यंत आकाशसंज्ञक स्थान आहे. त्यांत सहस्रदलयुक्त पद्म विराजमान होतें ॥ १०७ ॥

सुषुप्तिकाले संप्राप्ते आत्मासौ पद्ममाश्रितः ॥
यथा भानूदये सर्वे तथा देहेषु चेष्टते ॥ १०८ ॥

सुषुप्तिकाळ प्राप्त झाला असतां हा आत्मा या पद्माचा आश्रय करून रहातो. व सूर्यास्तानंतर पृथ्वीवरील प्राण्यांच्या सर्व क्रिया जशा बंद पडतात, त्याप्रमाणें आत्मा त्या पद्मामध्यें गेल्यावर इंद्रियांच्या सर्व क्रिया बंद पडतात. व सूर्योदय झाला असतां प्राण्यांच्या क्रिया जशा सुरू होतात, त्याप्रमाणें आत्मा त्यांतून बाहेर आला म्हणजे देहस्थ इंद्रियांच्या क्रिया होऊं लागतात. [वस्तुतः आत्मा विभु असल्यामुळें कोठें जात–येत नाहीं. पण मनाच्या जाण्या–येण्याचा आरोप स्वाभाविक अविवेकामुळें होतो.] ॥ १०८ ॥

भ्रुवोर्मध्ये पद्ममेकं द्विदलं तच्च शोभितं ॥
हंसमक्षरसंयुक्तं वर्तते वायुमण्डले ॥ १०९ ॥

भुवयांच्या मध्यें एक द्विदल पद्म आहे. तें फार सुशोभित असतें हं व सः अशीं अक्षरें त्याच्या दलावर असतात. तें कमल वायुमंडलांत असतें ॥ १०९ ॥

तन्मध्ये त्वात्मज्योतिश्च शिखेव तु विराजते ॥
नीवारशूकवत्तन्वी पीता भास्वत्यणूपमा ॥ ११० ॥

त्यामध्यें आत्मज्योति दीपशिखेप्रमाणें विराजमान होत असते. ती तृणधान्याच्या पुढें असलेल्या बारिक कुसाप्रमाणें अगदीं सूक्ष्म व पातळ असते. तिचा वर्ण पिंवळा असून ती देदीप्यमान व अनुपम असते ॥ ११० ॥

तस्याः शिखाया मध्ये च परमात्मा व्यवस्थितः ॥
गुरुमुखेन ज्ञातव्यः सोऽन्यथा नोपलभ्यते ॥ १११ ॥

त्या शिखेच्या मध्यभागीं परमात्मा व्यवस्थित असतो. तो गुरुमुखानें ज्ञात होतो. त्या वांचून त्याचें ज्ञान होत नाहीं ॥ १११ ॥

अनेकजन्मसंस्कारात्सद्गुरुः सेव्यते बुधैः ॥
संतुष्टः श्रीगुरुर्देव आत्मरूपं प्रदर्शयेत् ॥ ११२ ॥

अनेक जन्मांतील संस्कारांमुळें सुज्ञजन सद्गुरूंची सेवा करितात. व संतुष्ट झालेला सद्गुरु देव आत्मरूप दाखवितो ॥ ११२ ॥

कोटिसूर्यप्रतीकाशं चंद्रकोटिसुशीतलं ॥
यथोक्तं वेदशास्त्रैस्तद्धवेद्दृश्यं हि धीमताम् ॥ ११३ ॥

वेदशास्त्रांनीं जसें सांगितलें आहे तसें कोटिसूर्यासारखें देदीप्यमान व कोटिचंद्रासारखें अतिशय शीतळ असलेलें तें आत्मरूप बुद्धिमानांस दृश्य होतें ॥ ११३ ॥

आत्मज्योतिःप्रभावेण भान्ति सोमाग्निभानवः ॥
अन्तर्बहिश्च तत्सर्वं व्याप्नोति सकलं जगत् ॥ ११४ ॥

या आत्मज्योतीच्या प्रभावानें चंद्र, अग्नि व सूर्य प्रकाशित होतात. ती ज्योतीच या सर्व जगास आंतून व बाहेरून व्यापून रहाते ॥ ११४ ॥

एतदूर्ध्वं शून्यरूपं सहस्रदलमध्यगम् ॥
अर्धमात्रं सुविज्ञेयं प्रणवेन च भूषितम् ॥ ११५ ॥

यां भ्रूमध्य स्थानाच्या वर सहस्रपत्र कमलामध्यें प्रणवानें भूषित असलेलें अर्धमात्रा युक्त शून्यरूप साक्षात् जाणण्यास योग्य आहे ॥ ११५ ॥

व्याहृत्यादिक्रियाः सर्वा वर्तंते हृदि पंकजे ॥
मुख्यं स्थानमिदं ज्ञेयादात्मा तत्रैव तिष्ठति ॥ ११६ ॥

पूर्वोक्त व्याहृति इत्यादि सर्व क्रिया हृदयकमळांत रहातात. तें मुख्य आहे. असें जाणावें. कारण आत्मा तेथेंच रहातो ॥ ११६ ॥

आत्मदर्शनमात्रेण जीवन्मुक्तो न संशयः ॥
तस्मात्सर्वप्रयत्नेन कर्तव्यं स्वात्मदर्शनम् ॥ ११७ ॥

केवळ आत्मदर्शनानेंच मानव जीवन्मुक्त होतो, यांत संशय नाहीं. यास्तव सर्व प्रयत्नानें आत्मदर्शन करावें ॥ ११७ ॥

सूत उवाच ।

इत्युक्त्वा कपिलः श्रेष्ठः कृतार्थस्तेन संगताः ॥
ऋषिसिद्धाश्च तेऽपापा आत्मरूपे प्रतिष्ठिताः ॥ ११८ ॥

सूत ह्मणतो ।

असें बोलून श्रेष्ठ कपिल कृतार्थ (कर्तव्य संपल्यामुळें स्वस्थ बसला) झाला व त्याच्याशीं ज्यांची संगति झाली आहे असे ऋषी व सिद्ध निष्पाप होऊन आत्मस्वरूपांत प्रतिष्ठित झाले ॥ ११८ ॥

ऋषिसिद्ध उवाच ।

हृदि द्मे स्थितं ब्रह्म विस्तृतं कथितं त्वया ॥
शरीरलक्षणं वेदसंख्यां च कृपया वद ॥ ११९ ॥

ऋषिसिद्ध ह्मणतात ।

हे मुने, हृत्पद्मामध्यें स्थित असलेल्या ब्रह्माविषयीं तूं आह्मांस विस्तृत उपदेश केलास. पण आतां कृपा करून शरीरलक्षण व वेदसंख्या आह्मांस सांग ॥ ११९

कपिल उवाच ।

आपादाच्छीर्षपर्यंतं मूर्तिरूपं प्रदृश्यते ॥
अकारमातृकं श्वेतताम्रवर्णसुशोभितम् ॥ १२० ॥

कपिल ह्मणतो ।

पायांपासून मस्तकापर्यंत, जें मूर्तिरूप दिसतें, तें अकारमात्रामय असून ताम्रवर्णानें सुशोभित असतें ॥ १२० ॥

सर्वेंद्रियाणां व्यापार ऋग्वेदो वर्णितस्तथा ॥
विश्वाभिमानी संप्रोक्तो रजोगुणसमाश्रितः ॥ १२१ ॥

सर्व इंद्रियांच्या व्यापारास ऋग्वेद असें ह्मटलें आहे. रजोगुणाचा ज्यानें आश्रय केला आहे; असा विश्व या अवस्थेचा अभिमानी आहे ॥ १२१ ॥

भूमितत्त्वं दृश्यरूपं स्थूलभोगस्तथैव च ॥
विपरीतज्ञानयुक्तं तत्र वाग्वैखरी मता ॥ १२२ ॥

भूमि हें त्याचें तत्त्व आहे तें दृश्य आहे. विश्वाचा भोग स्थूल असतो. तो देहादि अनात्मास आत्मा समजणें इत्यादि विपरीत ज्ञानानें युक्त असतो त्या अवस्थेंत वैखरी वाणीचा व्यवहार चालतो ॥ १२२ ॥

प्रमाणं च तथा प्रोक्तं सार्धहस्तत्रयान्वितं ॥
अवस्था जागृतिस्तत्र नेत्रे तेजो यतः स्थितम् ॥ १२३ ॥

त्या शरीराचें प्रमाण साडेतीन हात असतें. जागृति ही त्याची अवस्था असून आत्मतेज नेत्रांमध्यें असतें ॥ १२३ ॥

पंचभूतात्मको देहः पंचविंशतितत्त्वकः ॥
प्रत्येकं भूतमात्रं च शृणु सिद्ध महामुने ॥ १२४ ॥

हा देह पंचभूतात्मक व पंचवीस तत्त्वमय आहे. आतां त्यांतील प्रत्येकाच्या भूतमात्रा कशा विभक्त झाल्या आहेत. तें हे सिद्धमहामुने तूं ऐक ॥ १२४ ॥

उत्पत्तिर्जागरो बोधो व्यावृत्तिश्च चतुर्थिका ॥
कलाचतुष्टयं चैतज्जाग्रतीत्यभिधीयते ॥ १२५ ॥

उत्पत्ति, जागर, बोध व चवथी व्यावृत्ति या चार कलांच्या समुदायास जागृति असें म्हणतात ॥ १२५ ॥

कामः क्रोधस्तथा लोभो भयं मोहस्तथैव च ॥
आकाशभागाः संप्रोक्ता ज्ञेयाश्चेमे मनीषिभिः ॥ १२६ ॥

काम, क्रोध, लोभ, भय, व मोह हे आकाशाचे भाग सांगितलेले आहेत, असें विद्वानांनीं जाणावें ॥ १२६ ॥

प्रसरणं चंचलत्वं गमनागमनं तथा ॥
भ्रमणाकुंचनं पंच वायुभागा इति स्मृतम् ॥ १२७ ॥

प्रसरण, चंचलत्व, गमनागमन, भ्रमण व आकुंचन हे पांच वायुभाग म्हणून सांगितलें आहे ॥ १२७ ॥

निद्रा भोगो रतिश्चैव क्षुधा तृषा तथैव च ॥
भागा आलस्यमित्येव स्थले पंच प्रशंसिताः ॥ १२८ ॥

निद्रा, भोग, रति, क्षुधा, तृषा, व आलस्य हे तेजाचे भाग या शरीरांत आहेत असें सांगितलें आहे ॥ १२८ ॥

श्लेष्मा शुक्रं तथा रक्तं मूत्रं मेदस्तु पंचकम् ॥
जलभागास्तु भो विप्र इत्येवं संप्रकीर्तिताः ॥ १२९ ॥

हे विप्र ! श्लेष्मा, शुक्र, रक्त, मूत्र, व पांचवा मेद हे जलाचे भाग म्हणून सांगितलें आहे ॥ १२९ ॥

रोमत्वङ्मांसनाड्यो वै अस्थीनीति तथा मताः ॥
पृथ्वीभागा इमे पंच विज्ञेयास्तु मनीषिभिः ॥ १३० ॥

रोम, त्वक्, मांस, नाड्या व अस्थि हे पांच पृथ्वीचे भाग शरीरांत आहेत, असें विद्वानांनीं जाणावें ॥ १३० ॥

इदं पंचगुणाख्यानं सविभागं सुविस्तृतम् ॥
एकैकस्य च भूतानां ज्ञातव्यं तु मनीषिभिः ॥ १३१ ॥

विभागांसह व विस्तारपूर्वक सांगितलेलें हें एकेका भूताच्या पांच पांच गुणांचें आख्यान विद्वानांनीं चांगलें समजून घ्यावें ॥ १३१ ॥

इत्युक्तः स्थूलविस्तारस्तारकं नवरूपकम् ॥
व्यापकं सर्वदेहानां दृश्यते चर्मचक्षुषा ॥ १३२ ॥

याप्रमाणें मी हा तुम्हांस स्थूलाचा विस्तार सांगितला. आतां सर्व शरीरांत व्यापक असणारें व चर्मचक्षूंनीं ही दिसणारें तारक नवरूप सांगतों ॥ १३२ ॥

अथ सूक्ष्मशरीरं तद्वर्णव्यक्तिं तथैव च ॥
स्थानं कर्म क्रियाः सर्वाः स्वस्थचित्तेन त्वं शृणु ॥ १३३ ॥

सूक्ष्मशरीर, त्याच्या वर्णाची अभिव्यक्ति, स्थान, कर्म व सर्व क्रिया, या सर्वांचें तूं स्वस्थचित्तानें श्रवण कर ॥ १३३ ॥

अपंचीकृतभूतेभ्यो लिंगदेहः स उच्यते ॥
स्थानं कण्ठप्रदेशस्तु गुणः सत्वः प्रकीर्तितः ॥ १३४ ॥

पंचीकरण न केलेल्या अर्थात् तन्मात्रारूप सूक्ष्म भूतांपासून सूक्ष्मशरीर होतें. त्यास लिंगदेह असेंही ह्मणतात. त्याचें स्थान कंठप्रदेश व गुण सत्त्व सांगितला आहे ॥ १३४ ॥

उकारमातृका तत्र स्वप्नावस्थाऽभिधीयते ॥
तत्राऽन्यथाज्ञानमस्ति वायुतत्त्वं प्रतिष्ठितम् ॥ १३५ ॥

उकार ही त्याची मात्रा व स्वप्न अवस्था आहे. त्यांत विपरीत ज्ञान होतें व तेथें वायुतत्त्व प्रतिष्ठित आहे ॥ १३५ ॥

शुक्लवर्णात्मकं रूपं वाक्तथा मध्यमा स्मृता ॥
यजुर्वेदः स विज्ञेयो मनो वैकारिकं स्मृतम् ॥ १३६ ॥

त्याचें रूप शुक्लवर्णात्मक आहे. वाणी मध्यमा सांगितली आहे. यजुर्वेद हा त्या देहाचा वेद आहे व त्यांतील मन विकार पावलेलें असतें ॥ १३६ ॥

अंगुष्ठमात्रं संप्रोक्तं साभिमानं तु तैजसम् ॥
प्रविविक्तं च भोगाख्यं शरीरं सूक्ष्मकं स्मृतम् ॥ १३७ ॥

त्याचें प्रमाण अंगुष्ठमात्र आहे. त्याचा अभिमानी तैजस ह्या अवस्थेंतील भोग जागृतींतील भोगांप्रमाणें स्थूल नसून सूक्ष्म आहे. त्या शरीरास सूक्ष्म शरीर असें म्हणतात. हें वर [१३३ श्लो.] सुचविलेंच आहे. ॥ १३७ ॥

यद्यं भावं समापन्नं सादृश्यं तेन तस्य वै ॥
मनो वैकारिकं सर्वं स्वप्नावस्था च तुष्टये ॥ १३८ ॥

तें ज्या ज्या भावास प्राप्त होतें त्याच्या त्याच्या स्वरूपाचें बनतें. हा त्याचा स्वभावच आहे. त्यांतील मन वासनात्मक असतें. तें जागृतींत जें जें पहातें त्याचा त्याचा स्वप्नांत स्मरणरूपानें अनुभव घेतें. एवंच स्वप्नावस्था जीवांच्या तुष्टीस कारण होते. ॥ १३८ ॥

बुद्ध्यंतःकरणे चैव मनश्चित्तमहंकृतिः ॥
आकाशभागा विज्ञेयाः पंचैवेमे मनीषिभिः ॥ १३९ ॥

बुद्धि, अंतःकरण, मन, चित्त व अहंकार हे पांच आकाशाचे भाग आहेत, असें सुज्ञांनीं समजावें ॥ १३९ ॥

व्यानः समानोदानौच प्राणापानौ तथैव च ॥
एतद्वै पंचकं प्रोक्तं वायुभागस्य पण्डितैः ॥ १४० ॥

प्राण, अपान, व्यान, उदान व समान हें वायुभागाचें पंचक पंडितांनीं सांगितलें आहे ॥ १४० ॥

श्रोत्रं त्वक्चक्षुषी जिव्हा घ्राणं पंचममेव च ॥
तेजोभागा इमे ज्ञेयाः सूक्ष्मदेहेषु चारिणः ॥ १४१ ॥

श्रोत्र (कर्ण) त्वक्, चक्षु, जिव्हा व पांचवें घ्राण हे सूक्ष्म देहामध्यें संचार करणारे पांच तेजोभाग आहेत, असें जाणावें ॥ १४१ ॥

वाक्पाणिपादौ शिश्नं च गुदं वै पंचमं स्मृतम् ॥
अपां पंच विभागास्तु इमे सन्ति प्रकीर्तिताः ॥ १४२ ॥

वाक्, हस्त, पाद, शिश्न व गुद हे पांच जलाचे विभाग आहेत असें वर्णन केलेलें आहे ॥ १४२ ॥

शब्दः स्पर्शश्च रूपं च रसो गंधस्तथैव च ॥
एतत्तु पंचकं तत्र पृथ्वीभागस्य प्रोच्यते ॥ १४३ ॥

शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हें पृथ्वीभागाचें पंचक आहे, असें सांगितलें आहे ॥ १४३ ॥

पंचभिः पंचभिर्व्याप्तं तच्छरीरं लिंगसंज्ञितम् ॥
यत्स्थानं कण्ठदेशश्च यच्च सूक्ष्मतरं स्मृतम् ॥ १४४ ॥

ज्याचें स्थान कंठदेश आहे व जें अति सूक्ष्म म्हणून सांगितलें आहे तें हें लिंगसंज्ञित शरीर अशा पांच पंचकांनीं व्याप्त आहे ॥ १४४ ॥

स्थूलदेहस्य मध्यस्थः श्वेतवर्णविराजितः ॥
जीवः क्रीडति तत्रैव तदूर्ध्वं हृदि सूक्ष्मकम् ॥ १४५ ॥

स्थूल देहाच्या मध्यभागीं असलेला श्वेतवर्ण विराजमान होत असतो. त्यांतच जीव क्रीडा करीत असतो. त्याच्यावर हृदयांत सूक्ष्म तत्त्व असतें ॥ १४५ ॥

शरीरं कारणं चास्ते पंचविंशतितत्त्वकम् ॥
गुणरूपे तथा वर्णस्थानकर्माणि दैवतम् ॥ १४६ ॥
तत्सर्वं कथयिष्यामि स्वस्थचित्तेन संशृणु ॥
कारणं हृदयस्थाने तमोगुणसमुद्भवम् ॥ १४७ ॥
प्राज्ञोऽभिमानी तत्रस्थो भोग आनंद एव च ॥
मकारमातृका यत्र अवस्था तु सुषुप्तिका ॥ १४८ ॥

तेंच पंचवीस तत्त्वांचें कारणशरीर आहे. त्याचे गुण, रूप, वर्ण, स्थान, कर्म, देवता, इत्यादि सर्व आतां सांगेन तें स्वस्थचित्तानें ऐक. कारणशरीर हृदयस्थानीं असतें. तें तमोगुणापासून उत्पन्न झालें आहे. त्यांतील प्राज्ञ हा अभिमानी आहे. म्हणजे त्या शरीरावर अभिमान ठेवणाऱ्या आत्म्यास प्राज्ञ म्हणतात. तो आनंदाचा भोग घेतो. मकार ही मातृका आहे. व अवस्था सुषुप्ति होय. ॥ १४६ ॥ १४७ ॥ १४८ ॥

अज्ञानं तेजसस्तत्त्वं कृष्णरूपं च दृश्यते ॥
देहः पर्वार्धमात्रो हि पश्यन्ती वाक् च संस्मृता १४९ ॥

कृष्णरूप अज्ञान व तेजाचें तत्त्व त्यांत दिसतें. त्याचें प्रमाण अर्धपर्वमात्र असून वाणी पश्यंती सांगितली आहे ॥ १४९ ॥

सामवेदस्तु विज्ञेयो हृदि पद्मे सुशोभितम् ॥
तेजोमयं मण्डलं च वर्तते सर्वदेहिनाम् ॥ १५० ॥

त्याचा वेद सामवेद असून सर्व देहवानांच्या हृत्कमलांत सुशोभित तेजोमय मंडल असतें. ॥ १५० ॥

मरणं विस्मृतिर्मूर्च्छा निद्रा च तमसावृता ॥
कलाचतुष्टययुता सुषुप्तीत्यभिधीयते ॥ १५१ ॥

सुषुप्ति, मरण, मूर्च्छा, विस्मृति व तमानें आवृत झालेली निद्रा अशा या चार कलांनीं युक्त असतें. असें सांगतात ॥ १५१ ॥

अवकाशो विस्मृतिश्चाऽऽवरणं निरावरणम् ॥
प्रमाणत्वमिमे भागा आकाशस्य प्रकीर्तिताः ॥ १५२ ॥

अवकाश, विस्मृति, आवरण, निरावरण, व प्रमाणत्व हे आकाशाचे भाग सांगितलेले आहेत. ॥ १५२ ॥

भ्रांतिः शंका शोषणं च शिथिलीकरणं तथा ॥
धीरत्वमिति पंचैव वायुभागाः प्रकीर्तिताः ॥ १५३ ॥

भ्रांति, शंका, शोषण, शिथिल करणें व धीरत्व हे पांच वायूचे भाग उक्त आहेत ॥ १५३ ॥

गूढरूढकृतघ्नत्वान्यविचारश्चतुर्थकः ॥
सक्लेशत्वमिमे पंच तेजोभागाः प्रशंसिताः ॥ १५४ ॥

गूढत्व, रूढत्व, कृतघ्नत्व, अविचार व सक्लेशत्व असे पांच तेजोभाग सांगितले आहेत. ॥ १५४ ॥

मृदुत्वं शोषणत्वं च हलाहलत्वमेव च ॥
क्लेदनं धारणत्वं च जलभागाः प्रशंसिताः ॥ १५५ ॥

मृदुत्व, शोषणत्व, हलाहलत्व, क्लेदन व धारण हे जलभाग आहेत, असें वर्णन केलें आहे ॥ १५५ ॥

मूढत्वं च बलित्वं च लज्जावत्त्वं तृतीयकम् ॥
पिंडीकरणमेवं हि काठिन्यं पंचमं स्मृतम् ॥ १५६ ॥
एवं हि पंचकं प्रोक्तं पृथ्वीभागस्य कोविदैः ॥
ह्यद्येवं कारणं ज्ञेयं शरीरं तु तृतीयकम् ॥ १५७ ॥

मूढत्व, बलित्व, तिसरें लज्जावत्व, पिंडीकरण, काठिन्य, हें पंचक पृथ्वीभागाचें आहे असें विद्वानांनीं सांगितलें आहे. याप्रमाणें तिसरें कारणशरीर हृदयांत असतें ॥ १५६ ॥ १५७ ॥

एतदूर्ध्वं तु देहेषु महाकारणमुच्यते ॥
स्थानमैश्वरमाख्यातं जीवत्वं तत्र लीयते ॥ १५८ ॥

या तिसऱ्या शरीरावर देहामध्यें महाकारण ह्मणून एक शरीर असतें. त्याचें ऐश्वरस्थान सांगितलेलें आहे. त्यांत जीवत्व लीन होत असतें ॥ १५८ ॥

तत्सर्वं शृणु भो विप्र विस्तृतं कथयाम्यहम् ॥
शुद्धसत्वगुणं प्रोक्तं प्रत्यगात्माभिमानिनम् ॥ १५९ ॥

आतां, हे विप्रांनों, मी तें च सविस्तर सांगतों; ऐका. त्यांत शुद्धसत्वगुण असतो. प्रत्यगात्मा हा त्याचा अभिमानी आहे ॥ १५९ ॥

स्थानं मूर्धेति विज्ञेयं तथा भोगावभासकम् ॥
तुर्यावस्था ह्यर्धमात्रा विवेकज्ञानमाश्रिता ॥ १६० ॥

मूर्धा हें त्याचें स्थान आहे, असें जाणावें. त्याचप्रमाणें तें भोगाचें अवभासक आहे. त्याची अवस्था तुर्या व मात्रा अर्धमात्रा असून ती विवेकज्ञानाचा आश्रय करून रहाते ॥ १६० ॥

दृश्यरूपं वायुतत्त्वं नीलवर्णं विराजते ॥
देहो मसुरमात्रस्तु परा वाणी ह्यथर्वणः ॥ १६१ ॥

दृश्य हें त्याचें रूप, वायुतत्त्व, व नीलवर्ण विराजमान होत असतो. त्याचा देह मसुरप्रमाण असून वाणी अथर्वणरूप आहे (तिलाच परावाणी ह्मणतात.) ॥ १६१ ॥

महाकारणदेहोऽयं वर्तते वायुमण्डले ॥
कला चाष्टदला प्रोक्ता महाकारणसंज्ञिता ॥ १६२ ॥

हा महाकारण देह वायुमंडलांत असतो. त्याची महाकारणसंज्ञक कला आठ दलांनीं युक्त असते ॥ १६२ ॥

वैराग्यं च मुमुक्षुत्वमात्मत्वं तत्त्वदर्शनम् ॥
कलाचतुष्टयं चैव तुर्यावस्थाऽभिधीयते ॥ १६३ ॥

वैराग्य, मुमुक्षत्व आत्मत्व व तत्त्वदर्शन, या कलाचतुष्टयास तुर्यावस्था म्हणतात ॥ १६३ ॥

असंगत्वं च पूर्णत्वं व्यापकत्वं तृतीयकम् ॥
सर्वबीजमखण्डत्वमिदमाकाशपंचकम् ॥ १६४ ॥

असंगत्व, पूर्णत्व, व्यापकत्व, सर्वबीज व अखंडत्व हें आकाशपंचक त्यांत असतें ॥ १६४ ॥

अच्छेद्यत्वमजत्वं च परात्परत्वनैर्मल्ये ॥
अजरत्वमिमे पंच वायुभागाः प्रशंसिताः ॥ १६५ ॥

अच्छेद्यत्व, अजत्व, परात्परत्व, नैर्मल्य व अजरत्व ह्या त्यांतील पांच वायु गुणांची प्रशंसा केली आहे ॥ १६५ ॥

ऊर्ध्वपदमदाह्यत्वं प्रकाशत्वं तथैव च ॥
चैतन्यं च त्वनर्घ्यत्वं तेजोभागाःप्रकीर्तिताः ॥ १६६ ॥

ऊर्ध्वस्थानीं रहाणें, अदाह्यत्व, प्रकाश, चैतन्य व अनर्घ्यत्व हे त्यांतील तेजोभाग सांगितले आहेत ॥ १६६ ॥

अक्लेद्यविश्वजीवत्वे ज्योतीरसत्वमेव च ॥
कारुण्यममृतत्वं च ह्यपां भागास्तु पंच वै ॥ १६७ ॥

अक्लेद्य, विश्वजीवत्व, ज्योतीरसत्व, कारुण्य व अमृतत्व हे पांच महाकारणस्थ जलभाग आहेत ॥ १६७ ॥

अशोष्यत्वं कारणत्वं पावनत्वमिति स्मृतम् ॥
आधारत्वं समृद्धत्वं पृथ्वीभागाः प्रशंसिताः ॥ १६८ ॥

अशोष्यत्व, कारणत्व, पावनत्व, आधारत्व व समृद्धत्व असे पांच पृथ्वीभाग प्रशस्त आहेत ॥ १६८ ॥

विस्तरेण हि संप्रोक्तमंशतत्त्वं तु यद्भवेत् ॥
तदेव सर्वतत्त्वेषु महाकारणमुच्यते ॥ १६९ ॥

असो, हें अंशतत्व सविस्तर सांगितलें. तेंच सर्व तत्वांतील महाकारण होय, असें ह्मटलें आहे ॥ १६९ ॥

देहमध्ये महाश्रेष्ठो नारीकेलफलाम्बुवत् ॥
आंतरादान्तरः प्रोक्तः सर्वत्राऽऽत्मा समास्थितः ॥ १७० ॥

नारळांतील जलाप्रमाणें देहामध्यें सर्वत्र अगदीं आंत आंत तो महाश्रेष्ट आत्मा स्थित आहे असें सांगितलें आहे ॥ १७० ॥

त्रिपुरक्रीडया बाह्ये जीवेत्याख्यं सगच्छति ॥
जहदजहद्भावात्तु सैष जीवः सदाशिवः ॥ १७१ ॥

तीन अवस्थांमध्यें स्थूल सूक्ष्म व कारण या तीन बाह्यपुरांत तो आत्मा जीव या संज्ञेस प्राप्त झाला आहे, पण त्या वेळीं तो आपला शुद्धभाव सोडून सत्वादिधर्म सोडीत नसल्यामुळें तोच जीव सदाशिव होतो ॥ १७१ ॥

त्रिपुरक्रीडतश्चान्तो ह्यवस्था तून्मनी ततः ॥
शब्दो न जायते तत्र लक्षणा च तृतीयका ॥ १७२ ॥

या तीन पुरांतील क्रीडेच्या पलीकडे उन्मनी अवस्था आहे. त्यांत शब्दाची प्रवृत्ति होत नाहीं. त्याच्या ज्ञानाकरितां तिसरी जहदजहल्लक्षणा करावी लागते ॥ १७२ ॥

तत्त्वमसीति विज्ञानं देहेऽस्मिन्नु चतुर्थके ॥
गुरुमुखेन ज्ञातव्यं ह्यन्यथा प्राप्यते कथम् ॥ १७३ ॥

तत् त्वं असि या महावाक्याचें विज्ञान वरील लक्षणेनें या चवथ्या शरीरांतच होतें पण तो लक्षणेचा प्रकार गुरुमुखानें जाणून घ्यावा. त्या वांचून तो कसा समजणार? ॥ १७३ ॥

तस्मात्सर्वप्रयत्नेन कर्तव्यं त्वात्मदर्शनम् ॥
अहं देहो जीव इति धीः सर्वैस्त्यज्यतामियम् ॥ १७४ ॥

तस्मात् सर्व प्रयत्नानें आत्मदर्शन करावें. देह हाच मी जीव ही बुद्धि सर्वांनीं सर्वथा टाकावी ॥ १७४ ॥

चतुरशितिलक्षेषु योनियंत्रेषु गच्छतः ॥
प्राप्तं ते मानवं जन्म भवेदानीं सुखात्मकः ॥ १७५ ॥

अरे नरा, चवऱ्यायशीं लक्ष योनींतून फिरतां फिरतां तुला हा मानव जन्म लाधला आहे. तर आतां सुखरूप हो. (आत्म्याला न जाणल्यामुळें पुनः त्या अनेक लक्ष योनिचक्रांत पडूं नकोस) ॥ १७५ ॥

साक्षात्कारात्स्थिरं चित्तं जायते लीनमात्मनि ॥
तदैव जायते जन्तोर्जन्ममृत्युविनाशनम् ॥ १७६ ॥

आत्मसाक्षात्कार झाला असतां स्थिर झालेलें चित्त आत्म्यामध्यें लीन होतें. आणि तसें झालें असतां तात्काळ प्राण्याच्या जन्ममृत्यूचा नाश होतो ॥ १७६ ॥

देहनिर्णयस्थाने च वर्णव्यक्तिस्तथैव हि ॥
प्रमाणं सर्वतत्त्वानि वर्णितानि त्वया गुरो ॥ १७७ ॥

ऋषिसिद्धः– देहाचा निर्णय त्यांचीं स्थानें, वर्णांची व्यक्ति, प्रमाण, व सर्व तत्त्वें हे प्रभो, आपण वर्णिलीत ॥ १७७ ॥

गुरूक्तिश्रवणेनैव जीवबुद्धिर्विलीयते ॥
आत्मवत्सर्वभूतानि यस्य तस्यात्मदर्शनम् ॥ १७८ ॥

गुरूचें भाषण श्रवण करितांच देहबुद्धि (मी देह हो बुद्धी) लीन होते. ज्याला सर्व भूतें आपल्यासारखीं आत्मवत् वाटतात त्याला आत्मदर्शन होतें ॥ १७८ ॥

शरीरं वेदसंख्यं च ज्ञात्वा तव प्रसादतः ॥
आकाशे ह्यर्धभागे च मण्डलं वायुसंज्ञकम् ॥ १७९ ॥

गुरुराज कपिलमुने, आपल्या प्रसादानें चार प्रकारचें शरीर समजलें. आकाशमंडलाच्या अर्ध्या भागांत वायुसंज्ञक मंडल आहे ॥ १७९ ॥

पद्मं च द्विदलाकारं चक्षुर्नामेति कथ्यते ॥
तन्मध्ये सर्वसारं च ज्ञात्वा धन्योऽस्मि भो मुने ॥ १८० ॥

त्यांत द्विदलावर पद्म असून त्याचें चक्षु असें नाम सांगतात. त्यांत सर्वांचें सार आहे. त्याला जाणल्यामुळें मी धन्य झालों आहें ॥ १८० ॥

जात्यंधानां दृष्टिमध्ये फलपुष्पाद्युपाधितः ॥
आत्मनो दर्शनं न स्यादनात्मानो हि ते किमु ॥ १८१॥

पण आतां मला आणखी एक शंका आली आहे ती विचारतों. जन्मापासून जे अंध असतात, त्यांच्या दृष्टीमध्यें फूल पडल्यामुळें वडस वाढल्यामुळें त्यांस रूपवान् पदार्थांच्या द्वारा आत्मदर्शन होणें शक्य नाहीं. तेव्हां अशा लोकांना आत्मदर्शन कसें होणार? ते अनात्मरूप रहाणार कीं काय ? ॥ १८१॥

गमनादिक्रियास्तस्य जायंते तत्कथं वद ॥
अनात्मा स तु नो वाच्यस्तस्य ज्योतिः क्व वर्तते ॥ १८२ ॥

अशा जन्मांधाच्या गमन, भाषणादि क्रिया कशा होतात, तें सांगा. त्या क्रिया करणारास अनात्मा, तर म्हणतां येत नाहीं. तेव्हां त्याची ज्योति कोठें असते?॥ १८२॥

चतुर्देहसमायुक्तं सर्वतत्त्वैः सुमिश्रितम् ॥
पंचप्राणसमायुक्तं वपुस्तस्य कथं चरेत् ॥ १८३ ॥

चार देहांनीं युक्त असलेला, सर्वतत्त्वांनीं अत्यंत मिश्रित झालेला व पंचप्राणसमायुक्त असा त्याचा पिंड व्यवहार कसा करितो ? ॥ १८३ ॥

एवं च प्राप्तं संदेहमेतं छिन्धि ह्यसंशयम् ॥
वाचा मंजुलया देव मनःशांतिर्यया भवेत् ॥ १८४ ॥

हा मला संशय आला आहे. त्याचा छेद करून मला निःसंदेह कर. हे देवा ! जिच्या योगानें मनःशांति होईल अशा मंजुळ वाणीनें माझें समाधान कर ॥ १८४॥

कपिल उवाच ।

अमुं प्रश्नं महाश्चर्यं पूर्वं कोपि न पृष्टवान् ॥
ऋषिसिद्धगणाः सर्वे श्रोतुमिच्छन्ति तत्त्वतः ॥ १८५ ॥

इतिज्ञात्वा प्रवक्ष्यामि विना किञ्चिद्धि वंचनात् ॥
श्रोतुं सम्यक् स्वस्थबुद्ध्या चित्तमेकाग्रतां नय ॥ १८६ ॥

कपिल ह्मणतातः—हा महा आश्चर्यमय प्रश्न तूं केला आहेस. असला प्रश्न पूर्वी कोणीं कोणाला केला नव्हता. सर्व ऋषिसिद्धगण त्याचें तत्वतः ज्ञान करून घेण्याची इच्छा करीत असतात. असें जाणून कांहीं एक छल न करितां मी तें सांगेन पण बा शिष्या, तें स्वस्थ बुद्धीनें चांगल्या प्रकारें ऐकण्याकरितां तूं चित्त एकाग्र कर ॥ १८५ ॥ १८६ ॥

गर्भांधत्वे दृष्टिमध्ये कारणं पुष्पपटलम् ॥
संप्रोक्तं हि त्वया शिष्य क्व तद्देहत्रयं गतम् ॥ १८७ ॥

शिष्या, जन्मांध होण्याचें कारण डोळ्यांत फूल पडणें इत्यादि तूं सांगितलेंस. पण मी सांगितलेले तीन देह कोठें गेले ? ॥ १८७ ॥

तस्यात्मा क्व नु तिष्ठेत्स व्यापारं कथमाचरेत् ॥
इत्येव प्रश्नो युष्माकं मत्तस्तत्रोत्तरं शृणु ॥ १८८ ॥

त्याचा आत्मा कोठें राहील व व्यवहार कसा करील हा तुमचा प्रश्न आहे. यास्तव माझ्या तोंडून आतां त्याचें उत्तर ऐका ॥ १८८ ॥

धात्रा ह वै सृष्टिरियमस्ति स्थावरजंगमा ॥
प्रारब्धस्यानुसारेण निर्मिता पांचभौतिका ॥ १८९ ॥

ब्रह्मदेवानें ही स्थावरजंगमात्मक पांचभौतिक सृष्टि प्राण्यांच्या प्रारब्धाप्रमाणें निर्माण केली आहे ॥ १८९ ॥

जलजाश्च नवलक्षयोनयो बहुनामकाः ॥
जलूका नाम तत्राऽऽस्ते नेत्रकर्णविवर्जिता ॥ १९० ॥

जलचर प्राण्यांच्या नऊ लक्ष योनी आहेत व त्यांचीं अनेक नांवें आहेत. त्यांत जलूका (जळू) ह्मणून एक प्राणी आहे. तो नेत्र कर्ण यांनीं रहित असतो॥ १९० ॥

श्रवणं दर्शनं तस्या आहारगमनादयः ॥
जिव्हात्वग्भ्यां च युक्ताया भवंत्यष्टेंद्रियैः सह ॥ १९१ ॥

जिव्हा व त्वचा यांनीं युक्त असलेला त्या जळूच्या दर्शन, श्रवण, आहार गमन इत्यादि क्रिया आठ इंद्रियांनींच होतात ॥ १९१ ॥

एवं सर्पो विना कर्णं पाणिपादौ तथैव च ॥
श्रवणं कुरुते दृष्ट्या गच्छति ह्युरसा पि सः ॥ १९२ ॥

त्याचप्रमाणें सर्प हा कान, हात, पाय, यां वांचूनच असतो. तथापि तो नेत्रांनीं ऐकतो व उरानें गमन करितो ह्मणून त्यास क्रमानें चक्षुःश्रवा व उरग ह्मणतात ॥ १९२ ॥

स्थावराणां लतादीनां ज्ञायते बंधनं खलु ॥
त्वगिंद्रियबलं श्रेष्ठं तेष्वास्ते केवलं तु वै ॥ १९३ ॥

लतादि स्थावर पदार्थांत अनिष्ट वस्तूंचें ज्ञान होतें. तस्मात् त्यांच्याठायीं नुस्तें श्रेष्ठ (सर्वोत्तम) त्वगिंद्रिय बळ असतें. ॥ १९३ ॥

प्रत्यहं वृद्धिक्षीणत्वे फलपुष्पे तथैव च ॥
देहोऽस्ति तेषां सर्वेषां सूक्ष्मादिः सर्वकर्मणाम् ॥ १९४ ॥

त्यांची वृद्धि व क्षय प्रत्यहीं होत असतात. त्याचप्रमाणें त्यांस पुष्पें व फळें येत असतात. तस्मात् सर्व कर्में करणाऱ्या त्या सर्वांस स्थूल सूक्ष्म, कारण व महाकारणदेह आहेत. ॥ १९४ ॥

स्थूलस्यान्तः सूक्ष्मभूतं तथा च प्राणपंचकम् ॥
गर्भांधस्याखिलं त्वस्ति कथं तज्ज्ञायतेऽबुधैः ॥ १९५ ॥

जन्मांधाच्या स्थूल देहाच्या आंत सूक्ष्म देह असतो त्याचप्रमाणें प्राणपंचकही असतें. पण ही सूक्ष्म व विचारानेंच ज्ञात होणारी गोष्ट अज्ञांस कशी कळणार ? ॥ १९५ ॥

नेत्रस्थाने स्थिते देहे वर्णव्यक्तिस्तु वर्तते॥
साभिमानं तृतीयं च व्यापाराः स्थूलदेहवत् ॥ १९६ ॥

नेत्रस्थानांत असलेल्या सूक्ष्म देहांत रूपाची अभिव्यक्ति करण्याचें सामर्थ्य असतें. त्यास अभिमानयुक्त तृतीय स्थानही असतें. स्थूलदेहाप्रमाणेंच त्यांच्याही सूक्ष्म देहाचा व्यापार होत असतो, व स्थूल देहानेंही ते गमनादि व्यापार साक्षात् करितात ॥ १९६ ॥

आंतरे त्रिपुरक्रीडां कुर्वन् व्याप्नोति देहिनः ॥
तथात्मा संस्थितोऽधस्य देहे तस्येति लक्षणम् ॥ १९७ ॥

जसा नेत्रयुक्त शाण्याच्या आंतरत्रिपुरांत क्रीडा करणारा आत्मा त्याच्या शरीरास व्यापून राहतो, त्याचप्रमाणें तो अंधोच्या देहांतही असतो. दोघांच्याही आत्म्याचें लक्षण एकच ॥ १९७ ॥

दृष्ट्यालापादिव्यापारा वृक्षादिषु भवंति हि ॥
जलमध्ये स्थितं पद्ममाकाशे भानुरस्ति च ॥ १९८ ॥

पहाणें, भाषण करणें इत्यादि, क्रिया वृक्षादिकांमध्येंही होतात. जलामध्यें कमल असतें व सूर्य उगवल्यापासून असंख्य योजनें वर आकाशांत असतो. पण त्याचा उदय झालेला त्याला दिसतो. (दिसतो म्हणजे त्याला त्याचें ज्ञान होतें व आम्हालाही एकादि वस्तु दिसते म्हणजे काय तर तिचें ज्ञान होतें ॥ १९८ ॥

मित्रदर्शनसंतोषात्पद्मजालं विकाशते ॥
सूर्यकान्ताख्यपुष्पं च तस्याभिमुखमाटति ॥ १९९ ॥

त्यामुळें सूर्याच्या दर्शनानें झालेल्या संतोषानें कमलसमूह विकसित होतो. व सूर्यकान्त नांवाचें पुष्प तर त्याच्या सन्मुख फिरत रहातें (म्हणजे त्याचा उदय होतो तेव्हां त्याचें तोंड थेट पूर्वेकडे असतें. पुढें तो जसा जसा वर चढत जाईल तसें तसें त्याचेंही मुख वर उचलत जातें. मध्यान्हीं तो मध्यभागीं येतो तेव्हां तें ताठ उभें रहातें व त्याचें तोंड अगदीं सूर्यासमोर असतें. अपराण्हकाळीं सूर्याबरोबरच तें पश्चिमेकडे झुकूं लागतें व सायंकाळीं थेट पश्चिमेकडे वळतें) हें प्रसिद्ध आहे ॥ १९९ ॥

दृष्टिशब्दादि वृक्षाणां नेति शंका वृथा कृता॥
रंभाप्रसूतिकाले तु शब्दस्तस्याः प्रशस्यते ॥ २०० ॥

वास्तव दृष्टि, शब्द इत्यादि वृक्षांचे ठायीं नाहींत असें अज्ञ व्यर्थ म्हणतात. केळ जेव्हां पसवते तेव्हां तिचा शब्द स्पष्ट ऐकूं येतो ॥ २०० ॥

इंद्रियं हींद्रियं धृत्वा सर्वकार्ये प्रवर्तते ॥
गर्भांधस्य तथा ज्ञानं प्रोक्तं ज्ञेयं विचक्षणैः ॥ २०१ ॥

ज्यास जें इंद्रिय नसतें त्याचें तें कार्य दुसरें इंद्रिय करितें. आणि अशा रीतीनें प्राणी सर्व कार्यांत प्रवृत्त होतो. असा नियम आहे आणि त्यास अनुसरून विद्वानांनीं गर्भांधासही सर्व प्रकारचें ज्ञान होतें असें सांगून ठेविलें आहे ॥ २०१ ॥

पश्चात्प्रारब्धभोगेन देहान्तरं भविष्यति ॥
सर्वेंद्रियसमायुक्तः स्वस्थदेहं स आप्नुयात् ॥ २०२ ॥

एका देहांत अंधत्वास कारण होणारा प्रारब्ध दोष भोगानें घालवून तो दुसरा देह घेतो व तो त्याचा देह सर्व इंद्रियांनीं युक्त असतो व तसल्या योग्य देहाची प्राप्ति झाल्यानें तो सर्व इंद्रियांचीं कार्यें अव्याहतपणें करूं शकतो. ॥ २०२ ॥

मध्येंऽधदृष्टेराघातात्तथाऽप्यात्मवतः खलु ॥
अंतर्दृष्ट्या यथा ज्ञानी तथांधो जहि संशयम् ॥ २०३ ॥

पण प्रारब्ध कर्म अति बलाढ्य व भोगांवांचून अक्षय्य असल्याकारणानें मध्यें एकाद्या जन्मांत जरी एकाद्याच्या दृष्टीचा नाश झाला तरी तो आत्मवान् असल्यामुळें ज्ञान्याप्रमाणेंच अंतर्दृष्टीनें युक्त असतो. तूं याविषयीं संशय धरूं नकोस ॥ २०३ ॥

शंभौ तृतीयकं नेत्रमग्निरूपं प्रतिष्ठितम् ॥
दग्धोऽनंगस्तु वै येन ज्ञाननेत्रं तदेव च ॥ २०४ ॥

शंकराला तिसरा नेत्र आहे तो अग्निरूप असल्यामुळें सदाशिवानें त्यानेंच मदनास जाळिलें. त्याचा तोच ज्ञाननेत्र होय. ॥ २०४ ॥

शरीरं वेदसंख्याकं तत्त्वानि शतकं तथा ॥
भस्मीभूतशरीरस्य वर्णरूपे कुतस्तदा ॥ २०५ ॥

चार देहांच्या समूहरूप त्या (मदना) चें शरीर व शंभर तत्त्वें या सर्वांचें भस्म झाल्यावर त्यास वर्ण व रूप कोठून असणार ? ॥ २०५ ॥

अनंगोऽदेहरूपोऽपि व्याप्नोति सकलं जगत् ॥
उत्पत्तिः सर्वजंतूनां वर्धतेऽहर्निशं ततः ॥ २०६ ॥

म्हणून त्या मदनास अनंग असें नांव पडलें आहे. अर्थात नांवाप्रमाणें पाहि त्यास त्याला देह नाहीं. तो अदेहरूप आहे. पण तो सर्व जगास व्यापतो. सर्व प्राण्यांची उत्पत्ति अहोरात्र त्याच्या पासूनच होते ॥ २०६ ॥

तदा रूपशरीरादि तेन किंचिन्न दृश्यते ॥
क्रियाकर्मगुणाः सर्वे भवंत्यस्मिंस्तथाऽपि च ॥ २०७ ॥

त्याचें रूप, शरीर इत्यादि कांहीं एक दिसत नाहीं. तथापि त्याची क्रिया, अवस्था, गुण इत्यादि सर्व शरीरांत होतात. अंधाच्या शरीरांतही त्याचा व्यापार चालतो. फार काय पण स्थावर पदार्थांवर सुद्धां त्याचा अधिकार चालतो ॥ २०७ ॥

विश्वव्यापी चांतरात्मा सर्वदेहेऽस्य विद्यते ॥
प्राणादिसर्वतत्त्वानि तिष्ठन्ति च यथास्थितम् ॥ २०८ ॥

विश्वव्यापी अंतरात्मा अंधाच्या सर्व शरीरांत असतो. प्राणादि सर्व तत्त्वें त्यांत यथास्थितपणें राहतात ॥ २०८ ॥

रूपावलोकनमात्रं व्यापकं ध्रुवमस्य न ॥
चलनस्पर्शनज्ञानं तत्राऽऽस्तेऽसंशयं बुध ॥ २०९ ॥

केवळ व्यापक रूप दर्शन त्याला मुळींच होत नाहीं. बाकी चलन, स्पर्शन इत्यादि ज्ञान त्यास निःसंशय असतें ॥ २०९ ॥

सोपाधित्वाद्दृष्टिमध्ये वर्णत्रयं न दृश्यते ॥
तत्त्वे तत्त्वं समाश्रित्य तिष्ठत्यखिलदेहिषु ॥ २१० ॥

दृष्टीमध्यें दोष असल्याकारणानें तीन वर्ण दिसत नाहींत. पण हा जीवात्मा सर्व देहधारी प्राण्यांमध्यें तत्त्वांत तत्त्वाचा आश्रय करून रहातो. (भूतांच्या आश्रयानें असतो.) ॥ २१० ॥

एवमस्तीह वृत्तांतो वृथा प्रश्नकृतो वचः ॥
प्रश्नद्वयं स्थुर्वरितं स्वस्थं शृणु मुनीश्वर ॥ २११ ॥

सारांश, असा येथें वृत्तांत आहे. त्यामुळें प्रश्नकर्त्याचा अंधाविषयींचा प्रश्न व्यर्थ आहे. आतां त्याच संबंधीं दोन प्रश्न उरले आहेत. त्याचें उत्तर, हे मुनीश्वरा, तूं स्वस्थपणें ऐक ॥ २११ ॥

सृष्टेरुत्पत्तिकाले तु भानुसोमौ च निर्मितौ ॥
आकाशे भ्राम्यतो नित्यं लोकोपकृतिकारणात् ॥ २१२ ॥

धात्यानें सृष्टीच्या उत्पत्तिसमयीं सूर्य व चंद्र यांस निर्माण केलें ते लोकांवर उपकार करण्याकरितां सतत आकाशांत फिरतात ॥ २१२ ॥

पर्जन्यकाले संप्राप्ते मेघाडम्बरतः खलु ॥
तथा मण्डलमदृश्यं का हानिर्नाम वै तयोः ॥ २१३ ॥

पण पर्जन्यकाल आला असतां मेघांच्या आडंबरामुळें त्यांचीं मंडलें अदृश्य होतात. परंतु त्यामुळें त्यांची कोणती हानि आहे? ॥ २१३ ॥

कल्पान्ते सोमभान्वोश्च जायते न च दर्शनम् ॥
कंचित्कालं स्थिता मेघा नश्यंत्यपि च कालतः ॥ २१४ ॥

कल्पाच्या अंतीं चंद्र व सूर्य यांचें दर्शन होत नाहीं. पण कांहीं काल असणारे मेघ योग्य समयीं नाहींसे होतात हें सर्वांस ठाऊक आहे ॥ २१४ ॥

तथैव भ्रान्तिनाशे हि चतुर्देहा विनाशिताः ॥
एवं पटलपुष्पादेर्विचारो वर्णितो मया ॥ २१५ ॥

त्याचप्रमाणें भ्रांतीचा नाश झाला असतां चारी देह बाधित होतात (त्यांचा आत्म्याशीं कांहीं संबंध नाहीं असें कळतें) सारांश, याप्रमाणें मी नेत्रांतील फूल सारा इत्यादिकांचा हा विचार सविस्तर वर्णिला ॥ २१५ ॥

पूर्वजन्मकृतं पापं व्याधिरूपेण दृश्यते ॥
स्थूलेषु गजचर्मादि ग्रंथिरूपादिकं तथा ॥ २१६ ॥

पूर्वजन्मीं केलेलें पाप व्याधिरूपानें व्यक्त दिसतें. स्थूलदेहावर गजकर्ण, गळवें, खरूज, कोड इत्यादि रूपानें त्याचा प्रादुर्भाव कसा होतो हें सर्व मानवांस ठाऊक आहे ॥ २१६ ॥

विकाराद्रुधिरस्यैव वर्णहान्यादि जायते ॥
औषधापचनेनैव पूर्ववद्देहसंभवः ॥ २१७ ॥

रक्ताच्या विकारामुळें वर्णहानि, इत्यादि होते. अनेक रक्तविकार उद्भवतात.

व प्रारब्धकर्म भोगद्वारा क्षीण झालें असतां औषधाचा उपयोग होऊन पूर्वीप्रमाणें देह होतो ॥ २१७ ॥

नेत्रे विकाराज्जायेत पुष्पं च पटलादिकम् ॥
देहत्रयसमाधारे तत्र हानिः कथं तदा ॥ २१८ ॥

नेत्रांत विकारामुळें फूल पडतें, सारा येतो व दुसऱ्याही अनेक व्याधी उद्भवतात. पण जीवात्म्याच्या तीन देहांचा आश्रय नाहींसा होत नाहीं. मग पूर्वोक्त मेघाच्छादित सूर्यचंद्रांप्रमाणें आत्म्याची कोणती हानी आहे? ॥ २१८ ॥

अंजनादिप्रयोगस्तु कर्तव्यस्तत्र बुद्धिभिः ॥
यथापूर्वं भवेद्दृष्टिः सूक्ष्मात्सूक्ष्मस्य दर्शने ॥ २१९ ॥

आतां नेत्रांतील दोष जाण्याकरितां विचारपूर्वक अंजनादिकांचा प्रयोग करावा. म्हणजे पूर्वीप्रमाणें दृष्टि होते ती सूक्ष्माहून सूक्ष्म वस्तु पाहण्यासही समर्थ असते ॥ २१९ ॥

स्थूलेषु प्राप्यते व्याधिस्तत्रोपायं समाचरेत् ॥
सूक्ष्मेषु जायते रोगश्चिकित्सा क्रियतां ततः ॥ २२० ॥

स्थूलशरीरामध्यें व्याधि उद्भवते. वास्तव स्थूलशरीरांतच उपाय करावा लागतो. त्याचप्रमाणें सूक्ष्मशरीरांत रोग झाल्यास त्याचीच चिकित्सा करणें उचित होय. काम, क्रोध, लोभ, मद अहंकार इत्यादि सूक्ष्म शरीराचे रोग आहेत ॥ २२० ॥

उभयोरुपचारेण शरीरे स्वास्थ्यमुद्भवेत् ॥
शरीरारोग्यतः सर्वं भवेत् सुखमयं तदा ॥ २२१ ॥

दोन्ही शरीरांतील रोगांस उपचाराच्या योगानें नाहींसें करून टाकिलें असतां शरीरामध्यें स्वास्थ्य उत्पन्न होतें. आणि शरीराच्या आरोग्यामुळें सर्व सुखमय होतें ॥ २२१ ॥

पश्वादीनां च दृष्ट्यादि सर्वं यद्यपि वर्तते ॥
तथाऽपि नाऽत्मनो ज्ञानमेवं द्वैतप्रियस्य वै ॥ २२२ ॥

पश्वादिकांस दृष्टी, सामान्य वाणी, इत्यादि सर्व आहेत. पण त्यांस आत्मज्ञान

होत नाहीं कारण त्यांच्यामध्यें ज्ञानाचा अधिकारच नसतो. त्या प्रमाणें ज्यास द्वैत प्रिय आहे अशा पुरुषासही ज्ञानाधिकाराच्या अभावीं आत्मज्ञान होत नाहीं ॥ २२२ ॥

चिदात्मा सर्वदेहेषु ज्योतीरूपेण व्यापकः ॥
तज्ज्योतिश्चक्षुरग्रेषु गुरुनेत्रेण दृश्यते ॥ २२३ ॥

चिदात्मा सर्व देहामध्यें ज्योतीरूपानें व्यापक आहे. त्याची ज्योती नेत्रांच्या अग्रभागीं असते, व ती गुरूच्या नेत्रानें पाहूं लागलें असतां दिसते ॥ २२३ ॥

स मुक्तो यो विजानाति वेदवेदान्तनिश्चितम् ॥
मथित्वा सर्वशास्त्रं यत्पार्वतीं प्रतिबोधितम् ॥ २२४ ॥

शंकरानें सर्व शास्त्रांचें मंथन करून पार्वतीला जें सांगितलें व वेद आणि वेदान्तशास्त्र यांत जें निश्चित आहे त्या तत्वास जो जाणतो तो मुक्त होतो तो संसार बंधनांत अडकून पडत नाहीं ॥ २२४ ॥

शंकरेण प्रसन्नेन तथा वस्तु प्रदर्शितम् ॥
ज्योतीरूपं स्वरूपं यत्तस्मान्माया न वै पृथक् ॥ २२५ ॥

प्रसन्न झालेल्या शंकरानें ज्योतीरूप स्वरूपभूत वस्तु दाखविली. त्या वस्तूहून माया पृथक् नाहीं तर ती तिचीच शक्ति आहे. अग्नीहून त्याची दाहकशक्ति जशी भिन्न नाहीं तशीच ती आपल्या आधाराहून निराळी नाहीं ॥ २२५ ॥

अभेदाद्गुरुशिष्याणां सर्वत्रैक्यं प्रदृश्यते ॥
गुरुशिष्यस्वरूपेण क्रीडति स्वेच्छयेश्वरः ॥ २२६ ॥

गुरु व शिष्य यांच्या अभेदामुळें सर्वत्र ऐक्याचा साक्षात्कार होतो. गुरुशिष्यस्वरूपानें ईश्वर स्वेच्छेनें क्रीडा करीत असतो ॥ २२६ ॥

तत्त्वं पार्थस्य कृष्णेन ह्युद्धवस्य हितेन च ॥
ब्रह्मादिसनकादीनां हंसरूपेण बोधितम् ॥ २२७ ॥

ऋषिसिद्धा ! हेंच तत्त्व परम आप्त कृष्णानें पार्थास व उद्धवास सांगितलें त्या परमात्म्यानेंच हंसरूपानें ब्रह्मदेव, सनकादिक यांसही हंसगीतेंत हेंच सांगितलें आहे ॥ २२७ ॥

दत्तात्रेयादिसिद्धानां नवनाथैस्तथैव च ॥
शंकरो गुरुरूपेण ब्रह्माभिज्ञेन बोधितः ॥ २२८ ॥

दत्तात्रेयादि सिद्धांस नवनाथांनीं याचाच उपदेश केला. ज्ञानी ब्रह्मानें गुरुरूपानें शंकरास याचाच बोध केला ॥ २२८ ॥

सीतावियोगकाले तु रामस्योक्तं शिवेन वै ॥
परशुरामस्य तत्तत्वं दत्तात्रेयेण बोधितम् ॥ २२९ ॥

सीतेच्या वियोगसमयीं दुःखी रामास शंकरानें हेंच सांगितलें. अनुग्रहसमयीं दत्तात्रेयांनीं परशुरामास तेंच परम तत्त्व सांगितलें ॥ २२९ ॥

अन्ये च बहवो भक्ता मुक्ता गुरुकृपावशात् ॥
तथा न ते भेदयुक्ता मूर्खा देहाभिमानिनः ॥ २३० ॥

आणि असेच दुसरेही अनेक भक्त गुरुकृपावशात् मुक्त झाले आहेत. ते मूर्ख, भेददृष्टी व देहाभिमानी नव्हते ॥ २३० ॥

देहस्यान्तर्गतो ह्यात्मा देहमध्ये प्रदर्शितः ॥
तस्माद्देहात्मको नाम प्रख्यातः सर्वलौकिकैः ॥ २३१ ॥

देहाच्या आंत आत्मा असतो, व तो देहांत कसा असतो तेंही दाखविलें. ह्मणूनच सर्व लोकांनीं देहात्मक या नांवानें याचें वर्णन केलें आहे ॥ २३१ ॥

आत्मेति चाक्षरो नाम क्षररूपं शरीरकं ॥
ॐमित्येकाक्षरं ब्रह्म कथं तद्देहधर्मभाक् ॥ २३२ ॥

आत्मा हा अक्षर अविनाशी आहे व शरीर क्षररूप आहे. ॐ या एकाक्षररूप ब्रह्म आहे. तेव्हां तें देहधर्मास पात्र कसें होईल? कधींच होणार नाहीं; पण तें देहधर्मसंबद्ध आहे, असें अविवेकामुळें वाटत असतें, व तें वाटणेंच सर्व अनर्थांचें मूळ आहे ॥ २३२ ॥

ॐकारसदृशं रूपं देहात्मेति प्रगीयते ॥
पंचभूतात्मको देहो भूतात्मा नाम कथ्यते ॥ २३३ ॥

ॐकारतुल्य रूपासच देहात्मा असें ह्मणतात. पंचभूतात्मक देहास भूतात्मा असें ह्मणतात ॥ २३३ ॥

तारकं देहरूपाख्यं प्रत्यक्षं वर्णितं मया ॥
नवप्रणवसंयुक्तं नवरूपं तु तारकं ॥ २३४ ॥

देहरूपाख्य तारकाचें प्रत्यक्ष वर्णन मी केलें आहे नऊप्रणवांनीं युक्त असलेल्या तारकास नवरूप तारक ह्मणतात. ॥ २३४ ॥

काशीपुरीनिवासी स विश्वनाथो जगद्गुरुः ॥
देहान्ते चोपदिशते दक्षिणे कर्णसंपुटे ॥ २३५ ॥

काशीपुरींत रहाणारा तो जगद्गुरु विश्वनाथ देहान्तसमयीं भक्ताच्या दक्षिण कर्णपुटांत या तारकाचा उपदेश करितो ॥ २३५ ॥

केनापि न कृतः प्रश्न ईदृशो भुवनत्रये ॥
तत्र सर्वं मयाऽऽख्यातं गुह्याद्गुह्यतरं महत् ॥ २३६ ॥

अशाप्रकारचा प्रश्न त्रिभुवनांत कोणी कोणाला केला नव्हता. पण तूं तो केलास ह्मणून मी हें अतिगुह्य व मोठें सर्व तत्त्व सांगितलें.॥ २३६ ॥

सूत उवाच ।

ऋषिसिद्धगणाः सर्वे साष्टांगं च ववंदिरे ॥
वयं कृतार्था इत्युक्त्वा अहंभावविवर्जिताः ॥ २३७ ॥

सूत ह्मणतोः—कपिल महामुनीचें हें भाषण ऐकून अहंभावरहित झालेले ते सर्व ऋषिसिद्धगण आह्मी कृतार्थ झालों, असें बोलून साष्टांग वंदन करिते झाले ॥ २३७ ॥

त्वत्प्रसादेन संप्राप्तं साक्षाद्दर्शनमात्मनः ॥
दर्शितं तव नेत्रेण अनिर्वाच्यो भवाम्यहम् ॥ २३८ ॥

हे गुरो, तुझ्या कृपेमुळें मला साक्षात् आत्मदर्शन झालें. तुझ्या या ज्ञान दृष्टीनेंच मला तें दिसलें मी आतां अनिर्वाच्य झालों आहें ॥ २३८ ॥

मुहुर्मुहुश्च यः स्तौति सहर्षं गद्गदस्वरः॥
स मुक्तः सर्वलोकेषु ब्रह्मसायुज्यमाप्नुयात् ॥ २३९ ॥

मोठ्या हर्षानें गद्गदस्वरानें जो वारंवार आत्मस्मरण व आत्मस्तुति करतो तो सर्व लोकांतून मुक्त होऊन ब्रह्मसायुज्यपदास प्राप्त होतो ॥ २३९ ॥

राजराजेश्वरो योगः शेषमार्गः प्रशस्यते ॥
यः पठेत्सततं भक्त्या स मुक्तो नात्र संशयः ॥ २४० ॥

शेषाचा अवतार अशा पतंजलीनें हा राजराजेश्वर योग सांगितलेला आहे. जो कोणी मोठ्या भक्तीनें याचें सतत पठन करील तो मुक्त होईल यांत संशय नाहीं ॥ २४० ॥

ऋषिसिद्धकपिलयोर्वाक्यममृतबिंदुवत् ॥
मुक्तिकामः पिबेद्यो वै स मुक्तो नात्र संशयः ॥ २४१ ॥

इति श्रीपद्मपुराणे सिद्धांतसारे कपिलऋषिसंवादे राज-
राजेश्वरयोगकथनं नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥

ऋषिसिद्ध व कपिल यांच्या संवादरूप हें वाक्य अमृतबिंदुतुल्य मधुर आहे. मुक्तीची इच्छा धरून जो याचें प्राशन करील तो मुक्त होईल यांत कांहीं संशय नाहीं ॥ २४१ ॥

इति श्री पद्मपुराणांतील सिद्धांत सारापैकीं कपिल ऋषिसंवादाचा राजराजेश्वर
योग कथन नामक पांचवा अध्याय समाप्त झाला. ॥ ५ ॥

ॐतत्तत्त्वं सोहं रामः सोहं तत्त्वम् ॥
ॐतत्त्वमसि रामायनमः ॥ ॐतत्त्वं रामोसि ॥
शरीरं च भवेदात्मा अंतरात्मा भवेन्मनः ॥
परमात्मा भवेच्छून्यं मनो यत्र विलीयते ॥
ॐतत्सद्ब्रह्मार्पणमस्तु ॥ ७ ॥ समाप्तेयं कपिलगीता ॥
॥ शं भूयात् ॥

समाप्त.